

।। गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन ।।



# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

(कला, विज्ञान आणि वाणिज्य) एनईपी–२०२० नुसार बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम

नॅक पुनर्मूल्यांकनात 'अ' दर्जा प्राप्त : CGPA 3.10 (4th Cycle)

'चाटचाल कृतज्ञतेची : भाबलेल्या चार दशकांची'





४०

१९८५-२०२५

'चत्वारिंशद्वर्षाणि'




ज्ञानभारती २०२५-२६

# BHARATI VIDYAPEETH'S
# DR. PATANGARO KADAM MAHAVIDYALAYA, SANGLI
## (ARTS, SCIENCE & COMMERCE)



राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
is pleased to declare
Bharati Vidyapeeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli
Sangli-Islampur Road, Dist. Sangli,
affiliated to Shivaji University, Maharashtra as
Accredited
with CGPA of 3.10 on four point scale
at A grade
valid up to April 05, 2029

Date : April 06, 2024

Director

## Vision

- To empower the youth to face global challenges

## Mission

- To create awareness about higher education among students and contribute towards bringing about social transformation

## Objectives

- To provide academic and infrastructural facilities to students
- To develop academic, sports and cultural excellence among students
- To motivate students to develop personalities on the basis of their attitude
- To inculcate the dignity of labour and create social awareness among students
- To bridge the rural and urban cultures and work towards national integration

'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन'

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

(कला, विज्ञान आणि वाणिज्य) एनईपी-२०२० नुसार बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम

नॅक पुनर्मूल्यांकनात 'अ' दर्जा प्राप्त CGPA 3.10 (4th Cycle)

# ज्ञानभारती

२०२५-२०२६


* संपादक मंडळ *

अध्यक्ष

**प्राध्यापक (डॉ.) विवेकानंद रणखांबे**

प्राचार्य

**डॉ. कृष्णा भवारी**

प्रमुख संपादक




## ज्ञानभारती

**संपादक मंडळ**
**अध्यक्ष**
प्राचार्य डॉ. व्ही. ए. रणखांबे

**प्रमुख संपादक**
डॉ. के.एम. भवारी

**मराठी विभाग**
डॉ. के.एम. भवारी
श्री. एस. डी. पाकले

**हिंदी विभाग**
डॉ. एस. आर. जाधव
श्री. बी. पी. पाटील

**इंग्रजी विभाग**
सौ. आर. डी. वाघमारे
श्री. आर.एस. काटकर

**विज्ञान विभाग**
प्रा. सौ. बी. के. भाविकट्टी
डॉ. टी. आर. लोहार

**अहवाल आणि जाहिरात विभाग**
डॉ. डी. व्ही. फड

**फोटो विभाग**
प्रा. एस. ए. कांबळे

**मुखपृष्ठ संकल्पना व रचना**
प्राचार्य डॉ. व्ही. ए. रणखांबे

**मुद्रक**
भारती प्रिंटिंग प्रेस, पुणे


## मुखपृष्ठाविषयी थोडेसे...




डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय हे यावर्षी आपल्या स्थापनेची चाळीस वर्षे पूर्ण करत आहे. चार दशकांच्या या वाटचालीत प्राचार्य पी. बी. पाटील या विचारवंताने ज्याचे बीजारोपण केले त्याचे आज डॉ. पतंगराव कदम यांच्या परीसस्पर्शाने वटवृक्षात रूपांतर झाले आहे. भारतीय स्त्री अस्मितेचा येल्गार करणाऱ्या पुण्यश्लोक राणी अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी कु. सर्वेश कुशारे याने पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये सहभागी होत एक इतिहास घडविला. भारतीय राज्यघटनेचा अमृत महोत्सव साजरा करत असतानाच २०२६ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक स्तरावर रेंजलँड आणि पशुपालन वर्ष तसेच आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. मा. डॉ. विश्वजित कदम यांच्या समर्थ नेतृत्वाखाली भारती विद्यापीठ या वैश्विक संकल्पना साकारत पुढे चालले आहे. हे दर्शविणारे मुखपृष्ठ ग्रामीण क्षमतांना वैश्विक आयामांनी समृद्ध करते आहे, असेच म्हणावे लागेल.

**– प्राध्यापक (डॉ.) विवेकानंद रणखांबे**
**प्राचार्य**

**या अंकात छापलेल्या लेखांची, साहित्य कृतींची, स्वामीत्वाची, नैतिक/कायदेशीर जबाबदारी ही लेखक/कवी यांची स्वत:ची असेल. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ तथा संस्थेचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.**

तू प्यार का सागर है,
तेरी एक बूँद के प्यासे हम ।



# मा.डॉ. पतंगराव कदम

एम.ए., एलएल.बी., पीएच्.डी.

संस्थापक, भारती विद्यापीठ

संस्थापक-कुलपती, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे

## संकल्पसिद्धीचे अधिष्ठान



# मा. विजयमाला कदम (वहिनीसाहेब)

अध्यक्षा, शालेय शिक्षण समिती, भारती विद्यापीठ, पुणे
अध्यक्षा, महाविद्यालय विकास समिती, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

## घट्ट नातं मातीशी आणि गुणवत्तेशी



# मा. प्रा. डॉ. शिवाजीराव कदम

एम. एस्सी., पीएच.डी.

कुलपती, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे

# अजेय योद्धा!



## मा.आ.डॉ. विश्वजीत कदम

बी.ई., एम.बी.ए, पीएच.डी.

कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे

प्र-कुलगुरू, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे

माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

## क्षमता, नम्रता, शालीनता...
## भारती विद्यापीठ कुलाच्या कुलवधू



# मा. सौ. स्वप्नाली विश्वजीत कदम

एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, रविंद्रनाथ टागोर स्कूल ऑफ एक्सलन्स, पुणे यांची

**महाविद्यालयास सदिच्छा भेट**

## भारतीची आंतरराष्ट्रीय भरारी



# मा. डॉ. सौ. अस्मिता जगताप

एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर,
हेल्थ सायन्सेस

# ज्येष्ठतेचा अनुकरणीय प्रवास



## मा. मोहनराव कदम

अध्यक्ष,
डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि., वांगी

## मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी

# आ. डॉ. विश्वजीत कदम साहेबांची २ कोटींची मदत !

अतिवृष्टी व पुरामुळे संकटात असलेल्या मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत होणेसाठी भारती विद्यापीठाकडून पुन्हा एकदा **स्व. डॉ. पतंगराव कदम आपत्ती निवारण निधीतून 2 कोटींची मदत आ. डॉ. विश्वजीत कदम साहेबांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांचेकडे चेकद्वारे सुपूर्त केली.** याप्रसंगी कुलपती मा. डॉ. शिवाजीराव कदम सर, कुलगुरू डॉ. विवेक सावजी व कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप उपस्थित होते.



## कुलगुरू



**मा. डॉ. विवेक सावजी**

कुलगुरू, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे



**मा. डॉ. सुरेश गोसावी**

कुलगुरू (प्रभारी), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सहकार्यवाह : ऐतिहासिक वाटचालीचे साक्षीदार



**मा. डॉ. के. डी. जाधव**

सहकार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे



**मा. डॉ. एम. एस. सगरे**

सहकार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे

## अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने मंडित महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य



# प्राचार्य डॉ. विवेकानंद अर्जुनराव रणखांबे

एम.ए., एम.फिल., एलएल.बी., पीएच.डी., डिप्लोमा इन कीर्तन



# प्राचार्यांचे मनोगत ...

## चाळिशी महाविद्यालयाची : गाथा एका चैतन्यदायी प्रवासाची

भारती विद्यापीठाचे समर्थ कार्यवाह मा. डॉ. विश्वजीत कदम साहेब आणि शालेय शिक्षण तसेच महाविद्यालय विकास मंडळाच्या अध्यक्षा मा. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब यांच्या आदेशाने, मा. संस्थापक आणि आद्य-कुलपती यांचे नाव धारण केलेल्या, या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी रुजू झालो, तो दिवस होता १ ऑक्टोबर, २०२५. या पूर्वी सहस्रकाच्या उंबरठ्यावर, इथे दोन वर्षे काम केलेले असल्याने, या मातीबद्दल, इथल्या माणसांबद्दल, मनात एक जवळीक, आपुलकी आणि प्रेम होतं. त्यातच वाय. एम. कॉलेजच्या प्रभारी प्राचार्यपदी असताना आयोजित केलेल्या, 'स्वराज्य, स्वातंत्र्य आणि सुराज्य', या मोहिमेतील सायकल रॅलीत सहभागी झालेला इथला अध्यापक वर्ग; अंतःकरणाच्या आधीच जवळ होता, भविष्यातील कारकिर्दीला, मनाला आश्ववस्त करणारा होता. कारकिर्दीच्या ऐन भरात असणाऱ्या, तारुण्याने आणि चैतन्याने भारावलेल्या, क्षमताधिष्ठित सहकाऱ्यांसोबत काम करण्याची ही संधी होती. काही समज-गैरसमज, काही ग्रह-पूर्वग्रह, या पदावर अजून नेमके किती दिवस की किती महिने काम करायचे? हा प्रश्न अनुत्तरित असताना, एका संमिश्र वातावरणात, 'एक आश्वासक' सुरुवात करण्याचे आव्हान समोर उभे होते.

शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा निरोप आणि कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारलेल्या डॉ. सुरेश गोसावी, सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांच्या शिष्टाचार-संमत भेटींनी इथल्या प्राचार्य पदाच्या कारकिर्दीस सुरुवात झाली. इथे येण्यापूर्वी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पोरे याच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या 'भूगोल आणि शारीरिक-शिक्षण' या विषयांच्या अभ्यासक्रम पुनर्रचना विषयक कार्यशाळा आणि विविध विभागांच्या उपक्रमांनी ओथंबलेला २०२४-२५ चा समाज प्रबोधन सप्ताह यांचे अहवाल उत्साह वाढविणारे होते.

विद्यार्थ्यांनी वर्गाकडे पाठ फिरवली असण्याच्या काळात, चैतन्य आणि ऊर्जा निर्माण कशी होणार, हाच कळीचा मुद्दा होता. अशा वेळी शिमल्याच्या 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज'च्या फेलो डॉ. उषा बंदे यांचे व्याख्यान आयोजित केले. हा संस्कार मानून एनईपीची अंमलबजावणी करताना, लिड-कॉलेज अंतर्गत सांगली-मिरज परिसरातील सर्वच महाविद्यालयांसाठी एकत्रित कार्यशाळा घेत सुरुवात झाली. अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत महाविद्यालयांतील प्राचार्यांची बैठक, त्याच बरोबर आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थ्यांबरोबरच मेडिकल, डेंटल, फिजिओथेरेपी, विधीविद्या, मॅनेजमेंट अशा इतर प्रमुख व्यावसायिक विद्याशाखेचे विद्यार्थी प्रथमच अशा कार्यशाळेत सहभागी झाले. पारंपरिक पठडीपलीकडे जात लिड-कॉलेज उपक्रम हा महाविद्यालयाच्या लौकिकात भर टाकणारा ठरला. तर संविधान दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेली ऑनलाईन सामान्यज्ञान स्पर्धा, आठ भाषांतील संविधान उद्देशिकेचे वाचन, एन.सी.सी.तील कॅडेट्सचे यश, एन.सी.सी. विभागप्रमुख डॉ. महेश कोल्हाळ यांची तीन महिन्यांच्या ट्रेनिंगनंतर लेफ्टनंटपदी झालेली नियुक्ती, या बाबी वातावरणातील चैतन्य कायम करणाऱ्या ठरल्या.

अशातच सहकारी प्राध्यापकांच्या बौद्धिक प्रबोधनाचे, क्षमता वाढविण्याचे काम हाती घेणे महत्त्वाचे होते. या कामी भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांचे बहुमोल सहकार्य झाले. विश्वविद्यालयाच्या वतीने दर महिन्याला आयोजित केल्या जाणाऱ्या 'लिडरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' मध्ये, वर्षभर आमचा स्टाफ सहभागी झाला. सिरम, पुणे या जगद्विख्यात कंपनीचे जनरल मॅनेजर डॉ. कीर्तीकुमार सातपुते यांची महाविद्यालयास भेट आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. सह्याद्री देवराई आणि भारती विद्यापीठ, पुणे आयोजित मा. विजयमाला कदम (वहिनीसाहेब)

यांच्या अमृतमहोत्सवी वर्षातील बीजतुलेतील बीजांचे रोपण महाविद्यालयाच्या प्रांगणातील बागेत करण्यात आले.

या वर्षी महाविद्यालयातील सर्व १००% प्राध्यापक संशोधनाशी नाते जोडते झाले, याचे समाधान शब्दातीत आहे. (१००% स्टाफने, एकतर पीएच. डी पदवी प्राप्त केली आहे किंवा नोंदणी केली आहे) संशोधन क्षेत्रात डॉ. दादा नाडे यांना नासाकडून मिळालेले अनुदान, एएनआरसीकडून मंजूर झालेले सुमारे ६३ लाखांचे संशोधन अनुदान, वनस्पतीशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त करणारे आमचे सहकारी डॉ. हर्षल वांगीकर, भौतिकशास्त्रात डॉ. संभाजी खोत, रसायनशास्त्र विषयात डॉ. महेश बुरुड आणि डॉ. मेहजबीन मुजावर तसेच पद्मश्री डॉ. क्रांती शहा यांच्या प्रोत्साहनातून 'युवक-बिरादरी' आयोजित 'नेतृत्व विकास कार्यशाळा', कसबे-डिग्रज येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आणि विविध उपक्रम, रक्तदान शिबिर, आदी कितीतरी बाबी कार्यमग्नतेला चालना देऊन गेल्या.

सर्वप्रथम महाविद्यालयातील अपंग कर्मचारी, त्यानंतर सीएचबी स्टाफ, शिक्षकेतर कर्मचारी आणि मग अनुदानित ज्युनियर आणि सिनिअर कॉलेज स्टाफ अशा क्रमाने बैठका, तसेच सर्व विभागांचे सादरीकरण, अडचणी, एकंदर प्रवास, बलस्थाने, क्षमता, साधन संपत्ती, आजी-माजी प्राध्यापकांचे योगदान यांचा परिचय करून घेत सुरुवात झाली. स्वच्छता, गणवेश, बायोमेट्रिक हजेरीतील वक्तशीरपणा याबाबत महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी साथ दिली. नोव्हेंबर महिन्यात विद्यापीठाच्या परीक्षा पार पडल्या. उपप्राचार्य डॉ. अमित सुपले आणि सहकारी यांनी शिवाजी विद्यापीठ द्वितीय वर्षाचे सायन्स शाखेचे मध्यवर्ती मूल्यांकनाचे काम अत्यंत प्रभावीपणे पूर्ण केले.

८ जानेवारी हा मा. साहेबांचा जन्मदिवस, तर १३ जानेवारी हा मा. कार्यवाह डॉ. विश्वजित कदम साहेबांचा वाढदिवस. या निमित्ताने, समाज प्रबोधन सप्ताहातून 'विद्यापीठ समाजापर्यंत पोहोचावे', ही मा. साहेबांची अपेक्षा, डॉ. विश्वजित कदम सर यांच्या कार्यवाहपदाच्या कारकिर्दीत कितीतरी अर्थाने सार्थ ठरताना दिसते आहे. साहजिकच संस्थापकांचे नाव धारण केलेल्या या महाविद्यालयाने काहीशा आगळ्या वेगळ्या पद्धतीने हा समाज प्रबोधन सप्ताह साजरा करण्याचे ठरवले. ८ जानेवारी रोजी पहाटे सांगलीवाडीच्या नागरिकांनी सकाळी सकाळी जेव्हा त्यांच्या घराचे दरवाजे उघडले, तेव्हा त्यांच्या दारासमोर आमच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळ्या होत्या आणि त्यांच्या हाती होतं, 'संध्याकाळी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाचं निमंत्रण'. सांगलवाडी हे 'वारकरी संप्रदायाची' जपणूक करणारं गाव. मा. वहिनी साहेब यांच्या शुभहस्ते उद्घाटन होतं. नियोजनानुसार पहिल्या दिवशी पंढरपूर येथील ह.भ.प. कृष्णामहाराज चौरे आणि दुसऱ्या दिवशी पैठण निवासी प.पू. एकनाथ महाराज यांचे वंशज ह.भ.प. श्री. योगीराज महाराज पैठणकर यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. अध्यक्षस्थानी होते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. मनोहरजी सारडा.

सांगली हे एका अर्थी 'संकल्पतीर्थ'ही आहे. गेल्या '१२५ वर्षांपासून इथे कोटणीस' आणि '१०५ वर्षांपासूनची केळकर परिवाराची' 'दैनंदिन कीर्तन सेवा, अव्याहतपणे सुरू आहे. कोटणीस आणि केळकर यांच्याच नव्हे तर सश्रद्ध अंतःकरणाने या कीर्तनांना येणाऱ्या भाविक-भक्तांच्या परिवारातील दुःखद घटना, प्रसंग देखील या संकल्पांना त्यांच्या सिद्धीपासून थांबवू शकलेले नाहीत, हे महत्त्वाचे. साहजिकच या कीर्तन परंपरांचा यथोचित गौरव मा. श्री. गुरुनाथ महाराज कोटणीस आणि मा. श्री. दीपक (नाना) केळकर यांचा सत्कार करून करण्यात आला. समाज प्रबोधन सप्ताहाचे औचित्य साधत महाविद्यालयातील विविध विभागांनी महाविद्यालयास समाजाभिमुख केले. भारती परिवाराच्या स्नुषा मा. सौ. स्वप्नालीताई कदम यांनी मा. बाळासाहेब यांच्या वाढदिवसादिवशी अर्थात १३ जानेवारी, २०२६ रोजी महाविद्यालयास दिलेली भेट चैतन्यदायी ठरली. त्यांच्या या पहिल्या-वहिल्या भेटीची आठवण म्हणून झालेले वृक्षारोपण, त्यांच्या हस्ते झालेले आंतरराष्ट्रीय परिषदेच्या फ्लायरचे विमोचन, त्यांच्या सोबत संस्थेने स्टाफसाठी ठरविलेल्या गणवेशातील पहिले-वहिले फोटोसेशन, या बाबी चैतन्याची पखरण करून गेल्या.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, त्याला जवळपास एक वर्ष-दीड वर्ष पूर्ण होत होतं. दिल्लीच्या ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर या मूळच्या सांगलीच्या. 'नमन नटवरा, विस्मयकारा' या ज्या नांदीने मराठी रंगभूमीच्या इतिहासातील प्रत्येक दिवस सजविला, त्या नांदीचे जन्मदाते श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांचं सांगलीवाडी हे गाव. अशा वेळी या योगायोगांचं सोनं व्हावं, या हेतूने एका

आंतरराष्ट्रीय परिषदेचा संकल्प झाला. गेल्या वर्षीच्या अर्थात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या 'ज्ञानभारती'चे विमोचन करताना ताराबाईंच्या जवळ या विषयाचे आम्ही सुतोवाचही केलं. कोणतेही आढेवेढे न-घेता परिषदेच्या उद्घाटनासाठी येते म्हणाल्या. मा. साहेब, बाळासाहेब, वहिनीसाहेब यांच्याशी असलेल्या जवळकीचा त्यांनी अत्यंत आपुलकीने उल्लेख केला. तितक्याच सहजतेने डॉ. सदानंद मोरे यांनी बीजभाषणासाठीचे निमंत्रण स्वीकारले. कार्यवाहपदी असलेल्या मित्रवर्य प्रा. मिलिंद जोशी यांनी साहित्य परिषदेचं 'सहयोगी संस्था' म्हणून सहकार्य देऊ केलं. तर हैद्राबादच्या 'दि इंग्लिश अँड फॉरीन लँग्वेजेस युनिव्हर्सिटी'च्या माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित यांनी समारोप समारंभाच्या प्रमुख अतिथी म्हणून येण्याचे मान्य केलं. या निमित्ताने शासकीय ग्रंथ भांडाराच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजनही झाले.

अमेरिका, कॅनडा, सिंगापूर, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि चीनसह, भारतातील सुमारे ७ राज्यांतून सहभागी झालेल्या ३३६ प्राध्यापकांनी २०२ निबंध सादर केले. 'भारतीय अभिजात भाषा' आणि 'इंग्रजी' अशा दोन खंडांत हे निबंध प्रकाशित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ; कोल्हापूर, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय); पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद; पुणे आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ; सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद संपन्न झाली. या परिषदेचा इतिवृत्तान्त अहवाल विभागात देत आहोत.

महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आणि स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा. मच्छिंद्र सकटे आणि 'आयर्न-मॅन पुरस्काराने सन्मानित' प्राध्यापक (डॉ) मनाल अन्थिकट हे उपस्थित राहिले. विद्यापीठ आणि आंतर-विद्यापीठीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवीत, नेहमी प्रमाणे क्रीडा विभागानेही यंदा दमदार कामगिरी केली.

आज मी जेव्हा हे मनोगत लिहितो आहे तेव्हा एनईपीच्या अंमलबजावणीचे हे केवळ दुसरे वर्ष पार पडले आहे. पारंपरिक अभ्यासक्रमाची शेवटची बॅच यंदा निरोप घेते आहे आणि जून २०२६ पासून एनईपी अभ्यासक्रमाचे तृतीय वर्ष सुरू होणार आहे. जागतिक पातळीवर अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यातील अघोरी युद्ध, हे तात्पुरत्या स्वरूपात अल्प-स्वल्प युद्ध-बंदीने थांबले आहे. अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यात धर्म, पैसा, हेकेखोरपणा, सहस्रवर्षांची सूड-भावना आणि सत्तासंघर्षापायी, जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे होते, असे चित्र फेब्रुवारी आणि मार्च, २०२६ चे होते. अमलीपदार्थांच्या तस्करीचे कारण देत, व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांचे त्यांच्या पत्नीसह अमेरिकेने केलेले अपहरण आणि दुसरीकडे इराणच्या परमाणू कार्यक्रमास हरकत घेत, अमेरिकेने इराणवर लादलेले युद्ध, हे अमेरिकेच्या हुकूमशाही वृत्तीचे लांच्छनास्पद दर्शन होते. इस्त्राईलच्या हल्ल्यात इराणचे सर्वेसर्वा श्री. अयातुल्ला खोमेनी हे पहिल्या हल्ल्यातच मारले गेले. अरेबिक राष्ट्रे ही आपसांत संघर्षाप्रत गेली. अशा वेळी, जगातील भारत, रशिया, चीन, कोरिया आणि युरोपियन या आणि इतर महासत्तांनी, राष्ट्रांनी दाखविलेला संयम, शहाणपण आणि अलिप्तता हे महत्त्वाचे ठरते आहे.

आयुष्याच्या वाटेवर जीवन जगताना, शिक्षण क्षेत्रात प्रवास करताना, ज्यांच्या सहवासाच्या आणि संस्कारांच्या पाऊलखुणा नेहमीच वंदनीय ठरल्या, प्रेरणा बनून उरल्या आणि मार्गदर्शन करीत गेल्या, ते प्रा. राम पवार आज आपल्यात नाहीत, याचे दु:ख शब्दातीत आहे. 'व्यक्तिमत्त्वाच्या ठायी वसलेली कमालीची सहजता, शहाणपण, मूल्य, तत्त्व आणि सभ्यता यांच्याशी नातं जपणारा' हा माणूस, तीन विद्यापीठांच्या स्टॅट्युटचे काम करणारा हा माणूस, 'कशासाठी आणि जगावे कसे मी?' याचे प्राध्यापकांच्या भविष्यातील पिढ्यांना मार्गदर्शन करीत अनंतात विलीन झाला. त्यांच्या स्मृतींनी पाणावलेल्या डोळ्यात, प्रा. राम पवार सर यांच्या अबोल योगदानाचे स्मरण करीत, 'ज्ञानभारतीचा' हा अंक आपल्या हाती सुपूर्त करताना मनाला कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभते आहे.

या सर्व संकल्प-सिद्धीचे अधिष्ठान झालेल्या मा. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब, कार्यवाह डॉ. विश्वजित कदम, सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे यांचे मन:पूर्वक आभार आणि प्रमुख संपादक डॉ. कृष्णा भवारी आणि सर्वच शिक्षक-शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थी तसेच सांगलीवाडीच्या समस्त नागरिकांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

**प्रा. (डॉ.) विवेकानंद रणखांबे**
प्राचार्य



# संपादकीय

प्रिय वाचकहो,

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाचा 'ज्ञानभारती' वार्षिकांक आपल्या हाती सुपूर्त करताना विशेष आनंद होत आहे. याचे कारण म्हणजे १९८५ ते २०२५ हा चार दशकांचा टप्पा आमच्या महाविद्यालयाने नुकताच पूर्ण केला आहे. तत्पूर्वी शांतिनिकेतन या नावाने प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील या ऋषितुल्य विचारवंताने या शैक्षणिक संकुलाची पाया भरणी केल्यानंतर हे संकुल तितक्याच ताकदीच्या आणि शैक्षणिक क्षेत्रात देश- विदेशात ठसा उमटविणाऱ्या डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे सुपूर्त केले आणि शांतिनिकेतनचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय असे आमच्या महाविद्यालयाचे नामकरण झाले. त्या अर्थाने डॉ. पी. बी. पाटील आणि डॉ. पतंगराव कदम साहेब या दोन विभूतींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या या महाविद्यालयाची वाटचाल आम्हास निश्चितच भूषणावह आहे.

चार दशकांच्या प्रदीर्घ वाटचालीत महाविद्यालयाने अनेक क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केले आहे. हा यशाचा आलेख वर्षानुवर्षे वाढत असतानाच शिक्षणाबरोबरच सामाजिक दायित्व महाविद्यालयाने कायम जपले आहे. या शैक्षणिक वर्षात पार पाडलेल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा विषयक उपक्रमांचा समग्र आढावा 'ज्ञानभारती'च्या माध्यमातून आपल्यापुढे सादर करत आहोत. महाविद्यालयातील तरुणाई उत्साह, सर्जनशीलता आणि नवचैतन्याने भारावलेली असते. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी वर्षभर क्रीडा, कला, संशोधन व सामाजिक क्षेत्रात मिळविलेल्या यशाची नोंद अशा प्रकारच्या नियतकालिकात होते. मा. डॉ. पतंगराव कदम साहेबांनी 'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' या बोधवाक्याने सुरू केलेल्या भारती विद्यापीठाने आजपर्यंत लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले आहे.

आजच्या डिजिटल युगात व्यस्त असणारी तरुणाई पाहता आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी मात्र साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात अग्रेसर आहेत हे 'ज्ञानभारती' वाचल्यानंतरच आपल्या लक्षात येते. सदरचे लेखन करताना विविध साहित्य प्रकारात आणि सर्व विषयांना स्पर्श करण्याचा विद्यार्थ्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अभिव्यक्त होण्याचे हे हक्काचे व्यासपीठ आहे. त्यामुळे त्यांच्या अंगी असलेल्या कला -गुणांचा विकास या माध्यमातून होत असतो.

या वर्षी ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रा. डॉ. विवेकानंद रणखांबे हे प्राचार्यपदी रुजू झाले आणि काही महिन्यांतच महाविद्यालयाचा चेहरा मोहरा बदलून गेला. महाविद्यालयाची स्वच्छता, शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांना सूचना व मार्गदर्शन अशा अनेक बाबींमध्ये वैयक्तिक लक्ष घालून एक उत्तम प्रशासक कसा असावा याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात प्रथमच कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा मा. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब यांच्या हस्ते झाले. त्यांची उपस्थिती आमच्यासाठी प्रेरणादायी ठरली. दोन दिवस चाललेल्या या कीर्तन महोत्सवात सांगलीवाडी परिसरातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे 'अभिजात भाषा: भूत, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करून शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात महाविद्यालयाने इतिहास घडविला. कारण मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच अशा प्रकारच्या भव्य दिव्य परिषदेचे आयोजन महाविद्यालयाने केले होते. त्यामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात विशेष भर पडली. या व्यतिरिक्त अग्रणी महाविद्यालयाअंतर्गत घेतलेल्या कार्यशाळा, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील वैविध्यपूर्ण उपक्रम, विविध विषयांवर आयोजित करण्यात आलेली व्याख्याने आणि स्पर्धा यामुळे अल्पावधीतच भौतिक आणि शैक्षणिक दृष्ट्या महाविद्यालयाचा कायापालट झाला.

कला, क्रीडा आणि गुणवत्तेच्या बाबतीतही आमचे महाविद्यालय नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे, याची प्रचीती आपल्याला 'ज्ञानभारती'च्या माध्यमातून दिसून येते. थोडक्यात, महाविद्यालयाची चौफेर घोडदौड जोमाने चालू आहे याच्या पाठीमागे संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा मोलाचा वाटा आहे. 'ज्ञानभारती' हे

नियतकालिक आमच्या महाविद्यालयाचा आरसा आहे. वर्षभर पार पडलेले उपक्रम आणि घडामोडींचे प्रतिबिंब यात उमटले आहे. हे मुखपत्र केवळ विद्यार्थ्यांच्या किंवा प्राध्यापकांच्या कार्याची दखल घेत नसून समाज परिवर्तनाच्या दृष्टीने जे घटक महत्त्वाची भूमिका बजावतात त्यांच्या कार्याची आवर्जून नोंद घेत असते.

ज्ञानभारतीचा अंक हा सुबक आणि सुरेख होण्यापाठीमागे अनेक जणांचा हातभार लाभला आहे. महाविद्यालयाचे अनेक घटक यास जबाबदार आहेत. तसेच विद्यार्थ्यांचेही योगदान मोलाचे आहे. संपादक मंडळाने योग्य वेळी सहकार्य करून अत्यंत देखणे आणि वाचनीय असे लेख आणि कविता उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल सर्व सदस्यांचा मी ऋणी आहे. तसेच आमच्या महाविद्यालयातील नवसाहित्यिक विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर लेखन केले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे. महाविद्यालयातील कुशल प्रशासन आणि सर्व प्राध्यापक या सर्वांचा मी ऋणी आहे.

भारती विद्यापीठाचे सहकार्यवाह मा. व्ही. बी. म्हेत्रे व भौतिकशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. राम पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्याचबरोबर भारतातील थोर नेते, संशोधक, कलावंत, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, भारतीय सीमेचे रक्षण करताना धारातीर्थी पडलेले जवान व ज्ञात अज्ञात व्यक्तींना मी ज्ञानभारतीच्या माध्यमातून भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

'ज्ञानभारती' वार्षिकांक वेळेत व सुबक छपाई करून वाचकांच्या हाती देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. त्या बद्दल त्यांचे विशेष आभार. तसेच भारती प्रिंटिंग प्रेस, पुणेचे व्यवस्थापक व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. अंकामध्ये नजरचुकीने काही त्रुटी राहिल्यास वाचकांची क्षमा मागून सदरच्या नियतकालिकाचे आपण खुल्या दिलाने स्वागत कराल, ही अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद!

**– डॉ. कृष्णा भवारी**
संपादक

## संपादक मंडळ इतर सदस्य



**प्रा. भारती भावीकट्टी**
संपादक (विज्ञान)



**प्रा. सतिश कांबळे**
संपादक (फोटो विभाग)



**डॉ. ज्ञानेश्वर फड**
संपादक (अहवाल)



**प्रा. रोहिणी वाघमारे**
संपादक (इंग्रजी)



**डॉ. तृषांत लोहार**
संपादक (विज्ञान)



**प्रा. शंकर पाकले**
संपादक (ज्यु. मराठी)



**डॉ. सचिन जाधव**
संपादक (हिंदी)



**प्रा. रवींद्र काटकर**
संपादक (इंग्रजी)



**प्रा. सुरेश माने**
संपादक (व्य.शिक्षण)



**प्रा. बाबासाहेब पाटील**
संपादक (हिंदी)

## १३ जानेवारी २०२६ : मा. सौ. स्वप्नाली कदम यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट



मा. सौ. स्वप्नाली कदम यांच्या समवेत वरिष्ठ विभागातील प्राध्यापक



मा. सौ. स्वप्नाली कदम यांच्या समवेत महिला सहकारी आणि सोबत प्राचार्य, उपप्राचार्य

## १३ जानेवारी २०२६ : मा. सौ. स्वप्नाली कदम यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट



मा. सौ. स्वप्नाली कदम यांच्या समवेत ज्युनिअर व व्यवसाय शिक्षण विभागातील प्राध्यापक



मा. सौ. स्वप्नाली कदम यांच्या समवेत शिक्षकेतर कर्मचारी



पहिल्या रांगेत डावीकडून – प्रा.डॉ. चंद्रकांत वाघमारे (बेळगांव), उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. माया पंडित (माजी प्र. कुलगुरू, आय.एफ.एल.यु. हैद्राबाद), प्रा. अविनाश सप्रे, डॉ. सुबोध कुलकर्णी (आय.आय.आय.टी. तेलंगणा) सोबत महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग)



डॉ. तारा भवाळकर आणि प्राचार्यांसमवेत ज्युनिअर व व्यवसाय शिक्षण विभागातील प्राध्यापक



डॉ. तारा भवाळकर आणि प्राचार्यांसमवेत महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवक



डॉ. तारा भवाळकर आणि प्राचार्यांसमवेत महाविद्यालयातील सी.एच.बी. प्राध्यापक

## हार्दिक अभिनंदन!

### शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, एम. एस्सी. जनरल मायक्रोबायोलॉजी २०२४-२५ गुणवत्ता यादीतील विद्यार्थी



कु. रागिणी रामशरण केवट
(तृतीय क्रमांक)



कु. स्मिता सुनील घार्गे
(चतुर्थ क्रमांक)



सौरभ काकासाहेब जाधव
(चतुर्थ क्रमांक)



कु. आलिशा मुबारक मुजावर
(सातवा क्रमांक)



कु. सिमरन शशिकांत हिंगणे
(नववा क्रमांक)



प्राध्यापक डॉ. गजानन माळी
(सूक्ष्मजीवशास्त्र)
यांची प्राध्यापक पदी पदोन्नती व
मायक्रोबायालॉजिस्ट सोसायटी,
इंडिया च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड



प्रा. भारती भावीकट्टी
(सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख)
यांची चंद्रशेखर मगदूम सॅलरी
अर्नर्स सहकारी सोसायटीच्या
अध्यक्षपदी बिनविरोध निवड



डॉ. दादा नाडे
(भौतिकशास्त्र विभाग प्रमुख)
यांना SARA टिचर्स अनुदान नासाकडून
५ लाख आणि ए.एन.आर.सी. यांच्याकडून
रु. ६३ लाख अनुदान मंजूर



डॉ. महेश कोल्हाळ
(भूगोल विभाग प्रमुख)
यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती
(नागपूर येथे एन.सी.सी. अधिकारी
प्रशिक्षण पूर्ण)



प्रा. डॉ. भरत बल्लाळ
(सूक्ष्मजीवशास्त्र)
यांची महिला महाविद्यालय, कराड
येथे प्राचार्यपदी नियुक्ती



डॉ. रुपाली कांबळे
(शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख)
यांना 'आम्ही हिंगणगावकर'
प्रतिष्ठानतर्फे क्रीडाभूषण पुरस्कार



श्री. शहाजी कापसे
(सिनियर क्लर्क)
यांना साहित्य क्षेत्रातील
प्रतिष्ठित, नागठाणे भूषण पुरस्कार

## पीएच. डी. पदवी प्राप्त सहकारी



डॉ. हर्षल वांगीकर
(वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख)
यांना पीएच. डी. प्रदान



डॉ. संभाजी खोत
यांना भौतिकशास्त्र विषयात
पीएच. डी. प्रदान



डॉ. महेश दिलीप बुरुड
यांना रसायनशास्त्र विषयात पीएच.डी.
(मार्गदर्शक – डॉ. अमित सुपले )



डॉ. मुजावर महेजबीन रफीक
यांना रसायनशास्त्र विषयात पीएच.डी.
(मार्गदर्शक –डॉ. अंकुश सरगर)

## मा. सौ. स्वप्नाली कदम यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट



आदरणीय साहेबांना अभिवादन



'अर्जुन वृक्षा' चे रोपण करताना मा. स्वप्नालीताई कदम





महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करताना प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे



संशोधन क्षेत्रात यश संपादन केल्याबद्दल एक कौतुकाची थाप



स्वागत करताना प्रा. भारती भाविकट्टी



आंतरराष्ट्रीय परिषदेच्या फ्लायरचे उद्घाटन



भविष्याचा वेध घेणारा : संवाद आपुलकीचा आणि स्नेहाचा

# भावपूर्ण श्रद्धांजली !



**कै. वसंतराव भागवत म्हेत्रे**

(सहकार्यवाह – भारती विद्यापीठ)



**कै. प्रा. राम पवार (सर)**

(माजी विभागप्रमुख – भौतिकशास्त्र)

## सेवानिवृत्त सहकारी



**प्रा. अरुण लक्ष्मण जाधव**

(कनिष्ठ विभागप्रमुख)

(निवृत्ती दि. ३१-०५-२०२६)



**श्री. सुनील बाबुराव कुमठेकर**

(कार्यालयीन सेवक)

(निवृत्ती दि. ३१-०५-२०२६)



**श्री. शिवाजी राजाराम मोरे**

(कार्यालयीन सेवक)

(निवृत्ती दि. ३१-०५-२०२६)

# मराठी विभाग (वरिष्ठ)

**मी शब्दांच्या घालुनि बसतो अमाप राशी,**
**जखमी होता धावत जातो शब्दांपाशी,**
**शब्दच झाले मालक आता सर्व जिण्याचे,**
**जनावराने काबीज केला हा दरवेशी.**
**- कुसुमाग्रज**

विभाग संपादक
**डॉ. कृष्णा भवारी**



# अनुक्रमणिका (गद्य विभाग)


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्त्रीशक्तीचा एल्गार : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर | प्राची जोतिराम जाधव, F.Y.B.A | २७ |
| २ | प्रा. राम पवारः तीन विद्यापीठांच्या स्टॅट्यूटचे निर्माते | मंजू गणपतीनाटेकर, T.Y.B.A | ३० |
| ३ | आम्ही भारताचे लोक | पूनम संजय सरगर, T.Y.B.A | ३२ |
| ४ | भूक | उत्कर्षा शहाजी कापसे, F.Y.B.Sc | ३५ |
| ५ | सांगली ते वाराणसी : एक अविस्मरणीय प्रवास | आरती रामकेश केवट, S.Y.B.A | ३८ |
| ६ | डॉ. तारा भवाळकर – व्यक्ती आणि वाङ्मय | प्रगती रवींद्र खैरे, S.Y.B.A | ४० |
| ७ | देशाच्या भवितव्यासाठी आजच्या युवकाचे योगदान | सानिका शिवानंद आंबी, T.Y.B.Com | ४२ |
| ८ | छत्रपती संभाजी महाराज | पायल विलास गोसावी, T.Y.B.Sc | ४४ |
| ९ | लाईक, शेअर आणि सबस्क्राईब | सानिका प्रकाश लोहार, F.Y.B.Com | ४६ |
| १० | शांतिनिकेतन ते डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (व्हाया मार्केट यार्ड) | प्रा. संजय ठिंगळे | ४८ |


# (पद्य विभाग)


| अ. क्र. | कवितेचे शीर्षक | कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | न उलगडणारं कोडं | नेहा श्रीकांत जमादार, F.Y.B.Com | २९ |
| २ | आज काहीतरी हरवल्यासारखं वाटतयं | साक्षी जयवंत कदम, T.Y.B.A | ३७ |
| ३ | मला जिंकायचंय सारं... | परवेज जावेद मानेखान, T.Y.B.Sc | ४३ |
| ४ | माय माझी सरस्वती... | धनश्री अशोक माने, F.Y.B.Com | ४५ |
| ५ | प्रेम | प्रेम विद्याधर कांबळे , S.Y.B.A | ५७ |
| ६ | शाळा | मंजू गणपती नाटेकर, T.Y.B.A | ५८ |
| ७ | सुंदर जीवनाच्या वाटेवर | दीपाली बाळू ऐवळे, T.Y.B.Sc | ५८ |

# भारतीय स्त्रीशक्तीचा एल्गार : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

## चरित्रात्मक लेख

– **प्राची जोतिराम जाधव,** F.Y.B.A



अखिल भारत वर्षाचे श्रद्धास्थान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती आपण साजरी करत आहोत. त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

भारतीय इतिहासात अनेक राजे-राण्यांनी आपल्या पराक्रमाने आणि कार्यक्षमतेने अमिट ठसा उमटवला आहे; परंतु जनतेच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या, न्यायप्रिय आणि आदर्श प्रशासन देणाऱ्या राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्यंत उंचावर आहे. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा सखोल विचार करणे म्हणजे भारतीय संस्कृतीतील आदर्श नेतृत्वाचे दर्शन होय. अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी येथे झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. लहानपणापासूनच अहिल्याबाई अत्यंत बुद्धिमान, संवेदनशील आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्या काळात मुलींना शिक्षणाची संधी कमी मिळत असतानाही त्यांनी वाचन, लेखन आणि धर्मग्रंथांचे ज्ञान आत्मसात केले. अहिल्याबाईंच्या गुणांनी प्रभावित होऊन मराठा साम्राज्यातील नामांकित सरदार मल्हारराव होळकर यांनी त्यांचा विवाह आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी लावला. विवाहानंतर त्या होळकर घराण्यात आल्या आणि त्यांनी घरगुती तसेच राजकीय जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्यास सुरुवात केली.

अहिल्याबाईंच्या आयुष्यात अनेक दुःखद घटना घडल्या. अहिल्याबाई होळकर यांच्या आयुष्यातील सर्वांत कठीण आणि निर्णायक टप्पा म्हणजे त्यांचे पती खंडेराव होळकर यांच्या निधनानंतरचा काळ होय. १७५४ साली कुम्भेरच्या युद्धात खंडेराव होळकर यांचा मृत्यू झाला. हा प्रसंग अहिल्याबाईंसाठी अत्यंत दुःखद आणि जीवनाला वळण देणारा ठरला. पतीच्या निधनानंतर त्या काळातील प्रथेनुसार अहिल्याबाईंनी सती जाण्याचा विचार केला होता. त्या आपल्या पतीप्रति अत्यंत निष्ठावान होत्या; परंतु त्यावेळी त्यांच्या सासऱ्यांनी, म्हणजेच मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून थांबवले. त्यांनी अहिल्याबाईंना समजावले की, राज्य आणि प्रजेची जबाबदारी सांभाळणे हेच त्यांच्या जीवनाचे खरे ध्येय आहे. हा प्रसंग त्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा वळणबिंदू ठरला. पतीच्या निधनानंतर अहिल्याबाईंच्या आयुष्यात दुःखाचे सावट आले असले, तरी त्यांनी स्वतःला खचू दिले नाही. उलट त्यांनी धैर्याने परिस्थितीला सामोरे जात आपली जबाबदारी ओळखली. त्यांनी घरातील आणि राज्यातील कामकाजात अधिक लक्ष घालायला सुरुवात केली. मल्हारराव होळकर यांनीही त्यांना प्रशासनाचे प्रशिक्षण दिले आणि त्यांच्यावर विश्वास ठेवला.

यानंतर १७६६ मध्ये मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. त्यामुळे अहिल्याबाई पूर्णपणे एकट्या पडल्या. राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार हाती घेणे ही अत्यंत दुर्मीळ गोष्ट होती, त्यामुळे अनेकांनी

त्यांना विरोध केला. काही सरदारांनी त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले; परंतु अहिल्याबाईंनी आपल्या धैर्य, बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टीच्या जोरावर सर्व विरोधकांना उत्तर दिले. त्यांनी शांतपणे आणि संयमाने परिस्थिती हाताळली. त्या एक सक्षम शासक आहेत, हे त्यांनी सिद्ध केले. त्यांनी योग्य सल्लागारांची मदत घेतली आणि प्रशासन सुयोग्य रीतीने चालवले. या कठीण काळात त्यांना वैयक्तिक दुःखांनाही सामोरे जावे लागले. पुढे त्यांच्या मुलाचा, म्हणजेच मालेराव होळकर याचाही मृत्यू झाला. तरीही त्यांनी कधीही आपल्या कर्तव्यापासून माघार घेतली नाही.

या सलग आघातांनंतरही अहिल्याबाईंनी धैर्य न गमावता राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. या सर्व प्रसंगांनी अहिल्याबाई अधिक मजबूत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ बनल्या. त्यांनी वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून प्रजेच्या सेवेला प्राधान्य दिले. त्यांच्या या संघर्षमय जीवनामुळेच त्या एक महान आणि आदर्श शासक म्हणून ओळखल्या जातात. त्या काळात स्त्रियांनी राज्यकारभार सांभाळणे अत्यंत कठीण होते; परंतु त्यांनी आपल्या कार्यक्षमतेने सर्वांना प्रभावित केले. अहिल्याबाई होळकर यांनी इंदूर-महेश्वर येथून राज्यकारभार चालवला. त्यांचे प्रशासन अत्यंत सुबक, पारदर्शक आणि लोकाभिमुख होते. त्यांनी करप्रणाली सुलभ केली, शेतीला प्रोत्साहन दिले आणि व्यापार वाढवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या.

अहिल्याबाईंनी लोकांच्या कल्याणासाठी अहोरात्र प्रयत्न केले. समाजाच्या सर्व घटकांसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी रस्ते, विहिरी, तलाव, धर्मशाळा आणि घाट बांधले. यात्रेकरूंना सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. गरीब आणि गरजू लोकांसाठी मदतकार्य सुरू केले. त्यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष प्रयत्न केले. विधवांसाठी पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणे, त्यांना आर्थिक मदत देणे, अशा अनेक सुधारणा त्यांनी केल्या. तसेच अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक कार्यही अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतातील अनेक प्राचीन मंदिरांचे जीर्णोद्धार केले आहेत. विशेषतः काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर तसेच गंगेच्या घाटांचे बांधकाम त्यांनी केले. त्यांच्या या कार्यामुळे भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन तर झालेच; परंतु तीर्थक्षेत्रांना नवसंजीवनी मिळाली आहे. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवत सर्व धर्मांना समान आदर दिला.

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य, विचार आणि जीवनशैली काळाच्या पलीकडे जाऊनही समाजाला प्रेरणा देत राहतात. त्यांपैकी एक म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, हे असेच एक तेजस्वी आणि आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. त्या केवळ एक पराक्रमी राणी नव्हत्या, तर न्यायप्रिय शासक, करुणामयी समाजसेविका आणि उच्च मूल्यांचे प्रतीक होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, न्यायप्रियता, लोकसेवा, धार्मिक सहिष्णुता आणि धैर्य यांचा सुरेख संगम दिसून येतो. अहिल्याबाईंचे जीवन अत्यंत साधे आणि अनुशासित होते. अहिल्याबाईंच्या जीवनातील सर्वांत ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा साधेपणा. राजघराण्यातील असूनही त्यांनी कधीही ऐश्वर्याचा मोह ठेवला नाही. त्या अत्यंत साधे वस्त्र परिधान करत आणि साध्या जीवनशैलीत राहत. त्यांच्या या साधेपणामुळे त्या प्रजेच्या अधिक जवळ गेल्या. 'साधे जीवन, उच्च विचार' या तत्त्वाचा त्यांनी प्रत्यक्ष जीवनात अवलंब केला होता. त्यांच्या या गुणामुळे प्रजेच्या मनात त्यांच्याबद्दल अपार आदर आणि आपुलकी निर्माण झाली होती. त्या एक आदर्श शासक, कर्तव्यदक्ष माता आणि समाजसेविका होत्या.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचा गुण म्हणजे न्यायप्रियता. त्यांच्या न्यायदानाची पद्धत अत्यंत लोकप्रिय होती. त्यांच्या दरबारात कोणालाही अन्याय सहन करावा लागत नसे. त्यामुळे 'न्यायप्रिय राणी' म्हणून त्यांची इतिहासामध्ये एक वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. त्या रोज स्वतः दरबार भरवत आणि प्रजेच्या तक्रारी ऐकत. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता त्या सर्वांना समान न्याय देत. जाती, धर्म, पद किंवा संपत्ती यांचा त्यांच्या निर्णयांवर कोणताही प्रभाव पडत नसे. त्यामुळे त्यांच्या न्यायदानावर लोकांचा पूर्ण विश्वास होता. त्यांना 'न्यायाची देवी' म्हणूनही गौरवले गेले, हे त्यांच्या निष्पक्षतेचे द्योतक आहे.

त्यांचे नेतृत्वगुण आणि दूरदृष्टीही उल्लेखनीय होती. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, नियोजन आणि

पारदर्शकता ठेवली होती. संकटाच्या काळात त्यांनी धैर्याने आणि संयमाने निर्णय घेतले. पती आणि सासऱ्यांच्या निधनानंतरही खचून न जाता त्यांनी राज्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या या धैर्यामुळे आणि आत्मविश्वासामुळे त्या एक यशस्वी आणि आदर्श शासक ठरल्या. त्यांच्या स्वभावात दयाळूपणा आणि करुणा हे गुणही ठळकपणे दिसून येतात. त्यांनी नेहमीच दुर्बल आणि गरजू लोकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला होता. न्याय देताना त्यांनी मानवी मूल्यांचा विचार केला. त्यामुळे त्यांनी 'लोकमाता' म्हणून इतिहासामध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली. अहिल्याबाईंच्या व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांचे शासन आदर्श ठरले आहे. त्यांनी केलेल्या प्रशासनात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास यांना विशेष महत्त्व होते. त्यांचे राज्य हे 'रामराज्य' मानले जाते, कारण त्यांच्या काळात प्रजा सुखी, सुरक्षित आणि समाधानी होती.

अहिल्याबाई होळकर यांचे आयुष्य जसे कर्तृत्वपूर्ण आणि लोकसेवेसाठी समर्पित होते, तसेच त्यांचा शेवटही शांत आणि आदर्शमय होता. जीवनाच्या अखेरच्या काळातही अहिल्याबाई राज्यकारभारात सक्रिय होत्या. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या प्रजेची सेवा केली. वैभव किंवा सत्तेचा त्यांना कोणत्याही प्रकारचा मोह नव्हता; त्यांच्या आयुष्याचा मुख्य उद्देश लोककल्याण हाच होता. त्यांचे निधन १३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर येथे झाले. त्या वेळी त्यांचे वय सुमारे ७० वर्षे होते. अहिल्याबाईंच्या मृत्यूनंतरही त्यांची कीर्ती आणि कार्य जिवंत राहिले आहे. त्यांनी उभारलेली मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि प्रशासनाची आदर्श पद्धत आजही त्यांच्या महानतेची साक्ष देतात. त्यांच्या कार्यामुळेच त्यांना 'पुण्यश्लोक' ही उपाधी प्राप्त झाली आहे.

म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या इतिहासातील एक महान व्यक्ती तर आहेतच; परंतु आजही अखंड भारताच्या त्या प्रेरणास्त्रोत (स ला रो हवाय)आहेत. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांचे स्मरण न करता त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात उतरवणे आवश्यक आहे. त्यांच्या जीवनातून असे दिसून येते की, सत्ता म्हणजे केवळ राज्य करणे नव्हे, तर जनतेची सेवा करणे होय. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या गौरवशाली जीवनकार्यास कोटी कोटी अभिवादन!

***

### ...* न उलगडणारं कोडं *...

आयुष्य हे न उलगडणारं गणिताचं कोडं आहे
कितीही गुणण्याचा प्रयत्न केला तरी सुखाचा
भागाकार होत आहे.
हसत खेळत सर्वांना बेरजेत धरावं म्हटलं तरी
नात्यातील गोडवा वजा होत आहे.
दैनंदिन कामाची लसावी करावं म्हटले तरी
संध्याकाळी हिशोबात मसावी होत आहे.
आयुष्याचा पूर्णांक शोधावं म्हटलं तरी
सारा वर्तमान अपूर्णांकात आहे.
रेषाखंड बनून स्थिर राहावं म्हटलं तरी
आयुष्याचे वर्तुळ अस्थिर आहे.
आयुष्याचा व्यास सीमित वाटला तरी
अपेक्षांची रेषा वाढतच आहे.
संकटांना छेद देईल म्हटलं तर
नियती पुढे माणूस शून्य आहे.

**– कु. नेहा श्रीकांत जामदार**
प्रथम वर्ष वाणिज्य

***

# प्रा. राम पवारः तीन विद्यापीठांच्या स्टॅट्यूटचे निर्माते



**व्यक्तिचित्रण लेख**

– **मंजू गणपती नाटेकर,** F.Y.B.A
(मार्गदर्शक – डॉ. कृष्णा भवारी)

काही माणसांचा जन्मच मुळात जन-कल्याणासाठी, जनहितासाठी झालेला असतो. अशा माणसांना लौकिक अर्थाने सत्पुरुष किंवा सद्गृहस्थ म्हणून ओळखले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील अग्रगण्य विद्यापीठांतील अभ्यासू, संघटना आणि चळवळीतील एक लढवय्या शिलेदार म्हणून ज्यांची ख्याती सर्वदूर पसरली आहे असे तत्त्वनिष्ठ, तत्त्वचिंतक, बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. राम पवार.

राम पवार यांचे शांतिनिकेतनशी नाते जडले ते १९७० पासून. थोडक्यात, १९७० ते १९८५ हा त्यांच्या आयुष्यातील एक सुवर्णकाळ होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही; कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची बीजे खऱ्या अर्थाने रुजली ती याच काळात. वास्तविक पाहता ते भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक; परंतु त्यांचे व्यक्तिमत्त्वच एवढे भारदस्त आणि करारी होते की, ते फिजिकल डायरेक्टरच वाटायचे. महाविद्यालयाच्या मैदानात उभे राहिल्यानंतर आणि शिट्टीचा आवाज आल्यानंतर सर्वत्र एक दरारा निर्माण होत असे. अगदी विद्यार्थी दशेपासून त्यांना वाचनाची प्रचंड आवड असल्यामुळे सामाजिक आणि संघटनात्मक काम करण्यास त्यांना याचा खूप उपयोग झाला. मराठी साहित्याची त्यांना प्रचंड आवड. पु. ल. हे त्यांचे आवडते लेखक. त्याचबरोबर चित्रपट पाहणे आणि क्रिकेटप्रेमी म्हणून त्यांची एक वेगळीच ओळख होती. कोणत्या चित्रपटातील गीत, कोणी गायले आहे हे त्यांना झोपेत जरी विचारले तरी ते अचूक सांगतील इतका छंद त्यांना जडला होता. एवढेच नव्हे तर एखाद्या गाण्याला संगीत कोणी दिलेले आहे, त्याचे दिग्दर्शक कोण आहेत याची इत्थंभूत माहिती ते सांगू शकत. त्याचबरोबर क्रिकेटमधील नियम आणि शक्यता ते अचूक सांगत असत.

शिवाजी विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये त्यांची निवड झाली आणि आपल्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी पुढे तीन विद्यापीठांच्या स्टॅट्यूटचे काम पाहिले. या काळात त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केली. अनेक प्राध्यापकांच्या पडत्या काळात ते दत्त म्हणून उभे राहिले. स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून त्यांनी अनेक प्राध्यापकांना न्याय मिळवून दिला आहे. तत्त्वनिष्ठ जीवन ते स्वतः जगले आणि इतरांनाही जगायला शिकविले. सुटा संघटनेवर त्यांचे प्रचंड प्रेम आणि निष्ठा होती. शिक्षकांचे हक्क कसे सुरक्षित राहतील याकडे त्यांचा नेहमी कटाक्ष असायचा. ते शिक्षकांप्रमाणेच विद्यार्थ्यांचेही प्रश्न सोडवत असत. एवढेच नव्हे तर अनेक संस्थांचे प्रश्न देखील त्यांनी सोडवले आहेत.

त्यांचा स्वभाव अतिशय मृदू; पण अन्याया विरुद्ध बोलताना त्यांचे तेजःपुंज व्यक्तिमत्त्व उठून दिसायचे. विद्यापीठ कायद्याचा त्यांचा गाढा अभ्यास असल्यामुळे त्यांच्याविषयी सर्वत्र चर्चा होत असे. त्यांची विद्वत्ता सर्वांना प्रभावित करणारी होती. त्या काळात त्यांनी स्वतःची वैचारिक बैठक निर्माण केली होती. अर्थात त्यामुळेच सुटा संघटनेचे ते एक आधारवड बनून राहिले होते.

समाजात वयाने, विद्वत्तेने, कर्तृत्वाने आणि अनुभवाने अनेक थोर मोठी माणसे भेटतात. राम पवारांच्या अंगी वरील सर्व गुण असल्यामुळे ते लोकप्रिय झाले होते. जीवनात तीन प्रकारची माणसे आपल्याला पाहायला मिळतात, सामान्य, मोठी, प्रचंड मोठी. प्रा. राम पवार हे तिसऱ्या गटातील आहेत.

त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड मोठे असूनही ते सामान्य राहिले हे विशेष. राम पवार म्हणजे कुतुहलाचा विषय; कारण इतका अभ्यासू माणूस, इतका विद्वान माणूस; परंतु तो इतका सामान्य वागतो हे सगळ्यांनाच आश्चर्यचकित करणारे होते. संघटनेचे कार्यकर्ते असू द्या, विद्यार्थी असू द्या, पै पाहुणे असू द्या, त्यांच्या घरी गेल्यानंतर 'अतिथी देवो भवः' अशीच ते प्रत्येकाला वागणूक देत असत. कोणतेही काम करत असताना ते आपल्या वैचारिक मूल्यांपासून कधीही ढळलेले नाहीत. जे चूक ते चूकच आणि जे बरोबर ते कुठल्याही परिस्थितीत बरोबरच! हे ठामपणे सांगणारे राम पवार म्हणजे राजहंसच!

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत काही महत्त्वाच्या व्यक्तींचा सिंहाचा वाटा आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रहिमतपूर येथील वा. गो. परांजपे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांच्या मनावर प्रभाविकपणे उमटला होता. त्यानंतर १९४२ रोजी डिलीट झालेल्या नेरकर सरांचा दुसरा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला आहे. असा परहित जीवन जगणारा अवलिया म्हणजे राम पवार! शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या उच्च स्थानी असणारी व्यक्ती किंवा इतर मान्यवर सांगली परिसरातून प्रवास करत असताना राम पवारांच्या घरी भेट दिली नाही असे कधीच झाले नाही; एवढी आपुलकी सर्वांच्याच मनात त्यांच्याबद्दल होती.

अवघड प्रसंग कसे झेलावेत हे त्यांच्याकडून शिकावे. थोडक्यात, सामान्य माणसांत ऊर्जा निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे राम पवार. ते कधीही, कुणालाही नकारात्मक सल्ला देत नसत. नेहमी आशावादी असणारा हा माणूस! त्यांच्या जाण्याने निश्चितच समाजाची प्रचंड मोठी हानी झालेली आहे, असे म्हटले जाते की, माणूस गेल्यानंतर त्यांचे काम, त्यांची दृष्टी, त्यांची नैतिकता, परंपरा पुढे ठेवायची असते. समाज परिवर्तनाच्या चळवळीमध्ये त्यांचे जे योगदान होते ते पुढे पोहोचवण्यासाठी निश्चितच प्रयत्न करू या.

वर्गात जाताना ते नेहमी अभ्यास करून, टापटीप, तयार होऊन जायचे. अशा वेळी त्यांचे सहकारी त्यांना म्हणायचे, ''अहो सर, एवढे काही नटून-थटून जाण्याची गरज नाही.'' त्यावेळेस ते त्यांना म्हणायचे, ''आपल्यासमोर बसलेल्या विद्यार्थ्यांना आपला कंटाळा येऊ नये एवढी काळजी आपण घेतली पाहिजे. आपण तसे बोलले, वागले पाहिजे.'' हे त्यांचे लाखमोलाचे विचार आजही मनाला स्पर्शून जातात.

आपल्या कुटुंबाबद्दलही ते नेहमी आपुलकीने, प्रेमाने वागत असत. ते नेहमी म्हणत असत की, पुढच्या जन्मी मिळाले तर हेच कुटुंब मला मिळाले पाहिजे. मला हीच पत्नी असावी, हीच मुले असावीत, हेच मित्र असावेत अशी अपेक्षा व्यक्त करणारा ही एकमेव व्यक्ती असावी असे वाटते. अगदी विद्यार्थ्यांची लग्नं ठरवण्यापासून ते कौटुंबिक प्रश्न सोडवण्यापर्यंत सरांचा हातखंडा असायचा. एखाद्या मुलीने नकार दिला, तर मुला मुलींच्या आई-वडिलांना भेटणे, त्यांची मते परिवर्तीत करण्यामध्येही त्यांचा हातखंड असायचा. म्हणून कित्येक जणांचा संसार उभे करण्याचे पुण्य त्यांना लाभले होते.

विशेष म्हणजे त्यांच्या कामाचे कौतुक केलेले त्यांना कधीही आवडत नसायचे. ते नेहमी म्हणायचे, ''कौतुक डोक्यात ठेवायचे नाही. माणसे कधीच विसरायची नाहीत. माणसांबरोबर राहा, आयुष्यात आपले काम बोलते. काम बोलले पाहिजे. तुमच्या मागे जे बोलतील ते खरे असते. तोंडावर तर कोणीही चांगले बोलतात.'' इतके प्रगल्भ आणि अंतर्मुख करणारे विचार राम पवारांचे असायचे. हे त्यांचे विचार सामान्य माणसासाठी एक संजीवनी होती.

राम पवार यांनी आपल्या आयुष्यात अनेक संघर्ष पाहिले. या संघर्षातून ते स्वतः उभे राहिले; परंतु शेवटी माणूस म्हणून ते कधीकधी पराभूतही झालेले दिसले, खचलेले दिसले. सर्वांत पहिला धक्का बसला तो म्हणजे, ते लहान असतानाच वडिलांचे झालेले निधन आणि संघर्ष म्हणजे काय असतो हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले. दुसरा प्रसंग म्हणजे जेव्हा त्यांच्या धर्म पत्नीचे निधन झाले; तो शेवटचा धक्का होता. त्यांनी आयुष्यात अनेक संघर्ष पचवले, काही जिंकले; परंतु मृत्यूशी केलेल्या एकमेव संघर्षात ते पराभूत झाले याचे दुःख मनाला वेदना देणारे आहे.

***

# आम्ही भारताचे लोक

## (भारतीय संविधान अमृत महोत्सवा निमित्त विशेष लेख)

### माहितीपर लेखन

– कु. पूनम संजय सरगर, T.Y.B.A

भारतीय संस्कृतीच्या उदात्त परंपरेत 'वसुधैव कुटुम्बकम्' आणि 'समत्वयोग उच्यते' यांसारख्या विचारांनी सर्व मानवजातीतील एकात्मता आणि समानतेचा संदेश दिला. तोच धीरोदात्त विचार भारतीय संविधानाने आपल्या पुढे ठेवला. अनेक धर्म, हजारो जाती, उपासनेच्या वेगवेगळ्या पद्धती या सर्वांतून एकत्वाची भावना आणि भारतीयत्व जागृत करणारा दस्तऐवज म्हणजे 'भारतीय संविधान' होय.

एखाद्या देशाची भक्कम इमारत उभी करत असताना कोणत्या परिस्थितीतून तो देश उभा आहे त्यापेक्षा त्याचे भवितव्य निर्धारित करण्याची क्षमता ही त्या देशाच्या संविधानामध्ये असते. आज भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना या संविधानाने भारतीयांच्या जीवनात केलेला आमूलाग्र बदल आपल्याला प्रकर्षाने जाणवतो. जुन्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीवर मात करीत समानता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता यांची मूल्ये भारतीय जनतेत रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतीय संविधानाने केले आहे. भारतीय संविधानाचा अभ्यास करत असताना आपल्याला प्रामुख्याने तत्कालीन भारतीय परिस्थिती व संविधान निर्मितीची पार्श्वभूमीही विचारात घ्यावी लागते.

१९१९ चा भारत प्रशासन (माँटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा) कायद्यानुसार भारतीय कायदेमंडळाला कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवण्यात आले. भारतीय प्रांतांमध्ये द्विदल पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. प्रांतिक सरकारच्या खात्यात राखीव व सोपीव खाती असे प्रकार पाडण्यात आले. पोलीस, न्याय, जमीन, महसूल, कालवे अशी खाती गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाकडे देण्यात आली, तर शिक्षण, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य, आरोग्य, उद्योगधंदे, जंगले अशी सोपी खाती लोकनियुक्त मंत्र्यांकडे देण्यात आली.

यानंतर १९३५ चा भारत प्रशासन कायदा अस्तित्वात आला. या कायद्याचा अनन्य साधारण प्रभाव भारतीय संविधानावर असलेला आपल्याला दिसून येतो. या कायद्यातील तरतुदीनुसार भारतामध्ये संघराज्य शासनपद्धती सुरू करण्यात आली. केंद्र सरकार व घटकराज्य सरकार यांच्यात अधिकार विभागणी करण्यात आली व प्रांतातील द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग बंद करून जबाबदार शासनपद्धती स्वीकारण्यात आली. भारतीय संघराज्यासाठी संघीय न्यायालयाची तरतूद करण्यात आली. १९३९ वर्षी दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात होताच ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांना विश्वासात न घेता भारत इंग्लंडच्या बाजूने महायुद्धात उतरत आहे असे घोषित केले. याचा विरोध म्हणून काँग्रेस मंत्रिमंडळाने आपला राजीनामा दिला व काँग्रेसचा पुन्हा ब्रिटिश सरकारशी संघर्ष सुरू झाला. यातूनच १९४२ रोजी 'चले जाव' च्या घोषणे द्वारे प्रत्यक्ष विरोधाला काँग्रेस उभा राहिली. तत्कालीन पंतप्रधान चर्चिल यांनी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली भारतात एक मंडळ पाठवले व युद्ध समाप्ती बरोबर भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल अशी घोषणा केली. 'दिवाळे निघालेल्या बँकेवर काढलेला पुढील तारखेचा चेक' अशा शब्दांत गांधीजींनी क्रिप्स योजनेचा निषेध केला; परंतु ही योजना अयशस्वी ठरली. १९४६ रोजी ब्रिटनचे पंतप्रधान लॉर्ड ॲटली यांनी आपल्या मंत्रिमंडळातील तीन मंत्री भारतात पाठवले. त्रिमंत्री योजना याद्वारे ब्रिटिश, भारत व संस्थाने यांचे मिळून संघराज्य निर्माण करण्यात येईल. प्रांतिक कायदेमंडळांची एक घटना समिती तयार करावी व घटना समितीत ३८९ सदस्य असतील अशी घोषणा केली. २४ ऑगस्ट १९४६

रोजी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी हंगामी सरकार स्थापनेची घोषणा केली. लॉर्ड माउंटबॅटन योजना (१९४७) द्वारे पंजाब व बंगाली या दोन प्रांतांचे विभाजन करून हिंदू लोकांचा भाग भारताला, मुस्लिम लोकांचा भाग पाकिस्तानला जोडण्यात येईल अशी घोषणा केली. देशी राज्यांना कोणत्याही राज्यात सामील व्हायचे किंवा स्वतंत्र राज्य म्हणून राहण्याचे स्वातंत्र्य देण्यात येईल; फाळणी झाल्यास एक सीमा भाग म्हणून भारत पाकिस्तान या देशांच्या सीमा निश्चित करण्यात येतील ही घोषणा केली.

१८ जुलै १९४७ ब्रिटिश पार्लमेंटने मंजुरी देऊन भारतीय स्वातंत्र्याचा कायदा मंजूर केला. याद्वारे १५ ऑगस्ट १९४७ पासून भारत व पाकिस्तान हे दोन देश अस्तित्वात आले. कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्यात आली. २९२ जागांपैकी दोनशे अकरा जागा काँग्रेस पक्षाला व ७२ जागा मुस्लिम लीग या पक्षाला मिळाल्या. काँग्रेस पक्ष, मुस्लिम लीग, इंडियन वर्गीकृत जाती संघटना, पारशी उद्योग व्यवसाय, अँग्लो इंडियन शीख, आदिवासी संस्था, स्त्रिया, कायदे पंडित इत्यादी गटांचे प्रतिनिधी घटना समितीत होते. डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, राधाकृष्ण, कृष्णा स्वामी अय्यर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कन्हैयालाल मुन्शी, हृदयनाथ कुंजरू, सच्चिदानंद सिन्हा, श्यामाप्रसाद मुखर्जी, दुर्गाबाई देशमुख, जॉन मथाई, रामनाथ गोयंका यांसारख्या समाजाच्या सर्व स्तरांतील, अनुभवी व हुशार व्यक्तींचा घटना समितीत समावेश करण्यात आला होता. घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली व तात्पुरते अध्यक्षपद सच्चिदानंद सिन्हा यांच्याकडे देण्यात आले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. ते घटना समितीचे पूर्ण काम होईपर्यंत अध्यक्ष होते. ०९ डिसेंबर १९४६ रोजी सुरू झालेले घटना समितीचे कामकाज २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत चालले. घटना समितीचे कार्य ०२ वर्षे ११ महिने १८ दिवस चालले. घटना परिषदेच्या एकूण ११ बैठका झाल्या. या बैठकांना १६५ दिवस लागले. घटनेच्या मसुद्यावर ११४ दिवस चर्चा करण्यात आली. समितीच्या कामकाजावर ६३, ९६, ७२९ रुपये खर्च करण्यात आले. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार घटना समितीला अधिकृत समिती म्हणून दर्जा प्राप्त झाला. घटना परिषदेच्या २९ ऑगस्ट १९४७ रोजी भरलेल्या बैठकीत मसुदा समितीची निर्मिती करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, सय्यद मोहम्मद सादुल्ला, बी. एन. राव, एन. माधवराव, टी. टी. कृष्णमाचारी, के. एम. मुन्शी इत्यादी सदस्य या समितीत होते. या समितीने राज्यघटनेचा प्रथम मसुदा तयार केला व त्यावर हरकती मागविण्यात आल्या. या मसुद्यावर भारतीय जनतेकडून ७६३५ सूचना आल्या. त्यांपैकी २४७३ सूचनांवर घटना समितीने प्रत्यक्षपणे चर्चा केली व १४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर १९४९ या काळात तिसरे वाचन होऊन राजेंद्र प्रसाद यांच्या सहीने घटनेला मंजुरी देण्यात आली. घटना परिषदेने मंजूर केलेल्या भारतीय घटनेत ३९५ कलमे व ०९ परिशिष्टे होती. प्रत्यक्ष राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू करण्यात आली.

आपण ॲरिस्टॉटलने १५८ वेगवेगळ्या राज्यघटनांचा अभ्यास केलेला पाहिला. याच अनुषंगाने भारतीय घटनाकारांनी सुद्धा भारताचे संविधान तयार करत असताना आपल्याकडे असणाऱ्या फक्त उचित सामग्रीचा वापर न करता जगभरातील वेगवेगळ्या संविधानांचा अभ्यास केला व त्या संविधानातील चांगल्या चांगल्या गोष्टी आपल्या संविधानात घेऊन आपले संविधान कसे पारदर्शी व लोकांच्यासाठी, लोकांना हक्क देणारे बनवता येतील याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राज्यघटनेतून पंतप्रधान, मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी, अमेरिकेच्या राज्यघटनेतून लिखित राज्यघटना, उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार, केंद्राच्या राज्यघटनेतून संघराज्य पद्धती, सोव्हिएत रशियाच्या राज्यघटनेतून मूलभूत कर्तव्ये, पंचवार्षिक योजना स्वीकारल्या. या भारतीय संविधानाच्या उद्देशिकाची सुरुवातच आम्ही भारताचे लोक' याद्वारे होते. भारतीय जनतेच्या इच्छेतून, संमतीतून भारतीय राज्यघटनेची निर्मिती झालेली आहे व भारतीय जनता हीच ह्या घटनेचे खरे उगमस्थान व खरा आधारस्तंभ आहे.' असे घटनाकारांनी नमूद केले आहे.

भारतीय संविधानाची ७५ वर्षे पूर्ण होत असताना आपण जर राज्यघटनेचा नीट अभ्यास केला तर खूप काही गोष्टी भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना दिलेल्या दिसून येतात. भारतीय संविधानाची ७५ वर्षे पूर्ण होत असताना आपण पाहिले की, भारतीय संविधानाने भारताचे स्वरूप स्पष्ट करताना भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व गणराज्य असलेला देश असेल हे जाहीर केले. भारतातील नागरिकांना न्याय या माध्यमातून राजकीय न्याय, आर्थिक न्याय, सामाजिक न्याय मिळवून दिले आहेत. स्वातंत्र्य या विचारातून नागरिकांना विचार, उच्चार, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य मिळवून देण्याची शाश्वती भारतीय संविधानाने दिली आहे. संविधानात समता या तत्त्वाचा समावेश करून भारतीय नागरिकांना समान दर्जा व समान संधी याबद्दल समानतेची वागणूक मिळेल याची शाश्वती देण्यात आली आहे. भारतामध्ये विविध धर्मांचे, जातींचे, भाषांचे लोक राहत असल्यामुळे त्यांच्यात धार्मिक वाद, भाषावाद व निर्माण होणे शक्य आहे. तेव्हा राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता टिकवण्यासाठी, बंधुता निर्माण करण्याची गरज आणि ते उद्दिष्ट भारतीय संविधानाने मान्य केले आहे. भारतीय संविधानाने आपल्या तिसऱ्या भागामध्ये भारतीय नागरिकांना मूलभूत अधिकार दिलेले आहेत. या अधिकारांद्वारे संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये समतेचे अधिकार स्पष्ट केले आहेत. यातून धर्म, पंथ, वंश, जात, लिंग यातील कोणत्याही प्रकारे स्त्री व पुरुष यांच्यामध्ये भेद केले जाणार नाही, हे स्पष्ट करून स्त्री पुरुष असमानतेचा हजारो वर्षांचा इतिहास संविधानाने पहिल्याच मूलभूत अधिकारात पुसून काढला आहे. कलम १७ मध्ये अस्पृश्यतेचे निर्मूलन करून अस्पृश्यता पाळण्याला मनाई व अस्पृश्यता पाळणे हा शिक्षेस पात्र गुन्हा समजण्यात आला आहे. या कलमाद्वारे सामाजिक समरसता निर्माण करून उच्च नीचतेचा भेद मिटवून सर्व भारतीयांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे. पुढील कलमांमध्ये स्वातंत्र्याचे अधिकार देऊन स्वतःच्या उन्नतीसाठी यथोचित प्रयत्नांची संधी दिली आहे. शोषणा विरुद्धचा अधिकार, स्वतःच्या सद्सदविवेक बुद्धी प्रमाणे आवडत्या धर्माचा स्वीकार, उपासना यांची परवानगी घटनेने दिली आहे. मात्र यात कोणावरही जबरदस्ती केली जाणार नाही याची खबरदारी देखील घटनेने घेतली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, कलम ३२ हे नागरिकांच्या दृष्टीने सर्वांत ताकद असलेले कलम आहे. या द्वारे घटनेतील मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची तरतूद या कलमात केली आहे. अधिकारांच्या उल्लंघनासाठी पाच प्रकारांच्या आदेशाचे शस्त्र न्यायालयाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

भारतीय संविधानाची ७५ वर्षे पूर्ण होत असताना उदात्त हेतूने निर्माण केलेली राज्यघटना आणि योग्य वाजवी हेतूसाठी त्यातील बदल करण्यासाठी दिलेली परवानगी व सोबत ज्यांच्या हातात आहे त्यांनी केलेला त्याचा वापर यावरच ती कार्यक्षम ठरेल हे घटनाकारांनी नमूद केले होते. आज ७५ वर्षांच्या कार्यकाळाचा मागोवा घ्यायचा म्हटलं, तर भारतीय संविधानाने भारतातील माणसाला माणूस म्हणून उभा करायचे फक्त काम केले नाही तर त्याच्या विचाराला सुद्धा चालना दिली आहे. कोणत्याही विचारांचे सरकार सत्तेवर असो मात्र त्या सरकारच्या जनसेवेची गुरुकिल्ली ही संविधानातच असल्याचे दिसून येते. ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने भारतीय शासन व्यवस्था तिहेरी बनलेली दिसून येते. महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळत असून ३३% आरक्षणाच्या माध्यमातून महिलासुद्धा या विकसनशील भागाचे यशस्वी नेतृत्व करताना आपल्याला दिसून येत आहेत. काही देशांमध्ये पन्नास वर्षांच्या कार्यकाळात ४ वेळा संविधान बदलण्यात आले. मात्र आज ७५ वर्षे पूर्ण होत असताना देखील भारतीय संविधान आजच्या २१ व्या शतकातील संकटांवर मात करून काल तयार झाल्याप्रमाणे ठामपणे उभे आहे.

***

# भूक

## कथा

– कु. उत्कर्षा शहाजी कापसे, F.Y.B.Sc.

मुसळधार पावसानं थैमान घातलं होतं. जिकडे तिकडे पाणीच पाणी, हिरव्यागार डोंगरदऱ्यांच्या कपाऱ्यांमधून फेसाळणारे पांढरे शुभ्र पाणी अलगद नदीच्या कुशीत शिरत होतं. जसं अवखळ बाळ घाबरून आईच्या कुशीत शिरावं अगदी तसं. गारठलेले पक्षी झाडाच्या फांद्यांवरती पंख फडकवित बसले होते. मान्सून पावसाचा जोर वाढतच होता. दिवसेंदिवस नदीचं पात्र फुगत होतं. ओढ्यांना बाळसं आलं होतं. कड्या कपाऱ्यांवरून वाहणारं पाणी खिलार वासरासारखं अवखळ नृत्य करीत होतं. एखाद दुसरा शेतकरी पावसात भिजत शिवरात घुसत होता. ओली चिंब मिळेल ती वैरण घेऊन परतत होता. माणसांपेक्षा जनावरांची आबाळ होत होती. हिरव्यागार वैरणीनं शिवार फुललं होतं; पण पाऊस उसंत देत नव्हता. म्हातारे, बाया, बाप्ये, स्त्री-पुरुष गारठ्याने गुडघे गळ्यात घेऊन वाकळच्या उबेत निपचिप पडून होते. टक्कूच, घोणच्या डोक्याला घालून मुलं चुलीच्या उबेला बसली होती. शेतमजुरांची उपासमार सुरूच होती. शेतीची कामे चालत नसल्याने काम मिळत नव्हतं. गाडग्या मडक्यात ठेवलेलं धान्य संपलं होतं. ओला दुष्काळ पडण्याची बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. गेल्या महिन्याभरापासून सूर्यानं दर्शन दिलं नव्हतं, घरांची कौलं उमाळली होती. घरामधील भुई ओलीकीच झाली होती. दगडमातीच्या भिंती पानाडल्या होत्या. जुन्यापुराण्या घराच्या भिंतीचे कोपरे धडाडा ढासळत होते. त्यामुळे गोरगरिबांचे संसार उघड्यावर पडत होते. घराची धुरकटलेली कौलं उमाळल्यामुळे घरात जागोजागी ओल्या काजळीचे काळे ठिपपे जमिनीवर कपड्यावर पडत होते. गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे पूल पाण्याखाली गेल्याने गावागावांचा संपर्क तुटला होता. किरकोळ दुकानांमधील किराणा माल संपत आला होता. दूध वाहतूक बंद होती त्यामुळे दूधदुभतं असणाऱ्या घरात मोठी पातेले भरून दूध उतू जाईपर्यंत उकळलं जात होतं. जमीनदार शेतकऱ्यांच्या घरात भाजलेल्या हरभऱ्याचा खारट खमंग वास दरवळत होता. कोणी पापड भाजून खात होतं तर कोणी लाह्या. मधेच खारा मासा तळलेला वास गल्लीमधून तरळत होता. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने घसा शेकण्यासाठी पोटात उब निर्माण होण्यासाठी देशी कोंबड्याच्या झणझणीत तांबड्या रश्श्यावर ताव मारला जात होता. अंगावर गोधडी पांघरून पत्त्याचे डाव मांडले होते. या सगळ्या गोष्टींपासून दूर होतं ते म्हणजे शेतमजूर गोंदाचं घर. गोंदाला बैलाने मारल्यापासून त्यानं अंथरूण धरलं होतं. त्याच्या बरगड्या मोडल्या होत्या, हाडं जुळून येण्यासाठी शेवंता एकटीच रोजंदारी करून चांगलंचुगलं खायला घालण्याचा प्रयत्न करीत होती. कामं थांबल्यामुळे उधार उसनवार करून कसंबसं पंधरा दिवस काढले होते. पवार मामानी फाटक्या प्रपंचाला आधार दिला; पण सारखं सारखं हात पसरणे शेवंताला योग्य वाटत नव्हतं. म्हणून शेवंता गाडग्या मडक्यात किडूकमिडूक शोधून गोंदा व पोरांच्या पोटाला आधार देत होती. गोंदाला संतुलित आहाराची गरज होती; पण पोटच्या पोरांचं हाल होत असल्याने मिळेल ते शिळंपाकं गोंदाला खावं लागत होतं. आज सकाळ पासून चूल पेटलीच नव्हती. गोंदा, शेवंता व त्यांची लहान लेकरं निपचिप बसून होती. घरात अन्नधान्याचा कण नव्हता, बाहेर पावसानं धिंगाणा घातला होता. काल पवार मामीनं कासंडी भरून ताजे दूध पाठवलं होतं. दिवसभर फक्त दूध पिऊन भूक भागविली होती. हळूहळू दुपार टळत होती. लेकरं भुकेने व्याकुळ झाली होती. शेवंताला पतीची आणि पोरांची स्थिती बघवत नव्हती. नशिबावर दात ओठ खात डोक्याला हात लावून शून्य नजरेने पावसाकडे बघत बसली होती. काय करावं काही सुचत नव्हतं.

'विमल खुरपं आणि पोतं आण हिकडं,' निश्चयाने उठत शेवंता म्हणाली.

शेवंताची थोरली मुलगी विमलनं खुरपं आणि पोतं आणून दिलं. ''आये, एवढ्या मोठ्या पावसात कुठं निघालीस, मी येऊ का?'' विमल म्हणाली. ''घटकाभरात येतो, तवर चूल पिटीव.'' असं म्हणत शेवंता बाहेर पडली. विमलच्या भावंडांच्या तोंडाला पाणी सुटलं. आता आपल्याला काही ना काही खायला मिळेल या आशेने कोसळणाऱ्या पावसात तरा तरा जाणाऱ्या शेवंताच्या अस्पष्ट आकृतीकडे मुले पाहू लागली.

''विमल, कुठं गेली ग ती, पावसात भिजून जीवाला आलं मंजी? पाठीमागं ये म्हणावं पाऊस तरी उघडू दे'' चिंताग्रस्त गोंदा म्हणाला.

''खुरपं पोतं घेऊन गिल्या, घटकाभरात येतो म्हणाली'' विमल म्हणाली.

''असल्या पावसात कुणाच्या शिवारात शिरायची ही, त्यात पाण्याने बांध तुडुंब भरलेत,'' काळजीच्या स्वरात गोंदा म्हणाला. अंथरुणावर पडलेला गोंदा आपल्या कर्मावर दात ओठ खात होता. चटकन बरं व्हावं आणि पुन्हा कामाला जावं असं मनोमनी वाटत होतं; पण शरीर साथ देत नव्हतं. नशिबाने साथ सोडली तिथे शरीर कसं साथ देणार? बरगडीची हाडं मोडली होती. हाडं जुळण्यासाठी औषधपाण्याची गरज होती; पण इथं त्याचाच दुष्काळ होता.

डोक्यावर पोत्याची खोळ, हातात खुरपं घेऊन घोट्याएवढ्या चिखलातून काट्याकुट्यांतून जिवाची पर्वा न करता झपाझपा पावलं टाकत शेवंता चालली होती आणि अचानक शेवंता किंचाळली....चिखल पाण्याने मऊ झालेल्या तळपायात खोलवर काटा रुतला होता. वेदनेची पर्वा न करता कचकन काटा उपसून काढला. क्षणात कारंजासारखी रक्ताची धार पावसाच्या पाण्याचा रंग बदलून गेली. नकळत भोवळ आल्यासारखी झाली. तळपायावर हाताचा अंगठा दाबून धरला. डोळ्यातून उष्ण पाण्याच्या धारा ओघळत होत्या. पोत्याची खोळ बाजूला पडली होती. केस ओले चिंब झाले होते. डोक्यावरून ओघळणारं पाणी डोळ्यातील अश्रूंनाही गिळत होतं. झाडाला मिठी मारून हंबरडा फोडावा असं वाटत होतं; पण त्या माउलीला भुकेने व्याकुळ झालेल्या लेकरांची आणि आजारी पतीची आठवण येत होती. हुंदका गिळून तळ पायावरचा अंगठा काढला. रक्त ठिपकत होतं. क्षणात पावसाच्या पाण्यात अदृश्य होत होतं. त्या स्थितीत शेवंता उठली आणि पुन्हा लंगड्या पायाने पुढे चालू लागली.

अंग ओलं चिंब झालं होतं. गारठ्यामुळे दातावर दात आपटत होते. पावलो पावली वेदना मस्तकापर्यंत जात होत्या; पण पोटासाठी, कुंकवासाठी, आपल्या मुलाबाळांसाठी ती माउली सगळ्या वेदना सहन करत होती. काही वेळाने पावसाचा जोर कमी झाला. थंडगार वाऱ्याची झुळूक अंगावर काटा उभा करीत होती. शेवंता एका हिरव्यागार शेतात शिरली. निसर्गाने हिरव्या, पिवळ्या, लाल, गुलाबी, निळ्या रंगाची उधळण केली होती, जसे एखादी सौंदर्यसम्राज्ञी रंगपंचमी खेळत आहे. ताज्या टपोऱ्या ओल्याचिंब निसर्गाचं लेणं नजरेत भरत होतं. अगदी गावरान नववधू सारखं. निसर्गाच्या बहुरंगी चिरंतन सौंदर्याने नजर तृप्त होत होती.

लांबलचक आकाशगंगेसारख्या पसरलेल्या वेली, त्यावर पांढरी बुट्टीदार टपोरी फुलं, पिवळ्या धमक फुलांचा करडा भरात आला होता, मध्येच कुठेतरी भात शेतीचा सुगंध दरवळत होता, श्रावण घेवड्याला नुकतीच गुलाबी नाजूक फुलकळी बहरली होती, मक्याची कोवळी कणसं पोटरीतून निसर्गाचं सौंदर्य किलकिल्या नजरेने न्याहाळत होती. झेंडूची टपोरी फुलं वाऱ्याबरोबर डोलत होती. नाजूक कोथिंबीर काळ्या आईच्या कुशीतून डोकावत होती. नाजूक राजगिरा पानानी बहारला होता. माठ आणि तांदुळजा पावसाचे थेंब उजळीत अलगत झेलत होत्या. चंदनबटवा, चुक्का, रान हरभरा वाऱ्याशी मस्ती करत होता. अंबाडा सर्वांत उंच असल्याचा आव आणत होता. घोळ, चिघळ, रानकरडा, तांबडी घोळ, मनसोक्त जमिनीवर पसरल्या होत्या. याच रानभाज्यांच्या शोधात शेवंता होती आणि इथेच तिला खजिना सापडला. अगदी सोनं, चांदी, हिरं, माणिकमोती, पाचूपेक्षा श्रेष्ठ. फाटक्या साडीची ओटी करून शेवंता रानभाजी तोडू लागली. रानभाज्यांनी

ओटी भरली. जणू शेवंताची निसर्गाने खण नारळानं ओटीच भरली.

शेवंता तृप्त झाली. थंडी, वाऱ्या-पावसाचं भान पूर्ण विसरली. रानभाज्यांचा रानमेवा पोराबाळांनी खाल्ल्यावर मनसोक्त ढेकर देतील या कल्पनेने तिचा उर भरून येत होता. पोत्याची खोळ डोक्यावर घेतली. भाज्यांचं गाठोडं व्यवस्थित बांधले आणि वीरांगणे सारखी शेवंता पावसाचे टपोरे थेंब झेलत घराच्या दिशेने मार्गक्रमणा करू लागली. गळक्या घरात जागोजागी भांडी मांडली होती. काही भांडी पाण्याने भरली होती भरलेली भांडी रिकामी करण्याचे काम विमल करत होती. पाणी बाहेर उचलताना विमलला आई दिसली आणि तिच्या तोंडून आनंदाने शब्द बाहेर पडले –

''आय आली!'' 'आय' हा शब्द कानावर पडताच सगळी भावंडं बाहेर पाहू लागली. त्यांच्या नजरेत माया होती. उत्सुकता होती. झपाझपा पावलं टाकीत शेवंता घरात आली. रानभाजी शिबड्यामध्ये ठेवली. अंगावरची साडी अंगावरच पिळली. ''ईमले, चूल पिटीव, अन भगून्यात पाणी ठेव.'' पिळलेली साडी झाडत शेवंता म्हणाली. विमलच्या भावंडामध्ये वेगळाच उत्साह निर्माण झाला होता. चुलीवरचे पाणी उकळत होतं. त्या पाण्यात मीठ आणि चिमुटभर चटणी टाकून त्यामध्ये रानभाजी टाकली. रटारटा भाजीला कड आला, खमंग वास घरात दरवळत होता. भरलेल्या घंगाळ्यातली रबरबीत रानभाजी पोरं खात होती. ढना ढना पेटणाऱ्या चुलीच्या उबेवर साडीचा एक एक भाग शेवंता सुकवीत होती. रबरबीत गरम रानभाजी खाणाऱ्या छकुल्यांचा आत्मा तृप्त होत होता आणि शेवंता भरल्या नजरेने, तृप्त मनानं पोरा बाळांना, तिच्या पोटच्या गोळ्यांना न्याहाळीत होती; पण उद्याची भूक तिच्या हृदयात घर करीत होती.

***

## ...* आज काहीतरी हरवल्यासारखं वाटतंय *...

आज काहीतरी हरवल्यासारखं वाटतंय
बघता बघता बालपण माझं
आज डोळ्यात पाणी आणतंय
ग्लोबल वार्मिंगच्या जमान्यात
मोकळा श्वास आज
कुठेतरी थांबल्यासारखं वाटतंय
चंगळवादी दुनियेत
आज मिळतंय सगळं पण
अंत:करण उदास वाटतंय
सारीपाट, कबड्डी, आट्यापाट्या
नावं कानावर पडतात पण
मैदानात फक्त चेंडूफळी दिसतात
लगोरीचा डाव मांडावा म्हणतेय पण
भर उन्हाळ्यातही मैदान
कायम सुनं सुनं वाटतंय
पहिल्यासारखं आता दिसत नाही
लाखमोलाची भाकरी आज
करपल्यासारखी दिसतेय

**– साक्षी जयवंत कदम**
T.Y. B. A

***

# सांगली ते वाराणसी : एक अविस्मरणीय प्रवास

## प्रवास वर्णन

– कु. आरती रामकेश केवट, F.Y.B.A

सांगली ते उत्तर प्रदेश हा प्रवास जवळपास १,५०० ते १,८०० किलोमीटरचा आहे. यासाठी आम्ही १५ दिवस आधीच आरक्षण केले होते. महाराष्ट्रातील कडक उन्हाळ्यासाठी सुती कपडे घेतले होते; पण उत्तर भारतात हवामान खूपच विषम असते याची पूर्वकल्पना आम्हाला होती त्यामुळे आम्ही लोकरीचे कपडे घेतले.

सांगली रेल्वे स्थानकावरून आमचा प्रवास सुरू झाला. बॅगांची जुळवाजुळव, प्लॅटफॉर्मवरची ती गडबड आणि गाडी येण्याची प्रतीक्षा करत असताना मनात एक वेगळीच उत्सुकता होती. आम्ही सांगली रेल्वे स्थानकावरून 'गोवा एक्सप्रेस' ने प्रवासाला सुरुवात केली. सांगलीची सुपीक काळी जमीन, द्राक्षांच्या बागा आणि उसाची शेते खिडकीतून मागे पडताना पाहत होतो. रेल्वे जशी पुढे सरकत होती, तसतसे महाराष्ट्राचे पठार मागे सोडून मध्यप्रदेशातील घनदाट जंगले आणि विंध्य पर्वतरांगा दिसू लागल्या. महाराष्ट्रातील मराठी बोलणं मागे पडून आता कानावर हिंदी भाषेचे स्वर पडू लागले होते.

रेल्वेच्या डब्यात विविध राज्यातील लोक भेटले. कोणी साड्यांचे व्यापारी होते, तर कोणी तीर्थयात्रेसाठी निघालेले वृद्ध जोडपे. भुसावळ स्टेशनवरची केळी आणि इटारसीचे गरम वडे खात आमची गप्पांची मैफल रंगली. दोन दिवसांच्या प्रवासानंतर आम्ही उत्तर प्रदेशात प्रवेश केला.

आम्हाला सुरुवातीला वाटले होते की, आपली हिंदी त्यांना समजेल का? पण भाषेपेक्षा मनाची ओढ जास्त महत्त्वाची ठरली. तिथले लोक 'भाऊ' म्हणून प्रेमाने मदत करत होते. 'सांगली कुठे आहे?' असे विचारल्यावर जेव्हा आम्ही 'महाराष्ट्र' सांगायचो, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत शिवाजी महाराजांबद्दल असलेला आदर स्पष्टपणे दिसायचा. या प्रवासाने मला शिकवले की, रस्ते बदलतात, हवामान बदलते, खाण्याच्या सवयी बदलतात; पण भारतीय माणसाचे प्रेम आणि पाहुणचार करण्याची पद्धत कन्याकुमारीपासून ते उत्तर, जम्मू काश्मीरपर्यंत एकच आहे.

सांगलीचा 'गणेशोत्सव' आणि उत्तर प्रदेशची 'गंगा आरती' या दोन्हीमध्ये एकच श्रद्धा आहे. सांगलीत आपल्याला कृष्णा नदीच्या पात्रातील सुपीक जमीन आणि आजूबाजूला सह्याद्रीच्या रांगा दिसतात; पण उत्तर प्रदेशात गेल्यावर गंगा-यमुनेचे खोरे किती विशाल आहे याची जाणीव होते. तिथे डोंगर कमी पण मैदानी प्रदेश अथांग आहे. प्रवासादरम्यान जेव्हा आमची गाडी रात्रीच्या वेळी 'चंबळच्या' खोऱ्यामधून जात होती, तेव्हाची ती गूढ शांतता आणि चांदण्या रात्रीचे दृश्य काळजात घर करून गेले. महाराष्ट्रात आपण गड-किल्ले पाहतो, जे स्वराज्याच्या संघर्षाचे प्रतीक आहेत. उत्तर प्रदेशात आम्हाला वेगळ्या प्रकारची वास्तुकला पाहायला मिळाली.

सांगलीची 'कापड पेठ' आणि 'गणपती पेठ' प्रसिद्ध आहेच, पण उत्तर प्रदेशातील बाजारपेठेची गंमत काही वेगळीच आहे. प्रवासात केवळ प्रेक्षणीय स्थळेच नाही, तर माणसेही महत्त्वाची असतात. एकदा ट्रेनमध्ये आमची पाण्याची बाटली संपली होती, तेव्हा शेजारी बसलेल्या एका उत्तर भारतीय कुटुंबाने स्वतःहून आम्हाला पाण्याची बाटली दिली आणि त्यांच्या घरचा 'आलू पराठा' देखील आग्रहाने खाऊ घातला. त्यांच्याशी गप्पा मारताना कळले की, त्यांनाही महाराष्ट्रातील शिर्डी आणि पंढरपूरला येण्याची खूप

इच्छा आहे. यावरून जाणवले की, भक्ती आणि माणुसकीने संपूर्ण भारत जोडलेला आहे.

शेवटी परतीचा प्रवास सुरू झाला, तेव्हा बॅगेत खूप साऱ्या आठवणी, काही भेटवस्तू आणि कॅमेऱ्यात कैद केलेले हजारो फोटो होते; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे माझ्या मनात उत्तर भारताद्दल असलेले अनेक गैरसमज दूर झाले होते. सांगलीचे साधेपण आणि उत्तर प्रदेशची भव्यता यांचा मेळ माझ्या मनात बसला होता. सांगलीचा शेतकरी प्रामुख्याने ऊस आणि द्राक्ष बागायतदार आहे. उत्तर प्रदेशातून प्रवास करताना मला तिथल्या शेतीचे वेगळे रूप दिसले. तिथे विहिरींपेक्षा नद्यांमधून काढलेल्या कालव्यांचे जाळे मोठे आहे. गव्हाच्या पिकांनी डोलणारी शेते आणि रस्त्याच्या कडेला असणाऱ्या मोहरीच्या पिवळ्याधमक फुलांचे गालिचे पाहून मन प्रसन्न झाले.

सांगली ते उत्तर प्रदेश या प्रवासातील एक रात्र आम्ही झाशी आणि महोबा या भागातून जात होतो, तर वाराणसीमध्ये गेल्यावर तिथल्या 'बनारस हिंदू विद्यापीठाची' (BHU) भव्यता पाहिली. एका बाजूला प्राचीन मंदिरे आणि दुसऱ्या बाजूला आधुनिक शिक्षणाचे हे केंद्र पाहून मन थक्क झाले. तिथले शास्त्रीय संगीत, कथ्थक नृत्य आणि गंगेच्या काठावर चालणारे वेदांचे पठण ऐकून मनावर एक आध्यात्मिक संस्कार झाला.

हा प्रवास केवळ भौगोलिक प्रदेश शिकवण्यासाठी नव्हता, तर तो इतिहास आणि संस्कृतीचा जिवंत धडा होता. सांगलीच्या आपल्या छोट्याशा विश्वातून बाहेर पडल्यावर कळते की, भारत हा किती महान आणि विविधतेने नटलेला देश आहे. आपण जरी वेगवेगळ्या राज्यांत राहत असलो, वेगवेगळ्या भाषा बोलत असलो, तरी अतिथी देवो भव, ही भावना प्रत्येकाच्या रक्तात आहे.

सांगली परिसरात हवा साधारणपणे सौम्य आणि आल्हाददायक असते. सकाळच्या वेळेस थोडा गारवा, तर दुपारी ऊस व शेतीमुळे हवेत ओलावा जाणवतो. रेल्वे प्रवास सुरू झाल्यावर खिडकीतून हिरवीगार शेते, द्राक्षांचे मळे आणि शेतीप्रधान परिसर दिसत जातो. वातावरण प्रसन्न आणि शांत असते. महाराष्ट्रातून मध्य प्रदेशात जाताना हवेमध्ये हळूहळू बदल जाणवतो. ओलसरपणा कमी होतो आणि उष्णता थोडी वाढते. परिसरात झाडांची उंची कमी होत जाते आणि जंगलमय प्रदेश दिसू लागतो. दुपारी उन्हाचे तापमान वाढल्यामुळे हवा कोरडी भासते; पण वाऱ्यामुळे प्रवासात थोडं थंडगारपण टिकून राहते.

झाशीच्या जवळ आल्यावर मध्य भारतातील हवामानाची वैशिष्ट्ये स्पष्ट दिसतात. येथे हवा कोरडी, उष्ण आणि उन्हाळ्यात तापमान जास्त असते. ढगाळ दिवस कमी आणि पावसाचे प्रमाणसुद्धा मर्यादित असते, त्यामुळे वातावरणात धूळ आणि उष्णता अधिक जाणवते. जेव्हा आमची गाडी पुन्हा मिरज आणि सांगलीच्या जवळ आली, तेव्हा घराची ओढ लागली होती; पण सोबत उत्तर प्रदेशातील ती मोकळ्या ढाकळ्या स्वभावाची माणसं, तिथली लज्जतदार खाद्यसंस्कृती आणि गंगेची विशालता मन:पटलावरून हटत नव्हती. सांगलीच्या रेल्वे स्टेशनवर उतरल्यावर 'आपल्या मातीचा वास' आला; पण मनाच्या एका कोपऱ्यात उत्तर प्रदेशातील त्या आठवणींनी कायमचे घर केले होते.

***

# डॉ. तारा भवाळकर : व्यक्ती आणि वाङ्मय

## संशोधनपर लेख

– प्रगती रवींद्र खैरे, S.Y.B.A

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीच्या गाभ्याचा अत्यंत सूक्ष्मतेने आणि आत्मीयतेने शोध घेणाऱ्या विदुषी म्हणून डॉ. तारा भवाळकर यांची ओळख केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात आहे. त्यांचा जन्म १ एप्रिल १९३९ रोजी झाला. त्यांचे बालपण सांगलीसारख्या कला-साहित्याने समृद्ध असलेल्या शहरात गेले. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांच्यातील संशोधक वृत्ती जागृत झाली होती. त्यांनी मराठी साहित्यात पदव्युत्तर पदवी संपादन केल्यानंतर 'मराठी पौराणिक नाटके' या विषयावर पीएच.डी.साठी शोधप्रबंध लिहिला. हा प्रबंध केवळ एका पदवीसाठी केलेला अभ्यास नव्हता, तर मराठी रंगभूमीच्या मुळाशी असलेल्या पौराणिक संदर्भांचे त्यांनी केलेले ते एक ऐतिहासिक विश्लेषण होते. या संशोधनामुळेच त्यांना साहित्यातील मानवी स्वभाव आणि संस्कृतीचे पदर उलगडण्याची दृष्टी प्राप्त झाली. व्यावसायिक कारकिर्दीत त्यांनी सांगली येथील शांतीनिकेतन महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून अनेक दशके काम केले. अध्यापन करताना त्यांनी केवळ पुस्तकी पाठांतरावर भर न देता, आपल्या शेकडो विद्यार्थ्यांना लोक साहित्याच्या प्रत्यक्ष अनुभवाकडे वळवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले अनेक अभ्यासक आज साहित्याच्या क्षेत्रात मोलाची भर घालत आहेत.

तारा भवाळकर यांच्या कार्याचा खरा गाभा हा 'लोकसंस्कृती' आहे. त्यांनी लोकसाहित्याकडे पाहण्याचा पारंपरिक आणि काहीसा दुय्यम दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकला. तमाशा, लावणी, भारूड, गोंधळ आणि पोवाडा यांसारख्या लोककलांकडे समाजाने नेहमीच करमणुकीचे साधन म्हणून पाहिले होते; परंतु तारा भवाळकर यांनी या कलांमधील तत्त्वज्ञान, सामाजिक विद्रोह आणि लोकजीवनाचे प्रतिबिंब जगासमोर मांडले. विशेषतः स्त्रीवादी भूमिकेतून त्यांनी केलेले लोकसाहित्याचे विश्लेषण हे क्रांतिकारी ठरले. ग्रामीण भागातील स्त्रिया जेव्हा जात्यावर ओव्या गातात किंवा सणासुदीला खेळ खेळतात, तेव्हा त्या केवळ गाणी म्हणत नसून आपल्या जीवनातील सुख-दुःख, अन्याय आणि स्वप्नांना वाचा फोडत असतात, हे त्यांनी 'लोकपरंपरा आणि स्त्रीमुक्ती' सारख्या ग्रंथांतून अत्यंत प्रभावीपणे मांडणी केली आहे. त्यांनी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील 'यक्षगान' सारख्या लोककलेचाही सखोल अभ्यास करून सांस्कृतिक देवाणघेवाणीचा एक नवा मार्ग शोधला. 'मातीची मने', 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', 'महामाया', 'बोला जेजुरीच्या खंडेरायाचा' आणि 'संतांची कामगिरी' अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा त्यांच्या व्यासंगपूर्ण लेखणीची साक्ष देते.

त्यांच्या या महान तपस्येचा सर्वोच्च सन्मान म्हणजे २०२५ साली दिल्ली येथे संपन्न झालेले ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवताना त्यांनी दिलेले भाषण हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा वैचारिक दस्तऐवज मानले जाते. 'लोकसंस्कृती हीच लोकशाहीची जननी आहे आणि तीच मानवी मूल्यांचे रक्षण करते,' असा परखड विचार त्यांनी त्यावेळी मांडला होता. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर होणारे हल्ले आणि बदलत्या काळातील सांस्कृतिक ऱ्हास यावर त्यांनी नेहमीच चिंता व्यक्त केली असून साहित्याने सामान्यांच्या बाजूने उभे राहावे, अशी त्यांची कायम धारणा राहिली आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार, चिं. वि. जोशी पुरस्कार आणि अनेक विद्यापीठांकडून 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. वयाची ऐंशी वर्षे पार केल्यानंतरही त्यांची संशोधनाची जिद्द आणि साहित्याप्रति असलेली निष्ठा तसूभरही कमी झालेली

नाही. आज त्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातील एक दीपस्तंभ असून, त्यांच्या कार्यामुळेच पुढच्या पिढीला आपल्या लोकपरंपरेची खरी ओळख होत आहे.

डॉ. तारा भवाळकर यांच्या कार्याचा आवाका इतका मोठा आहे की, त्यांच्याबद्दल जितके लिहावे तितके थोडेच आहे. त्यांच्या आयुष्यातील वैचारिक संघर्ष, त्यांची संशोधक वृत्ती आणि समाजाप्रति असलेली बांधिलकी यावर आधारित आणखी लिहावे म्हटले तर, शब्द अपुरे पडतील.

त्यांच्या संशोधनाचा प्रवास केवळ ग्रंथालयापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांनी प्रत्यक्ष बांधावरच्या आणि वस्तीवरच्या माणसांशी नातं जोडलं. लोकसाहित्याचा अभ्यास करताना त्यांनी 'क्षेत्रकार्य' (Fieldwork) या पद्धतीला सर्वाधिक महत्त्व दिले. खेड्यापाड्यातील अशिक्षित मानल्या जाणाऱ्या धनगर, कोळी, गोंधळी आणि पोतराज यांसारख्या समाजघटकांकडे अफाट मौखिक ज्ञानसाठा आहे, हे त्यांनी ओळखले होते. त्यांनी या लोकांमध्ये मिसळून, त्यांच्यासोबत राहून त्यांच्या लोककथा, म्हणी आणि विधींचे संकलन केले. त्यांच्या मते, लोकसाहित्य हे मातीतून उगवलेले असते आणि त्यातच खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे मूळ स्वरूप दडलेले असते. त्यांनी 'यक्षगान' या दक्षिण भारतीय लोककलेवर जे कार्य केले, ते आजही दोन राज्यांमधील सांस्कृतिक दुवा म्हणून ओळखले जाते. कर्नाटकातील ही कला आणि महाराष्ट्रातील लोककला यांमधील साम्य त्यांनी पुराव्यासह मांडले, ज्यामुळे सीमेवरील सांस्कृतिक संघर्षापेक्षा समन्वयाची भाषा अधिक महत्त्वाची ठरली.

तारा भवाळकर यांच्या लेखनातील एक अत्यंत तेजस्वी पैलू म्हणजे त्यांची 'स्त्रीवादी दृष्टी'. त्यांनी मांडले की, भारतीय स्त्रीचे खरे आत्मचरित्र हे मोठ्या ग्रंथांत नसून ती रोज म्हणत असलेल्या ओव्यांमध्ये, गात असलेल्या पाळण्यांमध्ये आणि सासुरवाशीण म्हणून भोगलेल्या दुःखाच्या गाण्यांमध्ये आहे. त्यांनी स्त्रियांच्या या मौखिक साहित्याचे केवळ संकलन केले नाही, तर त्याचे मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण केले. स्त्री ही लोकसंस्कृतीची खरी वाहक आहे, हे सूत्र त्यांनी आपल्या 'लोकपरंपरा आणि स्त्रीमुक्ती' यांसारख्या पुस्तकांतून अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांच्या लेखनातून उमटलेला हा स्त्रीवाद पाश्चात्त्य संकल्पनांवर आधारित नसून, तो भारतीय मातीतील संघर्षातून जन्मलेला आहे. त्यांनी सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, लोकसाहित्यातील स्त्रियांचे स्थान अधोरेखित केले.

ज्या भाषेत कष्टकरी आपला घाम गाळतो आणि ज्या भाषेत आई आपल्या मुलाला जोजावते, तीच खरी लोकभाषा आणि तिचेच साहित्य टिकणे आवश्यक आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात जेव्हा सोशल मीडियामुळे भाषा आणि संस्कृतीवर आक्रमण होत आहे, तेव्हा तारा भवाळकर यांचे विचार आपल्याला आपल्या मुळांकडे परत जाण्याची आठवण करून देतात. त्यांनी केवळ साहित्यिकांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्य वाचकांसाठीही एक आदर्श घालून दिला आहे की, विद्वत्ता ही साधी आणि समाजाभिमुख असावी.

त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना मिळालेले पुरस्कार हे केवळ त्यांच्या नावावर लागलेले शिक्के नसून, त्यांच्या कष्टाची पावती आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांना वेळोवेळी सन्मानित केले; परंतु त्यांच्यासाठी खरा पुरस्कार म्हणजे आजच्या तरुण पिढीने लोकसाहित्यात दाखवलेली रुची. आजही सांगलीतील आपल्या निवासस्थानी त्या तरुण संशोधकांना तितक्याच आपुलकीने मार्गदर्शन करतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे ऋषितुल्य असले तरी त्या आधुनिक विचारांच्या पुरस्कर्त्या आहेत. त्यांनी जुन्यातील जे चांगले आहे ते जपले आणि जे कालबाह्य किंवा अन्यायकारक आहे त्याला कडाडून विरोध केला. अशा या लोकसंस्कृतीच्या महान उपासिकेचे कार्य हे येणाऱ्या अनेक शतकांसाठी मराठी साहित्यातील एक देदीप्यमान प्रकाशस्तंभ म्हणून कायम राहील.

***

# देशाच्या भवितव्यासाठी आजच्या युवकाचे योगदान

## वैचारिक लेख

– कु. सानिका शिवानंद आंबी, T.Y.B.Com

आपल्या देशासमोर आज अनेक प्रकारची आव्हाने उभी आहेत. बेरोजगारी, भ्रष्टाचार, वाढती लोकसंख्या, वाढते लैंगिक अत्याचार या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सर्वांत महत्त्वाची भूमिका आजच्या युवकाला बजावावी लागणार आहे. अर्थात आजचा काळ हा बदलांचा, प्रगतीचा आणि नव्या संधींचा काळ आहे आणि या सर्वांच्या केंद्रस्थानी कोण असेल तर आजचा तरुण आहे. असे म्हटले जाते की, कोणत्याही देशाचे भवितव्य हे त्या देशातील तरुणांवर अवलंबून असते. म्हणून भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी आपल्या देशातील तरुणांना डोळ्यापुढे ठेवून विकसित भारताचे स्वप्न पाहिले होते, कारण तरुण म्हणजे, ऊर्जा, उत्साह, नवे विचार आणि कार्यक्षमता यांचे प्रतीक समजले जाते. आजचा युवक हा देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत आहे. त्यामुळेच देशाच्या प्रगतीसाठी, देशाच्या भविष्यासाठी आजच्या युवकाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची समजली जाते.

भारत हा तरुणांचा देश आहे असे म्हटले जाते. आज आपल्या देशाची लोकसंख्या १३६ कोटी असली तरी त्यापैकी ६५ टक्के लोकसंख्या ही तरुण वयोगटातील आहे. म्हणूनच या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे म्हटले जाते. आजच्या घडीला देशासमोर अनेक आव्हाने उभी आहेत त्यातील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे बेरोजगारीचे आहे. अनेक तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. त्यांनी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रांमध्ये देदीप्यमान कार्य केल्याचे दिसत आहे. देशासाठी हे भूषणावह आहे.

एवढेच नव्हे तर आजच्या युवकाला सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव आहे. स्वच्छ भारत अभियान, पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, जलसंधारण, महिला सशक्तीकरण, शिक्षणाचा प्रसार यांसारख्या सामाजिक उपक्रमांमध्ये अनेक तरुण उत्स्फूर्तपणे सहभागी होताना दिसत आहेत. त्याचबरोबर समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद दूर करण्यासाठी अनेक तरुण पुढाकार घेत आहेत. समाज बदलाचा हा एक चांगला संकेत आहे. या गोष्टीचा एका बाजूने आनंद होत आहे, तर दुसरी काळी बाजू पाहिली तर काही तरुण विघातक कृत्य करताना दिसत आहेत. उदाहरणार्थ गुंडगिरी, महिलांची छेडछाड, व्यसनाधीनता, सोशल मीडियाचा अतिवापर असेही वाम मार्गाला जाताना दिसत आहेत. आजच्या युवकाने यातून वेळीच सावरून देश कार्यासाठी पुढे येणे अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या युवकाने स्वतःमध्ये सकारात्मक विचारसरणी विकसित करणे गरजेचे आहे. कठोर परिश्रम, चिकाटी, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता हे गुण अंगीकारले तर कोणतेही संकट पार करता येते. अपयशाने खचून न जाता त्यातून शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. कारण, आजचे अपयश हे उद्याच्या यशाची पायरी आहे हे कायम ध्यानात ठेवले पाहिजे.

भारतीय ज्ञानपरंपरेचा विचार केला असता आजची शैक्षणिक व्यवस्था केवळ गुणांवर लक्ष केंद्रित करते आहे, असे दिसते आहे. त्यामुळे कौशल्य विकसित करण्याकडे काहीसे दुर्लक्ष होत आहे. अर्थात नवीन शैक्षणिक धोरणात हा सकारात्मक बदल घडवून

आणला आहे. त्यामुळे अनेक तरुण शिक्षण पूर्ण करूनही रोजगार मिळवण्यात असमर्थ ठरत आहेत. देशातल्या ग्रामीण भागातील तरुणांनाही शहरी तरुणांप्रमाणे संधी मिळाव्यात यासाठी शासनाने सुद्धा पुढाकार घेणे गरजेचे आहे. म्हणून व्यवसाय शिक्षण, स्टार्टअपला भांडवल, व्यावसायिक मार्गदर्शन आणि स्पर्धा परीक्षांबाबत योग्य मार्गदर्शन या गोष्टी तरुणांना वेळीच उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. आपल्याला माहिती आहे की, आजची पिढी मेहनती आहे; पण त्यांना योग्य दिशा दिल्यास ती अधिक यशस्वी ठरू शकते. काही युवक समाजातील अन्यायाविरोधात लढा देण्यासाठी पुढाकार घेतात. राजकारणात उतरतात. त्यासाठी संघटनांमार्फत विविध प्रश्नांवर आंदोलने करत आहेत. हे करताना त्यांच्या मनात असलेली समाजाप्रति निष्ठा आणि नेतृत्व क्षमता विकसित होत असते; परंतु काही वेळा राजकीय पक्ष या तरुणांच्या उत्साहाचा गैरवापरही करून घेतात आणि युवकांना योग्य काय आणि चुकीचं काय यामधला फरकही कळत नाही. त्यासाठी त्यांनी विवेकपूर्ण निर्णय घेणे गरजेचे आहे.

आजचा युवक हा देशाचा ऊर्जा स्रोत आहे; पण जर तीच ऊर्जा चुकीच्या मार्गावर गेली तर देशाला धोकाही निर्माण होऊ शकतो. देशाच्या विकासासाठी सकारात्मक व नकारात्मक ह्या दोन्हीही बाजू तरुणांनी नीट समजून घेतल्या पाहिजेत. ज्या विघातक गोष्टी आहेत त्यामुळे देशाचे अहित होत आहे. ते वेळीच ओळखले पाहिजे आणि देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी सकारात्मक बाजूंचा विचार करून जे चांगलं, जे मंगल, जे सुंदर, जे देश हितासाठी आहे त्याचा अवलंब केला पाहिजे. गोंधळलेल्या मनः स्थितीमध्ये न राहता आजच्या तरुणाने सजग होऊन भविष्याचा विचार केला पाहिजे. यातच समाज हित आहे.

आजच्या युवकाने सकारात्मक, निरंतर प्रयत्न, समाजाभिमुख दृष्टिकोन, ज्ञान, आत्मविश्वास आणि मूल्याधारीत जीवनशैली अवलंबली, तर समाजामध्ये मोठे बदल घडून येतील. त्यासाठी तरुणांनी केवळ यशस्वी उद्योजक, कर्मचारी, अधिकारीच होणे अपेक्षित नाही तर एक सुजाण, चांगला नागरिक आणि संवेदनशील व्यक्ती होणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपला देश हा एक संस्कार, मूल्यांची शिकवण देणारा देश आहे. आपल्या देशाची जगात चांगली प्रतिमा निर्माण झाली आहे. ही प्रतिमा किंवा हे संस्कार भविष्यात टिकवून ठेवण्यासाठी सर्व तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे. पुढच्या पिढीने आदर्श घेण्यासाठी आजच्या तरुणाने लक्ष केंद्रित करणे फार महत्त्वाचे आहे. म्हणून देशासाठी आजचा युवक हा विकसित राष्ट्र होण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक तरुणाने हे कायम लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

***

### ...* मला जिंकायचय सारं...*...

काहीतरी मोठं मिळवायचं असेल,
तर खूप काही गमवावं लागतं
यशाच्या शिखरावर पोहोचण्यासाठी
स्वतःलाच रोज नव्यानं घडवावं लागतं.
जेव्हा कष्टाने आपण यशाचा डोंगर सर करतो,
तेव्हा जग मात्र सहज म्हणतं –
अरे, तुझं नशीबच चांगलं होतं!
आणि ते ऐकताना रागाचा पारा चढतो,
कारण त्या यशामागचा
घाम, संघर्ष आणि जागवलेल्या रात्री
कुणालाच दिसत नसतात
मेहनतीचा, त्या जिद्दीचा
खरा अभिमान मात्र आई-वडिलांच्या
डोळ्यांतच चमकत असतो..
म्हणून आता ठरवलंय –
जगायचं मनमुराद, आनंदात!
कितीही संकटं येऊ देत
या आयुष्याच्या प्रवासात.
लढायचं आता स्वतःच्या मनगटाच्या जोरावर,
आणि जिंकायचंही
स्वतःच्या मनगटाच्या बळावर!

**– परवेज जावेद मानेखान**
T.Y.B.Sc

***

# छत्रपती संभाजी महाराज

## माहितीपर लेख

– कु. पायल विलास गोसावी, T.Y.B.Sc

'श्री शंभो : शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते।।
यदंकसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरि।।'

अर्थ – छत्रपती शिवरायांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांची ही राजमुद्रा जणू काही स्वर्गीय तेजाने तळपत आहे. आकाशाप्रमाणे अमर्याद आहे. या राजमुद्राच्या आश्रयात प्रत्येक माणूस, प्रत्येक प्राणिमात्र महाराजांच्या छत्रछायेखाली असेल. छत्रपतींच्या या राजमुद्रेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवाजी महाराज व महाराणी सईबाई यांचे थोरले चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती म्हणून संभाजी महाराजांकडे पाहिले जाते. त्यांच्या महानतेबद्दल सांगायचे झाल्यास, नुसता छत्रपती शब्द ऐकताच अंगावर शहारे फुटतात. कारणं 'छत्रपती', ही एक भारतीय शाही उपाधी आहे. छत्रपती म्हणजे प्रजेवर सतत छत्र धारण करणारा. म्हणजेच सदैव प्रजेला मदत करणारा व दुःख वेचून घेणारा. प्रजेचे संरक्षण, पालन पोषणाची जबाबदारी व काळजी घेणारा. ते महान छत्रपती म्हणजे छत्रपती संभाजीराजे भोसले महाराज होय! अशी त्यांची ख्याती आजही आहे.

शिवछत्रपतींचा छावा म्हणून ओळखले जाणारे संभाजी महाराज. लहानपणीच ते आपल्या आईच्या प्रेमाला पोरके झाले. नंतर त्यांची आजी राजमाता जिजाऊ यांनी त्यांचा सांभाळ केला. लहानपणापासून त्यांच्या वाट्याला संघर्ष करावा लागला. अनेक संघर्षांतून उभारी घेऊन त्यांनी स्वतःला सिद्ध केले होते. तेरा वर्षांतच तेरा प्रकारच्या विविध भाषा ते शिकले होते. तलवार चालवणे, घोड्याची सवारी करणे, दांडपट्टा चालवणे यात तर ते खूप माहीर होते. शस्त्र आणि शास्त्र या दोन्हीमध्ये ते खूप तरबेज होते. खरं पाहता जे शस्त्र चालवतात त्यांना शास्त्रामध्ये आवड नसते आणि ज्यांना शास्त्रामध्ये आवड असते त्यांना शस्त्र चालवण्यात काहीच आवड नसते; पण छत्रपती संभाजी महाराज शस्त्र आणि शास्त्र या दोन्हींमध्ये निपुण होते. छत्रपती संभाजी महाराजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी बुधभूषणम् ग्रंथ संस्कृत मध्ये लिहिला होता.

आताच्या काळात मुलांना वाटते की, आई-वडिलांनी आपल्या सोबत राहावे, खेळावे आणि आजच्या आई-वडिलांनाही मुलांना थोडेफार लागलं की काय करू आणि काही नाही असे होते; पण संभाजी महाराजांचा काळ हा वेगळाच होता. वडिलांसोबत खेळायचे मन झाले तर आठवायचे की, आपले वडील मोघलांसोबत लढाया करत आहेत. प्रजेसाठी जीवनाचा खेळ खेळत आहेत. याच विचाराने संभाजी महाराजांच्या जीवनाची लढाई लहान वयातच चालू झाली.

जसे एका शिष्याला गुरूची गरज असते त्याचप्रमाणे संभाजी महाराजांना कवी कलश यांची गरज असायची. जेव्हा जेव्हा ते दुःखी असत तेव्हा जीवनाचा कोणताही पाठ ते कवी कलश यांच्याकडून शिकत. कवी कलश हे त्यांच्या कवितांद्वारे त्यांना प्रेरित करत. संभाजी महाराज असे एकमेव राजे असतील की, ज्यांनी जीवनातील कोणतीही लढाई हरली नाही. त्यांचा याच वागण्याने औरंगजेब परेशान झाला होता. नऊ वर्षे संभाजी महाराजांनी औरंगजेबाला सळो की पळो करून सोडले होते. औरंगजेबाने कितीही कठीण योजना आखून युद्ध करायचे ठरवले तरीही ते जिंकणं अवघडच असायचे; कारण, संभाजी महाराजांच्या रक्तात जिंकण्याची ओढ असायची आणि

ती ओढ त्यांना कधीच हरूव देत नव्हती. औरंगजेबाच्या लक्षात आले की, संभाजी महाराजांना हरवणे एवढे काही सोपे नाही म्हणून औरंगजेबाने विश्वासघाताने संभाजी महाराजांना पकडले.

छ. संभाजी महाराजांच्या बाबतीत १६८८ च्या उत्तरार्धात दोन वाईट घटना घडल्या. पहिली घटना म्हणजे शिर्के सरदारांचे बंड व दुसरी घटना म्हणजे रायगडावर प्रल्हादपंत व इतरांकडून झालेली फंदफितुरी. शिर्के व इतर सरदारांना समजाविण्याचा प्रयत्न संभाजी महाराजांनी केला; पण त्यांना यश आले नाही. शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखानने संगमेश्वरवर हल्ला चढवला. एकच धुमाकूळ झाला. ०१ फेब्रुवारी १६८९ मध्ये संभाजी राजेंचे ३०० सैन्य शेख निजामच्या ५००० सैन्याशी प्रामाणिकपणे लढू लागले. हदगावची लढाई झाली. सेनापती माळोजी बाबा लढताना घायाळ होऊन धारातीर्थी पडले. कवी कलशाच्या पायावर घाव बसला आणि तो किंचाळला, ''राजेऽ राजेऽऽ'' संभाजी राजे माघारी वळले व कवी कलशाजवळ गेले आणि त्याच वेळेस शेख निजामचे सैनिक शंभूराजांवर वार करू लागले. ते सैन्याचा प्रतिकार करू लागले; परंतु शेखच्या ७० हबशांनी साखळदंडाने संभाजी महाराजांना आवळले. राजे ७० जणांना दाद देत नव्हते; परंतु किती वेळ एकटे लढणार, शेवटी साखळदंडाने बांधून राजांना संगमेश्वरहून बहादूर गडास नेले. तेथे औरंगजेबाची छावणी होती. कवी कलश व शंभूराजांना औरंगजेबा समक्ष उभे केले गेले. कवी कलशाच्या काव्याप्रमाणे 'राजन तव तेज निहारत खत् तजत अवरंग' असे म्हणतो.

औरंगजेब डोळे विस्फारत शंभूराजांचे ते बाणेदार रूप पाहत होते. आग ओकणारे डोळे, बलदंड धिप्पाड शरीर, करारी मुद्रा, साखळदंडात जखडलेला तो मराठ्यांचा राजा, सिंहाचा छावा सापडला. औरंगजेबाचा संताप अनावर झाला आणि कुलाह तख अशी शिक्षा दिली. एक धगधगते शौर्य क्रूरपणाच्या कळसाने निमाले. असा नृशंस मृत्यू आजवर कोणत्याही राजाचा झाला नाही. तो धर्मवीर स्वराज्य रक्षक बलशाही अतिपराक्रमी संभाजी महाराजांचा झाला. आजही अखंड ज्योत तेवत आहे. वढू बुद्रुक तुळापूरला. ते धगधगत्या शौर्याचे प्रतीक आहे, हिंदवी धर्माभिमान, त्यागाचे स्मारक आहे. अमोघ कीर्तीचा दीपस्तंभ आहे.

संभाजी महाराजांची अमानवीय हत्या झाली तो दिवस होता ११ मार्च १६८९. चाळीस दिवस मृत्यूचे तांडव सहन करून बलिदान झालेले शंभूराजांचे वीरमरण या तमाम हिंदू वीरांचे नवयुवकांचे प्रेरणास्थान आहे.

***

### *... माय माझी सरस्वती...*...

माय माझी सरस्वती तिने लिहायला शिकवले
असं नको तसं वाग म्हणून तिने
संस्काराचे धडे गिरवायला शिकविले
लहानपणात तिने मला चालायला शिकवले
वाकडे पाऊल पडू नये म्हणून तिने
धैर्याने उभं राहायला शिकविले
भुकेल्या माणसाला घास भरायला शिकविले
माणुसकी जपावी म्हणून तिने
मदतीचा हात द्यायला शिकविले
भविष्यासाठी रात्री जागायला शिकविले
अंतःकरणाची ज्योत बनून तिने
दुःखाचा अंधार दूर करायला शिकविले
वटवृक्ष बनून सावली द्यायला शिकविले
जग जिंकण्यासाठी तिने
प्रेमाचा सागर रिता करायला शिकविले

**– कु. धनश्री अशोक माने**
F.Y. B.Com

***

# लाईक, शेअर आणि सबस्क्राईब

## वैचारिक लेख

– कु. सानिका प्रकाश लोहार, F.Y.B.Com

आजचे युग हे मीडियाचे युग आहे. प्रत्येकाच्या हातामध्ये मोबाईल आहे. थोडक्यात, मोबाईल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. संवाद, शिक्षण, करमणूक आणि माहिती मिळवणे यासाठी मोबाईल उपयुक्त असला तरी त्याचा अतिरेक करणे मानवी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. लहान मूल रडायला लागल्यावर जेव्हा आई त्याच्या हातात मोबाईल चालू करून देते. इथेच 'मोबाईलचा अतिरेक' या शब्दांचा उगम होतो. याचा अर्थ अगदी लहानपणापासूनच ह्या तंत्रज्ञानाच्या दुनियेत अशा प्रकारचे साधन लहान मुलांच्या हातामध्ये आल्याने त्याचा दूरगामी परिणाम निश्चित स्वरूपात दिसून येईल.

कोणतेही माध्यम घ्या, त्यात डोकावल्यावर दोन तास कसे निघून जातात हे आपल्याला समजतही नाही. केवळ मनोरंजन आणि टाईमपास म्हणाल, तर ही माध्यमं खूप फायदेशीर आहेत; परंतु त्यांचे दुष्परिणाम म्हणाल तर आरोग्याची प्रचंड मोठी हानी झालेली आहे. मोबाईलमुळे डोळ्यांवर ताण येतो, डोकेदुखी वाढते, मान दुखते, झोपेची समस्या निर्माण होते, त्याचबरोबर ज्या वयामध्ये मुलांनी खेळले पाहिजे, मैदानामध्ये कसरत केली पाहिजे त्या वयात मोबाईलचे व्यसन लागल्यामुळे मुलांची शारीरिक हालचाल होत नाही पर्यायाने लठ्ठपणा वाढतो.

मोबाईलमध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, यूट्युब इत्यादी माध्यमांतून अनेक प्रकारच्या व्हिडिओ क्लिप, रिल्स आपल्यासमोर येतात आणि त्याच्या मोहजालात माणूस असा गुरफटून जातो की, नकळत एखाद्या व्हिडिओला तो लाईक करतो आणि शेअर करतो किंवा सबस्क्राईब करतो; परंतु त्याचा परिणाम असा होतो की, त्याच अर्थाचा, त्याच आशयाचा, त्याच प्रकारचा दुसरा व्हिडिओ आपल्यासमोर येत असतात. म्हणजेच संबंधित ॲपला आपली आवड काय आहे ते कळते आणि त्या पद्धतीने एकापाठोपाठ एक व्हिडिओ आपल्याला दिसायला सुरुवात होते. पुढे नकळत आपण ह्या मोहजालामध्ये गुरफटून जातो. अलीकडे तर एआयचा चमत्कारिक जमाना आला आहे. त्यात होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं हा चमत्कार पाहावयास मिळतो.

एखादा व्हिडिओ शेअर करून आपल्याला सबस्क्राईब किती मिळाले? आपल्या व्हिडिओला कोणी कोणी लाईक केले? आपल्या पोस्टला कोणी कोणी शेअर केलं? कोणी प्रतिसाद दिला यावरून आपलं मूल्य ठरत आहे. म्हणूनच माणसामाणसातील संवाद हरवत चालला आहे. भविष्यात माणूस यंत्राशी संवाद साधतो की काय याची भीती निर्माण होत आहे. ही एक प्रकारची जीवघेणी स्पर्धा आहे. वारंवार मोबाईल चेक करून मला किती लाईक मिळाले, मला कोणी कोणी सबस्क्राईब केले आणि जर लाईक कमी मिळाले तर आपण नैराश्याच्या गर्तेत जातो, नाराज होतो. आपलं मन विचलित होतं. हे आपल्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. म्हणून मोबाईलचा वापर किती करावा, कसा करावा आणि केव्हा करावा याला एक विशिष्ट नियम घालून देणे फार महत्त्वाचे आहे.

मोबाईलच्या अतिवापरामुळे वैयक्तिक जीवनाबरोबरच कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावरही विपरीत परिणाम होत आहे. एकाच घरात राहून नातेवाईक, कुटुंबातील सदस्य एकमेकांशी संवाद साधत नाही. प्रत्येक जण आपापल्या मोबाईलमध्ये गुंतलेला असतो. यामुळे नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होतो. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर तर मोठ्या प्रमाणात याचा दुष्परिणाम होतो. अश्लील रील्स

बघणे, व्हिडिओ पाहणे, गेम्स पाहणे यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन मोबाईलमध्ये एकाग्र झालेला विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या अकार्यक्षम ठरलेला आहे. एवढेच नव्हे तर कानाला इयरफोन लावून गाडी चालवणे, संवाद साधणे यामुळे अपघाताचे प्रमाणही कितीतरी वाढलेले आहे. अतिप्रमाणात मोबाईलचा वापर केल्यामुळे डोळे, मेंदू, झोप न येणे, पाठदुखी यांसारख्या समस्या वाढलेल्या आहेत.

काहीजण हौसेपोटी व्हिडिओ बनवतात, रील बनवतात आणि मीडियावर पोस्ट करतात. त्यात काही आर्थिक फायदा होऊ शकतो; परंतु एक विशिष्ट टप्पा गाठला नाही तर माणूस निराश होतो आणि वारंवार आपला मोबाईल चेक करत असतो. त्यामुळे त्याच्या स्वभावात चिडचिडेपणा येतो, कधी कधी तो दया, याचना, विनंती करत असतो की माझ्या चॅनलला लाईक करा, सबस्क्राईब करा, माझा व्हिडिओ शेअर करा आणि तसे केले नाही तर अर्थातच नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत असतो, आणि नकळतपणे माणूस गैरसमज निर्माण करत असतो. मोबाईलचा विळखा इतका प्रचंड आहे की, आबालवृद्धांना याचा मोह सुटत नाही. स्त्री असो वा पुरुष, लहान मुलं असो किंवा वृद्ध असो, सर्व जण त्याच्या अधीन झालेले आहेत. वास्तविक पाहता वयोवृद्ध माणसांचे डोळे काम करत नाहीत तरीही ते भिंगाच्या चष्म्यातून मोबाईल पाहत असतात. एवढेच नव्हे तर स्वयंपाक करता करता कित्येक महिला मोबाईल चालू करून स्वयंपाक करत असतात. त्यामुळे नकळतपणे उच्च रक्तदाब, लठ्ठपणा यांसारखे आजार वाढताना दिसून येतात.

या अतिरेकी वापरामुळे कितीतरी माणसं रात्रीच्या वेळेस अंधारामध्ये तासनतास मोबाईल पाहत राहतात आणि मोबाईलमधील इंटरनेट चालू ठेवून तसेच झोपी जातात; परंतु मोबाईल जर आपल्या डोक्याजवळ असेल, तर त्याच्या रेडिएशनमधून मेंदूच्या कार्यक्षमतेवर वाईट परिणाम होतो. स्मरणशक्ती आणि विचार करण्याच्या क्षमतेवरही परिणाम होतो. कधीकधी मेंदूच्या कर्करोगासारखा धोकाही निर्माण होऊ शकतो. याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. अर्थात हे तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. त्याचा वापर आपण किती करायचा, कसा करायचा हे प्रत्येकाला समजले पाहिजे.

रील पाहून, व्हिडिओ पाहून कित्येक संसार उद्ध्वस्त झालेले आहेत याची उदाहरणे आपल्यासमोर वर्तमानपत्राच्या माध्यमातून येत असतात आणि त्यामुळे जे चांगले ते स्वीकारायला काहीच हरकत नाही; परंतु जे वाईट आहे, ज्यामुळे आपल्या जीवनाला बाधा ठरत आहे त्या गोष्टीपासून निश्चितच आपण दूर राहिलेले बरे. थोडक्यात, माणसाचे सर्व लक्ष मोबाईलने वेधून घेतलेले आहे. त्यामुळे कंपन्या आपले मार्केटिंग करून लाभ घेत आहेत. अनेक ॲप्लीकेशन, विविध प्रकारचे, सोशल मीडिया म्हणून एक वेगळ्या दुनियेमध्ये शोध लावताना दिसत आहेत. तरीही त्याचा दुष्परिणाम हा मोठ्या प्रमाणावर मानव जातीवर होत आहे. त्यामुळे त्यातील चांगले तेच आपण स्वीकारले पाहिजे आणि नको त्याकडे दुर्लक्ष करणे हेच आपल्या हिताचं ठरणार आहे.

आज मोबाईलवर विविध प्रकारच्या लिंक उपलब्ध होतात. मोहापायी माणूस त्यावर क्लिक करतो आणि आर्थिक हानी होते. शेअर करतो, लाईक करतो आणि नकळतपणे मोहामध्ये अडकून तो कधी त्याच्यात गुरफटून जातो हे त्यालाच कळत नाही. म्हणून सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून प्रत्येक माणसाने वेळेत जागृत झाले पाहिजे आणि मोबाईलचा योग्य तेथेच वापर केला पाहिजे. उर्वरित वेळेचा सदुपयोग करून मानवी जीवन आनंदी आणि सुसह्य जगले पाहिजे. थोडक्यात, लाईक, शेअर आणि सबस्क्राईब या मोहमयी दुनियेत किती अडकून पडायचे हे ज्याने त्याने ठरवले पाहिजे.

***

# शांतिनिकेतन ते डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व्हाया मार्केट यार्ड

## आढावा चार दशकांचा

– **प्रा.संजय ठिगळे,** माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात पश्चिम महाराष्ट्रातील सांगली शहरात नवभारत शिक्षण संस्थेचे शांतिनिकेतन महाविद्यालय सुरू झाले. रवींद्रनाथ टागोर यांच्या संकल्पनेतील शांतिनिकेतन सांगली शहरात उभे केले. त्यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली झाली. काळाच्या ओघात अनेक घडामोडी घडत गेल्या. १९८६ मध्ये शांतिनिकेतन महाविद्यालय भारती विद्यापीठाने चालवायला घेतले. जवळपास चार दशकांचा कालावधी उलटून गेला. उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाचे पाच घटक म्हणजे शासन, संस्था चालक, पालक, विद्यार्थी आणि त्याच्या जोडीला विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून उच्च शिक्षण क्षेत्रात अविरतपणे कार्यरत असणारा घटक म्हणजे शिक्षक अर्थात प्राध्यापक. शांतिनिकेतन आणि सध्याचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय या सर्व प्रवासात महाविद्यालयाच्या जडणघडणीत ज्या दिग्गज प्राचार्यांनी, प्राध्यापकांनी आणि शिक्षकेतर सेवकांनी योगदान दिले ते महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा आलेख मांडण्याचा अधिकार मला मिळाला. त्याचे कारण म्हणजे मी त्यांच्या संघर्षाचा आणि आनंदाचा प्रवास फार जवळून पाहिला आहे. एवढेच नव्हे तर जवळपास ३४ वर्षे मी त्यांचा जिवाभावाचा साथीदार राहिलो.

उच्च शिक्षण आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध घटक हेच खऱ्या अर्थाने शाश्वत शैक्षणिक विकासाच्या चळवळीला चालना देण्याचे काम करीत आहेत. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात फार पूर्वीपासून महाविद्यालयाच्या नावाला फार मोठे वलय होते आणि आजही आहे. त्याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग कोण आहे त्यालाही महत्त्व कमी जास्त प्रमाणात होते. काळाच्या ओघात अनेक बदल होत गेले असले तरी आजही चांगल्या महाविद्यालयाला आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांना फार मोठे स्थान असून त्यांच्या नावाचे एक वलय आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बदल होऊ लागले आहेत. नवीन नियमानुसार प्राध्यापकांच्या नियुक्तींचे निकष बदलू लागले आहेत. पदव्युत्तर शिक्षण, त्यामध्ये बी ++ इथपासून ते नेट, सेट आणि पीएच. डी. असा प्रवास सुरू झाला असून प्राचार्य पदाचा कालावधी पाच वर्षांचा करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर अनेक प्राचार्यांना ६५ वर्षांपर्यंत प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी मिळते आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या धर्तीवर सांगली शहरात शांतिनिकेतन स्थापन करावे असा विचार मांडणारे ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेले शांतिनिकेतन महाविद्यालय बंद पडून ते भारती विद्यापीठाने चालवायला घेतले. खरेतर शांतिनिकेतनकडून प्राध्यापक वगळता भारती विद्यापीठाला काहीच मिळाले नाही. तरीही संस्था आणि प्राध्यापक डगमगले नाहीत. आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या भारती विद्यापीठाने शांतीनिकेतन महाविद्यालय चालवायला घेतले. खरेतर एका वेगळ्या संस्कारात वाढलेला प्राध्यापक आणि शिक्षकेतर वर्ग भारती विद्यापीठात रुजायला आणि भारती विद्यापीठ पचायला वेळ लागला असला तरी फिनिक्स पक्ष्याप्रमाणे जशी भरारी घ्यावी तशा पद्धतीने महाविद्यालयाने जवळपास चार दशकांच्या काळात एक नवीन वैभव निर्माण केले. काळाच्या ओघात महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे यांच्या आग्रही भूमिकेमुळे कला, विज्ञान व वाणिज्य

असे नाव असलेल्या महाविद्यालयाचे नामकरण डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय असे करण्यात आले. महाविद्यालयाने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेतली असून गेल्या चार दशकांत महाविद्यालयाने जी नेत्रदीपक प्रगती केली आहे, त्याचे श्रेय संस्था चालक, प्राचार्य आणि प्राध्यापक मंडळींनी घेतलेल्या परिश्रमाला द्यावे लागेल.

**महाविद्यालयाला लाभलेले कर्तृत्वसंपन्न प्राचार्य –**

**ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील**

शिक्षण, समाजकारण आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजाला नवीन दिशा देण्याच्या व्यापक हेतूने मा. पी.बी.पाटील नावाचा एक तरुण प्राध्यापक शिक्षण क्षेत्रात दमदार पाऊल टाकतो काय आणि महात्मा गांधीजी व विनोबा भावे यांच्या विचाराने प्रेरित होऊन नवेगाव आंदोलनाचा प्रयोग करतो काय. खरेतर हा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा भाग आहे. १४ जानेवारी १९३२ रोजी वाळवा तालुक्यातील चिकुर्डे गावातील एका लहान शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्म घेतलेल्या प्राचार्य पी. बी. पाटील साहेब यांनी आयुष्यभर शिक्षण आणि ग्रामीण विकासासाठी अव्याहतपणे कार्य केले. त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी दक्षिण महाराष्ट्रातील आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धांमध्ये प्रथम पारितोषिके जिंकली. सांस्कृतिक पथकांच्या माध्यमातून जनतेमध्ये शिक्षणाचे महत्त्व प्रसारित करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक पथक (कलापथक) आयोजित केले. १९५७ मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांत एम.ए. केले. त्यानंतर १९५८ मध्ये त्यांनी सिलोनमधील युनेस्कोद्वारे चालवल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रात उच्च ग्रामीण संघटन (Higher Rural Organisation) हा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांनी पुढे १९६०-६१ मध्ये युकेमधील लंडन विद्यापीठातून सामुदायिक विकास आणि विस्तार या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. १९५२ मध्ये आचार्य जावडेकर यांच्या सांगण्यावरून त्यांनी सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे गरीब विद्यार्थ्यांसाठी एक निवासी वसतिगृह स्थापन केले. नवभारत शिक्षण मंडळ (शांतिनिकेतन लोकविद्यापीठ) हीच त्यांनी कर्मभूमी मानून आयुष्यभर कार्यरत राहिले. एवढेच नव्हे तर शिक्षण क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करीत राहिले.

मौनी विद्यापीठ, गारगोटी येथे व्याख्याता म्हणून त्यांनी काम केले. १९६२ मध्ये, त्यांनी सांगली येथील पंचायत राज प्रशिक्षण 'केंद्रा' चे प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर १९६९ मध्ये, ते सांगली येथील शांतिनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. १९८४ मध्ये महाराष्ट्र सरकारने पंचायत राज व्यवस्थेच्या मूल्यांकनासाठी पी. बी. पाटील समितीची स्थापना केली होती. समितीने लोकांना सहभागी करून घेण्यावर भर दिला आणि व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आणि अधिक सहभाग सक्षम करण्यासाठी १८४ शिफारसी केल्या. त्यांची राजकीय कारकीर्द खूपच वेगळ्या पद्धतीची राहिली. १९७२ मध्ये डॉ. पाटील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधित्व करत सांगली मतदारसंघातून मोठ्या बहुमताने विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यांनी सहा वर्षे आमदार म्हणून काम केले. सन १९७२ ते १९७६ पर्यंत महाराष्ट्र विधानसभेच्या काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस पदाचे अध्यक्षपद भूषवले. सन १९७२ ते १९९० पर्यंत अखिल भारतीय काँग्रेस समितीचे (AICC) सदस्यही होते. त्यांनी महाराष्ट्राच्या 'पंचायत राज मूल्यांकन समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम केले. पाटील यांनी १९७२ ते १९७८ या सहा वर्षांसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती' चे सरचिटणीस म्हणून काम केले. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर लेखन केले. त्यामध्ये 'क्रांतिसागर' (कादंबरी), 'मराठी भाषा', 'नवेगाव आंदोलन' (माहितीपूर्ण पुस्तक), 'मराठी भाषा', 'विचारधन - जन-गण-मन', 'मराठी भाषा', 'बाल विवाह प्रतिबंधावरील लोकगीत' (इंदिरेचा पोवाडा, मराठी), 'कोल्हापूरच्या वैशिष्ट्यांवरील लावणी' याचा समावेश असून मृत्यूनंतरची त्यांची प्रकाशने प्रसिद्ध झाली. त्यामध्ये प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांच्या कविता, 'शिवशाही ते पेशवाई' (व्याख्यानमाला), मराठीतील व्याख्यानमाला, त्यांची विविध विषयावरील भाषणे प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये नवेगाव आंदोलन,

शिवशाही ते पेशवाई, शिक्षण, सहकार, पंचायत राज्य, ग्रामविकास, पारंपरिक संस्कृती, इतिहासकार वासुदेव सीताराम बेंद्रे यांच्या कार्याची मुलाखत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी वेगवेगळे पुरस्कार आणि मानपत्रे दिली. त्यामध्ये पंचायत राज समितीमधील त्यांच्या कार्याबद्दल इंडियन मर्चंट चेंबरतर्फे २००० साली 'प्लॅटिनम ज्युबिली एंडोमेंट ट्रस्ट पुरस्कारा' ने सन्मानित करण्यात आले. २०१३ मध्ये त्यांना इस्लामपूरचा प्रतिष्ठित 'मराठा भूषण पुरस्कार' आणि सोलापूरचा 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्याच वर्षी, त्यांना कोल्हापूरचा प्रतिष्ठित 'राजर्षि शाहू पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांना शेवटचा 'सांगली भूषण पुरस्कार' २०१४ मध्ये मिळाला. त्याचबरोबर त्यांना अमरावती विद्यापीठाने डि. लिट. पदवी देऊन सन्मानित केले.

१९५८ मध्ये स्थापन झालेल्या शांतिनिकेतन महाविद्यालयाने एक वेगळा आदर्श निर्माण केला. महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणजे खऱ्या अर्थाने कर्णधार. सक्षम प्राचार्य असल्याशिवाय खऱ्या अर्थाने महाविद्यालयाची प्रगती होऊ शकत नाही. शांतिनिकेतन महाविद्यालयाची स्थापना म्हणजे बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची दारे खुली करून देणारे महाविद्यालय होते, असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. शांतिनिकेतनच्या स्थापनेपासून प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांच्यासारखे विचारवंत प्राचार्य लाभले. महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री मा. आर. आर. पाटील सारखी अनेक दिग्गज माणसे शांतिनिकेतनमुळेच घडली. एव्हाना शांतिनिकेतन महाविद्यालयामुळेच दुष्काळी भागातील अनेक मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली. द्वेष, मत्सर आणि गैरसमज यातून संस्था आणि प्राध्यापक यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला. प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्यातील दुहीचा काही लोकांनी फायदा घेतला, तर दुसऱ्या बाजूला एक थोर विचारवंत माणूस आपणास राजकारणात अडसर ठरेल असे ज्यांना वाटत होते त्यांना आनंद झाला. फार मोठ्या अपेक्षा ठेवून उभे केलेले महाविद्यालय बंद पडले अर्थात ते भारती विद्यापीठाने चालवण्यास घेतले.

**महाविद्यालयाच्या उभारणीतील मैलाचा दगड ठरलेले प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे**

शांतिनिकेतन महाविद्यालय सन १९६९ पासून सुरू होते. भारती विद्यापीठाकडे १६ सप्टेंबर १९८५ मध्ये वर्ग झाले. तेव्हा महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा डॉ. पतंगराव कदम यांचे विश्वासू मित्र आणि सहकारी प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे यांच्याकडे सोपवण्यात आली. खरेतर पुणे तिथे काय उणे अशी स्थिती असताना भारती विद्यापीठाच्या पुण्याच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयात प्राचार्यपदावर कार्यरत असलेल्या प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे यांच्याकडे आली. संस्था आणि प्राध्यापक यांच्यातील संघर्षातून भारती विद्यापीठाकडे आलेले महाविद्यालय, मार्केट यार्डच्या गोदामातील इमारत, ना इमारत ना क्रीडांगण अशा प्रतिकूल परिस्थितीत महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा स्वीकारणे आणि सांभाळणे फार अवघड होते. प्रारंभीच्या काळात त्यांना त्रास झाला; परंतु त्यांच्या स्वभावाने आणि संस्थेच्या भक्कम पाठिंब्यामुळे ते यशस्वी प्राचार्य झाले. त्यांच्या काळात महाविद्यालयाला नवीन इमारत मिळाली. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे महाविद्यालयाचे नामकरण झाले. संस्थेचा आणि खुद्द साहेबांचा विरोध असतानाही महाविद्यालयाला डॉ. पतंगराव कदम यांचे नाव देण्यात आले. हे फक्त सगरे सर यांच्यामुळेच शक्य झाले. त्यांच्या कालावधीत महाविद्यालयात वृत्तपत्र विद्या पदवीचा अभ्यासक्रम सुरू झाला. एम. ए. अर्थशास्त्र सुरू केले. एव्हाना त्यांनी विना अनुदान तत्त्वावर कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले. त्याच्या प्रमुखपदाची धुरा त्यांनी प्रा. श्रीकृष्ण मोहिते यांच्याकडे सोपवली. त्यांनी ती जवळपास ३३ वर्षे सांभाळली. प्राचार्य डॉ. एम. एस. सगरे यांच्या कारकिर्दीत महाविद्यालयाने उत्तुंग भरारी घेतली. त्यांच्या काळात महाविद्या लयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेने दत्तक घेतलेल्या मिरज तालुक्यातील तुंग या गावाला ग्राम स्वच्छता अभियानात महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळाला.

त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट आणि कार्यकारी परिषदेचे माजी सदस्य म्हणून उल्लेखनीय कार्य केले. कोल्हापूर माध्यमिक शिक्षण अर्थात दहावी

Continuous professional development is equally important in advanced research settings. As new technologies and materials emerge, safety guidelines must evolve accordingly. Ongoing training ensures that laboratory personnel remain informed about updated standards and best practices.

**Mental Awareness and Responsibility**

While equipment and protocols are vital, human behavior often determines whether an accident occurs. Distractions, fatigue, or rushing through procedures can compromise safety. Researchers should Stay focused while working, avoid horseplay in laboratory settings, never eat or drink in the lab and wash hands thoroughly after experiments. Personal responsibility and mindfulness are essential elements of laboratory safety.

**Safety in School and Academic Laboratories**

In educational institutions, laboratory safety takes on added importance. Students

may lack experience, making supervision critical. Teachers and instructors should demonstrate proper techniques, provide clear written instructions, ensure adequate supervision and limit access to hazardous materials. By modeling responsible behavior, educators instill lifelong safety habits in students.

**Conclusion: Safety as the Foundation of Scientific Progress**

Science thrives on curiosity, experimentation, and exploration. Yet none of these can flourish without a secure and controlled environment. Laboratory safety measures protect individuals, preserve research integrity, and uphold institutional responsibility. From wearing protective equipment to maintaining cleanliness, from understanding chemical hazards to preparing for emergencies, every precaution contributes to a safer scientific community. In the pursuit of knowledge, safety is not a barrier—it is a foundation. By committing to strong laboratory safety practices, we protect not only ourselves but also the future of scientific discovery. Because in every successful experiment, the most important result is that everyone goes home safe.

***



# Microbes Beyond Earth: Discoveries from space

– Pandhare Rohit Rajesh
B.Sc. III Microbiology

**Introduction**

Microorganisms are among the most adaptable life forms on Earth. Scientists have long wondered whether microbes could survive in space, where conditions are extremely harsh. Recent discoveries have shown that, certain microorganisms can live and even adapt to space environments such as spacecraft and space stations. One of the most interesting discoveries is a new bacterial species found on the Chinese space station, Tiangong Space Station, 'called' Niallia tiangongensis.

This discovery has opened a new chapter in space microbiology, helping scientists understand how life can survive beyond Earth.

**What Are Space Microbes?**

Space microbes are microorganisms that are detected or survive in outer space environments. These microbes may originate from Earth and travel to space through spacecraft, astronauts, or scientific equipment. Once in space, they are exposed to extreme conditions such as:

A. Microgravity

B. High levels of cosmic radiation

C. Lack of nutrients

D. Extreme temperature fluctuations

Despite these challenges, some microbes can survive and even adapt.

**Discovery on the Chinese Space Station**

Scientists studying microbial samples from the Tiangong Space Station discovered a previously unknown bacterium named *Niallia tiangongensis*. This bacterium belongs to the genus *Niallia*, which is related to bacteria commonly found in soil. However, the newly discovered species showed special adaptations that help it survive in space conditions. Researchers found that the bacterium had unique genetic characteristics that allow it to resist environmental stress.

**Special Adaptations of Space Microbes**

Microorganisms discovered in space often develop special survival mechanisms.

These include:

- **Radiation Resistance**

Space radiation is much stronger than radiation on Earth. Some microbes can repair damaged DNA very efficiently, allowing them to survive exposure to radiation.

**Future Research in Space Microbiology**

Scientists are continuing to study microbes in space through international missions and space laboratories such as the International Space Station.

**Future research aims to:**

Understand microbial evolution in

space Monitor microbial contamination during long space missions Develop microbial technologies for life support systems in spacecraft. These studies are also important for future missions to the Moon and Mars.

➢ **Biofilm Formation**

Many microbes forms protective communities called Biofilms. These biofilms help bacteria stick to surfaces and protect them from environmental stress.

➢ **Efficient Nutrient Utilization**

In the nutrient-limited environment of space stations, microbes must survive with very little food. Some bacteria develop highly efficient metabolic systems.

➢ **Stress Tolerance**

Space microbes often show resistance to:

- Dehydration
- Oxidative stress
- Extreme temperature changes

These abilities help them survive in microgravity conditions.

**Importance of Studying Microbes in Space**

**1. Astronaut Health :** Microbes living inside spacecraft could potentially cause infections in astronauts. Understanding these microbes helps scientists develop better sanitation and health protection systems.

**2. Spacecraft Safety :** Microorganisms can damage spacecraft materials by forming biofilms and causing corrosion. Studying them helps engineers design safer spacecraft.

**3. Search for Extraterrestrial Life :** If microbes can survive in space environments, it raises the possibility that life may exist on other planets. Research on space microbes helps scientists understand the limits of life.

**4. Biotechnology Applications :** Space-adapted microbes may produce new enzymes or biochemical compounds useful in:

- Medicine
- Industrial biotechnology
- Environmental science

**Other Examples of Microbes in Space**

Several other microorganisms have been found in spacecraft and space stations. Examples include:

***Deinococcus radiodurans*** – Extremely resistant to radiation and capable of surviving in outer space.

***Bacillus subtilis*** – Its spores can survive long periods in harsh environments.

These microbes demonstrate that bacterial life can tolerate conditions once thought to be completely hostile.

***

# Next - Generation Vaccines And Their Role in Global Health

– Miss. Mahek Rafik Lagiwale
B.Sc. III Microbiology

**Modern vaccines:**

Vaccines are one of the most important achievements in medical science. They have significantly reduced illness, disability, and death caused by infectious disease. The first successful vaccine was developed by Edward Jenner in 1796 to protect against smallpox.

Since then, vaccine technology has advanced greatly, leading to the development of modern vaccines that are safer, more effective, and faster to produce.

**What's in a vaccine?**
**Reference: from google. com**
**Introduction to Modern Vaccines:**

A vaccine is a biological preparation that stimulates the body's immune system to recognize and fight harmful microorganisms, such as viruses and bacteria. Vaccines work by exposing the immune system to a harmless part or weakened from of a pathogen. This exposure allows the body to develop antibodies and memory cells that provide protection against future infection.

According to the World Health Organization (WHO), immunization prevents between 3.5 to 5 million deaths every year, from disease such as Measles, Diphtheria, Tetanus, Influenza and Pertussis. Vaccination not only protects individuals, but also contributes to community immunity (herd immunity), thereby reducing the spread of infectious disease.

**Types of Modern Vaccines:**

Modern vaccines are developed using various advanced technologies. The main types include:

**1. Live Attenuated Vaccines:**

These vaccines contain a weakened from of the live pathogen. The provide strong and long-lasting immunity. Examples include the measles, Mumps, and Rubella (MMR) vaccine. However, they may not be suitable for individuals with weakened immune systems.

**2. Inactivated vaccines:**

Inactivated vaccines contain pathogens that have been killed. They cannot cause disease but may require booster dosses. The inactivated Polio vaccine is such an example.

**3. Subunit, Recombinant, and Conjugate Vaccines:**

These vaccines use specific pieces of the pathogen, such as proteins or sugars, to trigger an immune response. The Hepatitis

B vaccine is common example of a recombinant vaccine.

**4. Toxoid Vaccines:**

Toxoid vaccines protect against bacterial toxins, rather than the bacteria themselves. Example include Tetanus and Diphtheria vaccines.

**5. mRNA Vaccines:**

mRNA vaccines are one of the most important modern developments. They use messenger RNA to instruct the cells to produce harmless protein of the virus, which stimulates an immune response. During the Covid -19 Pandemic, companies, such as Pfizer and Modern developed mRNA vaccines that showed high effectiveness in preventing several diseases.

**6. Viral vector vaccines:**

These vaccines use a harmless virus to deliver genetic material from the target pathogen into human cells. The COVID-19 vaccine developed by University of Oxford in partnership with Astra Zeneca is an example.

**Development process of modern Vaccines**

The development of vaccines follows a strict scientific and regulatory process of ensure safely and effectiveness. The main stages include:

**Exploratory stage:** Identification of natural or synthetic antigen

**Preclinical stage:** Laboratory and animals testing.

**Clinical development:** Human trials conducted in three Phases:

Phase I: Safely testing in small groups

**Phase II**: Expanded safely and immune response studies.

**Phase II:** Large scale testing for effectiveness and monitoring of side effects.

Regulatory review and approval: Evaluation by National Health authorities

**Post -Marketing surveillance**- Continuous monitoring for long term safety.

**Quality control**- According to the Centres for Disease Control and prevention (CDC), vaccines undergo rigorous testing before approval and continuous monitoring after they are licensed.

**Benefits of modern vaccines:**

Modern vaccines provide several important benefits:

- **Prevention of infectious disease**

Disease like a smallpox have been erradicated globally.

- **Reduction in mortality**

Child mortality rates have decreased significantly, due to the vaccination programmes.

- **Herd immunity**

High vaccination coverage protects vulnerable populations.

- **Economic advantage**

Vaccines reduce healthcare costs and increase productivity.

- **Rapid response to pandemics**

Modern technology allows faster vaccine

development as seen during Covid -19,

**Safety and Challenges**

Vaccines are generally safe, with most side effects being mild and temporary, such as pain at the infection site or low-grade fever. Serious side effects are rare. Regulatory bodies carefully evaluate vaccine safety before approval.

Despite scientific evidence, vaccine hesitancy remains a major challenge. Misinformation spread through social media can reduce public confidence in vaccines. Health organizations such as the World Health Organization consider vaccine hesitancy one of the top treats to global health.

Another major issue is unequal global access to vaccine. During the COVID-19 pandemic, while developed nations secured large vaccine supplies, lower. income countries faced Global initiatives have to be aimed to improve equitable distribution.

The future of vaccines is promising. Researchers are developing vaccines for HIV, Malaria, Tuberculosis and even certain cancers. mRNA technology is being explored for personalised cancer vaccine and other infectious disease.

Advances in biotechnology genomic and artificial intelligence are expected to make vaccine development even more efficient and precise. scientists are also researching needle-free vaccine delivery methods, such as nasal sprays and skin patches to improve accessibility and patient comfort.

**Conclusion**

Modern vaccines represent major advancements for public health. From the pioneering work of Edward Jenner to the innovative mRNA vaccines developed during the COVID -19 pandemic, vaccines have saved a million of lives. Organization like the World Health Organization and Centres for Disease Control and Prevention continue to promote immunization worldwide.

In conclusion, modern vaccine are essential tools for disease prevention global health security, and future medical innovation

***



# Superbugs: The Invisible Enemy

**– Shrutika Rajgonda Patil**
B. Sc. III Microbiology

Antibiotic-resistant bacteria, often called superbugs, have become one of the most serious global health threats. These bacteria have evolved the ability to resist many commonly used antibiotics, making these infections harder to treat. Scientists around the world are now developing innovative technologies to combat this problem. One promising approach is the 'kill switch'-a genetic mechanism designed to destroy harmful bacteria when certain conditions are met.

### ➢ What Are Superbugs?

Superbugs are bacteria that have developed resistance to multiple antibiotics. This resistance occurs through genetic mutations or by acquiring resistance genes from other bacteria.

These bacteria cause infections in hospitals, communities, and even in healthy individuals. According to the World Health Organization, antimicrobial resistance could cause millions of deaths each year by 2050, if new solutions are not developed.

### ➢ What is a kill Switch?

A kill switch is a genetic safety mechanism engineered into microorganisms using the tools of Synthetic Biology. It is designed to automatically trigger the death of a bacterium under specific conditions.

In simple terms, a kill switch works like an emergency self-destruct system programmed into bacteria.

Scientists insert special genes into bacteria that activate toxins or lethal pathways when triggered. Once activated, the bacteria destroys themselves, preventing further growth or infection.

### ➢ How the Kill Switch Works?

The kill switch system usually consists of three main components:

**1. Sensor:** The sensor detects a signal such as:

- Temperature change
- Chemical molecules
- Specific bacterial genes
- Environmental signals

**2. Genetic Circuit:** The detected signal activates a synthetic genetic circuit engineered by scientists.

**3. Toxin Activation:** The circuit then activates genes that produce toxic proteins, killing the bacteria.

Some kill switches trigger processes like:

- DNA destruction
- Cell membrane rupture
- Inhibition of essential metabolic pathways

This ensures the bacteria cannot survive or reproduce.

### ➢ Types of Kill Switch Systems:

Scientists have designed different types of

kill switches depending on their purpose.

a. Environmental Kill Switch: Bacteria die when they leave a specific environment, such as the human body.

b. Time-based Kill Switch:

The bacteria self-destruct after a certain period.

c. Signal-activated Kill Switch:

Specific molecules or signals trigger bacterial death.

d. Population Control Kill Switch:

When bacterial number becomes too high, the system activates and reduces the population.

➢ **Role of Gene Editing Technologies:**

Advanced gene-editing tools help scientists design precise kill switch systems.

One important technology used is: CRISPR-Cas9

This system can be programmed to target and cut bacterial DNA, effectively killing antibiotic-resistant bacteria.

CRISPR-based kill switches can specifically destroy superbugs without harming beneficial bacteria in the human microbiome.

➢ **Applications in Medicine:**

Kill switch technology could transform the way infections are treated.

- Targeted Infection Treatment: Engineered bacteria could be introduced into the body to hunt harmful pathogens and then self-destruct after completing their task.
- Safer Probiotics: Probiotic bacteria used in therapy can be equipped with kill switches to prevent uncontrolled growth.
- Control of Antibiotic Resistance: Kill switches can eliminate bacteria carrying resistance genes before they spread.

➢ **Advantages of Kill Switch Technology:**

This strategy offers several benefits:

- Precise targeting of harmful bacteria
- Reduced need for traditional antibiotics
- Prevention of bacterial spread
- Controlled microbial therapies
- Protection of beneficial microbiota

➢ **Challenges and Limitations:**

Despite its promise, kill switch technology faces several challenges.

- Mutation risk: Bacteria may evolve mutations that disable the kill switch.
- Delivery difficulties: Getting engineered systems into harmful bacteria inside the body can be challenging.
- Safety concerns: Scientists must ensure that genetically engineered bacteria does not disrupt ecosystems
- Regulatory hurdles: Approval for genetically modified microbial therapies requires strict safety evaluation.

***

# Your Second Brain: The Power of Gut Bacteria

**– Pendhari Muhammad Faij Muhammadrafik**
B. Sc. III (Microbiology)

Gut bacteria, also called the gut microbiota, are tiny living organisms that stay inside our digestive system, especially in the intestines. Even though they are too small to see without a microscope, they play a very big role in keeping us healthy. These microorganisms include bacteria, viruses, fungi, and other microbes. Most of them are friendly and help our bodies in many ways.

**What Are Gut Bacteria?**

Inside the human gut, there are trillions of microorganisms. In fact, they are almost equal in number to the cells in our body. The main groups of bacteria found in the gut are **Firmicutes, Bacteroidetes, Actinobacteria, and Proteobacteria.**

Every person has a different mixture of gut bacteria. This mixture is shaped by birth method (normal delivery or C-section), food habits, environment, medicines, and lifestyle. Just like fingerprints, no two people have exactly the same gut bacteria.

When these bacteria are balanced, our bodies stay healthy. But when number harmful bacteria increase and good bacteria decreases, it can cause health problems.

**Functions of Gut Bacteria-**

**Gut bacteria help our bodies in the following important ways:**

1. Digestion of Food- Some foods, especially fibers, cannot be completely digested by our stomach and small intestine. Gut bacteria break down these foods and turn them into useful substances. This process also produces short-chain fatty acids, which give energy to our intestinal cells.

2. Production of Vitamins- Certain gut bacteria produce important vitamins such as vitamin K (important for blood clotting) and some B vitamins (important for energy production and brain function).

3. Strengthening the Immune System- A large part of our immune system is located in the gut. Good bacteria help train our immune system to fight harmful germs. They also prevent harmful bacteria from growing by competing for space and nutrients.

4. Protecting the Gut Lining- The intestines have a protective lining. Healthy gut bacteria help maintain this lining and reduce inflammation. If this lining becomes weak, harmful substances can enter the bloodstream and cause illness.

5. Connection Between Gut and Brain- The gut and brain are connected through what scientists call the “gut-brain axis.” Gut bacteria can produce chemicals like serotonin, which affects mood, sleep, and

emotions. This is why gut health is sometimes linked to stress, anxiety, and depression.

**Factors That Affect Gut Bacteria-**

Many things can change the balance of gut bacteria:

1. Diet: Eating fiber-rich foods like fruits, vegetables, whole grains, and fermented foods (like curd and yogurt) helps good bacteria grow.

2. Antibiotics: Antibiotics kill harmful bacteria but can also kill good bacteria, disturbing the balance.

3. Lifestyle: Stress, lack of sleep, and low physical activity can negatively affect gut health.

4. Environment and Hygiene: Exposure to different environments and early-life experiences shape our gut bacteria.

5. Genetics: Our genes also influence the types of bacteria in our gut.

**What Happens When Gut Bacteria Are Imbalanced?**

An imbalance of gut bacteria is called dysbiosis. Dysbiosis has been linked to health problems such as the following:

1. Obesity
2. Type 2 diabetes
3. Inflammatory bowel diseases
4. Allergies
5. Heart disease
6. Depression and anxiety

This shows the importance gut bacteria for overall health.


**How to Maintain Healthy Gut Bacteria**


You can improve your gut health by:

1. Eating more fiber-rich foods
2. Including probiotics (like yogurt and fermented foods) in your diet
3. Eating prebiotics (foods that feed good bacteria, such as bananas, onions, and garlic)
4. Drinking enough water
5. Exercising regularly
6. Avoiding unnecessary antibiotics
7. Managing stress

Gut bacteria are tiny organisms with a huge impact on our health. They help in digestion, produce vitamins, support the immune system, and even influence our mood. Maintaining a healthy balance of gut bacteria through good diet and lifestyle choices is very important for a healthy body and mind. Taking care of your gut means taking care of your overall well-being.

***




(Intestinal Villi
Lactobacillus acidophilus
Bifidobacterium longum
Escherioccus faecalis
Streptococcus spp.
Enterococcus faecalis
Campylobacter jejuni
(Intestinal Villi)
(Mucus Layer)
(Gut Microbiota)

# नॅनोटेक्नॉलॉजी ऊर्जा क्षेत्रासाठी आशेचा किरण

## विज्ञान माहितीपर लेख

– कु. प्रेरणा संजय पाटील, कु. रिद्धी रवींद्र पाटील
बी. एस्सी. III

घरगुती किंवा औद्योगिक वापरासाठी लागणारी ऊर्जा मिळविण्यासाठी जे पदार्थ, वस्तू वापरल्या जातात, त्यांना ऊर्जा संसाधने म्हणतात. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे ऊर्जा मिळवणे, ऊर्जेला एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात रूपांतरीत करणे आणि ऊर्जेचा विविध कारणांसाठी वापर करणे शक्य झाले आहे. आपणाला नैसर्गिक स्रोतांपासून ऊर्जा मिळते; पण बेसुमार वापरामुळे या स्रोतांवर मर्यादा येत आहेत. अशा वेळी आपल्या मनामध्ये प्रश्नचिन्ह उभे राहते की, हे नैसर्गिक ऊर्जेचे स्त्रोत संपले, तर पुढे काय? तर या प्रश्नाचे समर्पक उत्तर, नॅनोटेक्नॉलॉजी, ऊर्जा क्षेत्रासाठी आशेचा किरण ठरत आहे.

ऊर्जा निर्माण करण्यासाठी नवीन पद्धत विकसित करण्यासाठी नवतंत्रज्ञान म्हणून नॅनोटेक्नॉलॉजीचा वापर केला जात आहे. नॅनोटेक्नॉलॉजीच्या माध्यमातून नवीन वैज्ञानिक घटना आणि प्रक्रिया उदयास आल्या आहेत. यांमुळे २१व्या शतकात मानवाला सामोरे जावे लागणाऱ्या ऊर्जा पर्यावरणीय आणि शाश्वत गतिशीलतेच्या आव्हानांना क्रांतिकारक किंवा नवीन उपाय मिळाले आहेत. स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा स्त्रोतांची मागणी दिवसागणिक वाढत आहे. नॅनो-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील ऊर्जा समस्यांवर किफायतशीर आणि पर्यावरणीयदृष्ट्या आशेचा किरण दिसत आहे. बॅटरी, कॅपॅसिटर आणि जैवइंधन यांसारख्या पर्यायांचा इंधन किंवा ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विकास पेट्रोलियम आधारित स्त्रोतांसाठी मजबूत दावेदार म्हणून उदयास येत आहेत. या नवीन तंत्रज्ञानामध्ये ऊर्जा संचयन आणि ऊर्जा रूपांतर प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवून नॅनोमटेरियल्स वाढत्या प्रमाणात सक्रिय भूमिका बजावत आहेत. कार्बन नॅनोट्युब असलेल्या ईपॉक्सीचा वापर पवनचक्की ब्लेड बनवण्यासाठी केला जात आहे. नॅनोट्यूबने भरलेल्या ईपॉक्सीच्या वापरामुळे मजबूत आणि कमी वजनाचे ब्लेड तयार करणे शक्य झाले आहे. परिणामी लांब ब्लेड प्रत्येक पवनचक्कीद्वारे निर्माण होणाऱ्या विजेचे प्रमाण वाढवतात. यामुळे एकूणच पवनचक्क्यांची कार्यक्षमता वाढली आहे.

संशोधकांनी पायझोइलेक्ट्रिक नॅनोफायबर्स हे वीज निर्माण करणाऱ्या कपड्यांसाठी धागे विकसित केले आहेत. हे धागे कपडे विणण्यासाठी पुरेसे लवचीक आहेत. हे कपडे घातल्यानंतर शरीराशी होणाऱ्या घर्षणाने वीज तयार करतात, ज्याद्वारे तुमचा मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांना चार्ज करता येईल.

अमेरिकेतील राईस युनिव्हर्सिटीतील संशोधक कार्बन नॅनोट्यूब असलेला वायर विकसित करत आहे ज्यात साध्या विद्युत ट्रान्समिशन ग्रीडमध्ये वापरल्या जाणाऱ्या वायरपेक्षा लक्षणीय कमी विद्युतविरोध आहे. (रिचर्ड स्मली यांनी वीज वितरण ग्रीडमध्ये आमूलाग्र बदल करून नॅनोटेक्नॉलॉजीच्या वापरातून हजारो मैलांपर्यंत वीज प्रसारित करता येऊ शकते हे दाखवून दिले आहे.)

**लिथियम बॅटरी ऊर्जा संवर्धनातील मैलाचा दगड**

२०१९ चा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार लिथियम बॅटरीतील संशोधनासाठी तीन शास्त्रज्ञांना विभागून मिळाला आहे. या संशोधनामुळे पर्यावरणाला

मारक पेट्रोलियमसारखी ऊर्जा उत्पन्न करणाऱ्या घटकांना हद्दपार करणे शक्य होणार आहे. सध्या मोबाईल माणसाच्या प्रमुख गरजांमध्ये समाविष्ट आहे. शरीरातील अवयवांप्रमाणे तो कायम आपल्या सोबत असतो. ही किमया लिथियम बॅटरीच्या शोधामुळे साध्य झाली आहे. लिथियम हा वजनाने खूपच हलका असून त्याची ऊर्जा साठवून ठेवण्याची क्षमता जास्त आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे विद्युत गाड्या निर्माण करण्याचा मार्ग सुकर झाला. विद्युत गाड्यांना ऊर्जा देण्याचे बळ स्टॅनलीच्या लिथियम बॅटरीमध्ये आहे. विसाव्या शतकाच्या अगदी शेवटी वजनाने हलक्या व कार्यक्षम बॅटरीच्या निर्मितीमुळे दळणवळणाच्या क्रांतीची मुहूर्तमेढ रचली गेली. या बॅटरीच्या शोधामुळे इलेक्ट्रॉनिक जगतात एक नवीन पर्व सुरू झाले.

**अद्वितीय गुणधर्म असलेला ग्राफीन**

सन २०१० सालच्या भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक कॉन्स्टँटिन आणि आंद्रे या रशियन शास्त्रज्ञांच्या जोडीला मिळालं आणि जगभरामध्ये नॅनोटेक्नॉलॉजी मधील संशोधनांची चर्चा होण्यास सुरुवात झाली. कागदापेक्षा लाखो पटीने पातळ आणि पोलादापेक्षा कितीतरी पट मजबूत, हिऱ्याहून कठीण, पूर्ण पारदर्शक असे विलक्षण गुणधर्म असलेला 'ग्राफीन' हा पदार्थ एकदम चर्चेत आला. तंत्रज्ञानाच्या दुनियेत क्रांती घडविण्यास समर्थ असलेला आणि मूलभूत विज्ञानाला पुढे नेण्यास मदत करणारा हा शोध आहे.

ग्राफीन हे कार्बनच्या अणूंची जाळी असून त्याची रचना मधमाशांच्या पोळ्यासारखी असते. या रचनेत कार्बनच्या अणूंचे एकमेकांशी असलेले बंध मजबूत असले तरी लवचीकही असतात. त्यामुळे ग्राफीनमध्ये एकाच वेळी परस्परविरोधी गुणधर्म आढळतात. ग्राफीन हे विजेचे चांगले सुवाहक आहे. त्यामध्ये इलेक्ट्रॉन सहजपणे फिरू शकतात. ग्राफीनच्या उच्च ऊर्जा कार्यक्षमता, पारदर्शकता आणि दीर्घकाळ टिकाऊपणामुळे मोठ्या प्रमाणात सौर सेल (perovskite) तयार करणे शक्य झाले आहे. ग्राफीन सुपर कपॅसिटर मोठ्या प्रमाणात ऊर्जा साठवतात आणि वेगाने चार्ज व डिस्चार्ज करू शकतात. हे सुपरकपॅसिटर मोबाईल उपकरणांचे सुपरफास्ट चार्जिंग करतात.

ग्राफीनमुळे भविष्यात नवनवे पदार्थ बनवून तंत्रज्ञानाच्या दुनियेत क्रांती घडवण्यासाठी शास्त्रज्ञांचे संशोधन चालू आहे. ग्राफीन हा द्विमितीय स्फटिक रचना असल्यामुळे यांत्रिकी प्रयोग करण्याची संधी शास्त्रज्ञांना मिळाली आहे. ग्राफीनच्या यांसारख्या विविध गुणधर्मांचा वापर शाश्वत भविष्यासाठी व स्वच्छ ऊर्जा निर्माण करण्यासाठी केला जाऊ शकतो.

***

# आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि भविष्यातील शैक्षणिक क्षेत्रातील संधी व आव्हाने

**विज्ञान माहितीपर लेख**

**– कु. भारती राजेंद्र पाटील**
द्वितीय वर्ष – संगणक शास्त्र विभाग

आजचे युग हे तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीचे आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, क्लाउड कम्प्युटिंग यांसारख्या क्रांतीनंतर आता आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रभाव टाकत आहे. शिक्षण क्षेत्रातही या तंत्रज्ञानाचा प्रभाव वेगाने वाढताना दिसत आहे. पारंपरिक वर्गखोल्यांमधील अध्यापन पद्धती आता हळूहळू डिजिटल माध्यमांकडे झुकत असून भविष्यात शिक्षणाची संपूर्ण रचना AI मुळे अधिक आधुनिक, सुलभ आणि परिणामकारक होणार आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेत AI महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स म्हणजे संगणक किंवा यंत्रांमध्ये मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार करण्याची, शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे होय. मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, रोबोटिक्स यांसारख्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संगणक अनुभवातून शिकू लागतात आणि वेळोवेळी अधिक अचूक निर्णय देतात. या तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षणात केल्यास विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धती समजून घेणे, त्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करणे आणि त्यानुसार अभ्यासक्रमात बदल करणे शक्य होणार आहे.

पारंपरिक शिक्षणपद्धतीत सर्व विद्यार्थ्यांना एकाच वेगाने आणि एकाच पद्धतीने शिकवले जाते. मात्र प्रत्यक्षात प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, समजून घेण्याची पातळी आणि आवड वेगवेगळी असते. AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील चुकांचे विश्लेषण करून त्यांच्यासाठी वैयक्तिक अभ्यास आराखडा तयार करू शकतात. कमकुवत विद्यार्थ्यांना अधिक सराव व मार्गदर्शन मिळते, तर हुशार विद्यार्थ्यांना अधिक आव्हानात्मक प्रश्न व प्रकल्प दिले जातात. यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक होत असून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि शिकण्याची गती दोन्ही वाढणार आहेत.

AI मुळे शिक्षकांची भूमिका संपेल असा समज चुकीचा आहे. प्रत्यक्षात AI शिक्षकांना त्यांच्या कामात मदत करणारे एक प्रभावी साधन ठरणार आहे. उत्तरपत्रिका तपासणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवणे, गृहपाठ तपासणे यांसारखी वेळखाऊ कामे AI प्रणाली करू शकतात. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यासाठी, त्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आणि त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी अधिक वेळ मिळणार आहे. भविष्यात शिक्षक हे केवळ माहिती देणारे न राहता विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, समुपदेशक आणि प्रेरणास्थान बनतील.

परीक्षा व मूल्यमापन पद्धतींमध्येही AI मुळे मोठे बदल होणार आहेत. ऑटोमॅटिक उत्तर तपासणी, विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण, सातत्याने प्रगती अहवाल तयार करणे या गोष्टी AI द्वारे अधिक अचूक व वेगाने होऊ शकतात. ऑनलाईन परीक्षांमध्ये चेहरा ओळख प्रणाली, हालचाल निरीक्षण प्रणाली यांचा वापर करता येईल. तसेच विद्यार्थ्यांच्या चुका कुठे होत आहेत हे ओळखून त्यावर उपाय सुचवणेही AI प्रणाली करू शकतात. यामुळे परीक्षा केवळ गुणांसाठी न राहता शिकण्याची प्रक्रिया बनू शकते.

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे ही भारतासारख्या देशासमोरील मोठी समस्या आहे. AI आधारित ऑनलाईन शिक्षण

प्लॅटफॉर्म, व्हर्च्युअल शिक्षक आणि भाषांतर साधनांच्या मदतीने भाषा आणि भौगोलिक अडथळे कमी करता येऊ शकतात. इंटरनेट आणि डिजिटल साधनांची उपलब्धता वाढल्यास शहरातील व ग्रामीण भागातील शिक्षणातील दरी कमी होईल. यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू शकेल आणि सामाजिक समता वाढीस लागेल.

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी AI तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरू शकते. दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी टेक्स्ट-टू-स्पीच प्रणाली, श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पीच-टू-टेक्स्ट प्रणाली, शिकण्यात अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक साहाय्यक प्रणाली वापरता येतात. यामुळे अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणात सहज सामावून घेता येईल. समावेशक शिक्षणाच्या दृष्टीने ही एक मोठी क्रांती ठरू शकते.

भविष्यातील नोकऱ्या या कौशल्यांवर अधिक भर देणाऱ्या असणार आहेत. AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार कौशल्य प्रशिक्षण देऊ शकतात. व्हर्च्युअल लॅब्स, सिम्युलेशन, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण यांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळते. उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार अभ्यासक्रम सातत्याने अद्ययावत करता येतो, त्यामुळे विद्यार्थी रोजगारक्षम बनतात.

AI च्या वापरासोबत काही गंभीर आव्हानेही आहेत. विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, डेटा गोपनीयता, सायबर सुरक्षेचे धोके, अल्गोरिदममधील पक्षपात, तंत्रज्ञानावर अतीनिर्भरता हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. सर्व विद्यार्थ्यांकडे समान डिजिटल साधने नसल्यास शिक्षणातील विषमता वाढू शकते. त्यामुळे शासनाने योग्य धोरणे आखणे, शिक्षण संस्थांनी सुरक्षित तांत्रिक पायाभूत सुविधा उभारणे आणि शिक्षक-विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर बनवणे अत्यावश्यक आहे.

AI कितीही प्रगत असले तरी मानवी संवेदना, सहानुभूती, नैतिकता आणि संस्कार यांची जागा घेऊ शकत नाही. शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती देणे नसून चांगला माणूस घडवणे हा आहे. त्यामुळे भविष्यातील शिक्षण व्यवस्थेत AI चा वापर करताना मानवी मूल्ये जपणे अत्यंत आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन असावे, उद्दिष्ट नव्हे, ही जाणीव ठेवणे महत्त्वाचे आहे

एकंदरीत पाहता, आर्टिफिशिअल इंटेलिजन्समुळे भविष्यातील शैक्षणिक क्षेत्र अधिक सुलभ, वैयक्तिकृत, परिणामकारक आणि सर्वसमावेशक होणार आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण संस्था यांच्यातील परस्परसंवाद अधिक प्रभावी होईल. मात्र या तंत्रज्ञानाचा समतोल व नैतिक वापर केल्यासच त्याचे खरे फायदे समाजाला मिळू शकतील. भावी काळात AI आणि मानवी बुद्धिमत्ता यांचा समन्वय साधून आपण भविष्यातील शिक्षण अधिक सक्षम आणि सर्व समावेशक बनवणे हे मानवी जीवनाच्या आणि शैक्षणिक क्षेत्राच्या हिताचे असणार आहे.

***

## प्रा.(डॉ.) विवेकानंद रणखांबे यांची प्राचार्यपदी नियुक्ती ०१-१०-२०२५



नूतन प्राचार्यांचे स्वागत



कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची शिष्टाचार संमत भेट




विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांची भेट



डॉ. तारा भवाळकर यांच्या शुभहस्ते 'ज्ञानभारती' चे प्रकाशन (२०२४-२५)

## वाचन प्रेरणा दिन



डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या प्रतिमेचे पूजन



प्रतिज्ञा – वाचन संकल्पाची




किती वाचावे यापेक्षा काय वाचावे?



मंत्रमुग्ध झालेले रसिक श्रोते

## राष्ट्रीय उत्सव : स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन



स्वातंत्र्य दिनानिमित्त एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांची रॅली



राष्ट्रध्वज फडकवताना प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे



स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वजाला सलामी देताना स्टाफ



स्वातंत्र्य दिन एन.सी.सी. कॅडेट्सचे संचलन



प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजाला सलामी



प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे



भारत देश महान! विद्यार्थिनीचे मनोगत



१० मे: स्थापना-दिन महाविद्यालयातील ध्वजारोहण शुभहस्ते
प्राध्यापक (डॉ) जी. व्ही. माळी

# 'अभिजात भाषा आणि साहित्य: भूत, वर्तमान आणि भविष्य' आंतरराष्ट्रीय परिषद : १३-०२-२०२६






अभिजात भाषा या विषयावरील भित्तिपत्रकाचे उद्घाटन



साहेबांच्या अभिवादनाने आंतरराष्ट्रीय परिषदेची सुरुवात



डॉ. तारा भवाळकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. रणखांबे



डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार करताना प्राचार्य



डॉ. माया पंडित यांचा सत्कार



डॉ. शिरीष चिंधडे यांचा सत्कार

## आंतरराष्ट्रीय परिषद



इंग्रजी आणि भारतीय भाषा अशा २ व्हॉल्युममध्ये समावेश असलेल्या २०२ संशोधन पेपर्स प्रकाशन करताना मान्यवर



सांगलीवाडीतील नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर यांचे पणतू मा. नितीन खाडिलकर यांचा विशेष सत्कार




साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचा सत्कार



उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना डॉ. तारा भवाळकर



एल.बी.एस. राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली येथील डॉ. विकास चौधरी यांनी अर्धमागधी भाषेविषयी विवेचन केले



'अभिजात भाषा आणि तंत्रज्ञान' या विषयावर भाष्य करताना डॉ. सुबोध कुलकर्णी (आय.आय.आय.टी. तेलंगणा)



बीजभाषणाची मांडणी करताना संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे



शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे


## आंतरराष्ट्रीय परिषद



हिंदी विषयाचे बी.ओ. एस. चेअरमन डॉ. सात्ताप्पा सावंत यांचा सत्कार



राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव कला शाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत वाघमारे




नायजेरिया येथील सोकोटा विद्यापीठाचे प्रा. मोहम्मद अलिरिओ ऑनलाईन पेपर सादर करताना



आंतरराष्ट्रीय परिषदेतील ऑनलाईन पेपर सादरीकरण प्रसंगी उपस्थित प्राध्यापक



शिवाजी विद्यापीठ, इंग्रजी विभाग डॉ. राजेश्री बार्वेकर यांचा सन्मान



समारोप सत्रात मनोगत व्यक्त करताना प्रा. अविनाश सप्रे



आषाढ – घनांसम खुली दाद रसिकांची
अन् अविरत व्हावी उधळण उन्मेषांची



उत्कृष्ट सूत्रसंचालक डॉ. जया कु-हेकर यांचा विशेष सत्कार

## आंतरराष्ट्रीय परिषद



मा. विजयमाला कदम यांना शोधनिबंध प्रकाशित संशोधन अंक सादर करताना



आंतरराष्ट्रीय परिषदेचे फ्लायर देताना डॉ. जी. व्ही. माळी





आंतरराष्ट्रीय परिषदेविषयी अभिप्राय देतान प्रा. पल्लवी बागी आणि प्रा. माधुरी बागडे

## साहित्यिकांची मांदियाळी



डॉ. तारा भवाळकर



डॉ. सदानंद मोरे



डॉ. माया पंडित



प्रा. मिलिंद जोशी



प्रा. अविनाश सप्रे



डॉ. सुबोध कुलकर्णी



डॉ. शिरीष चिंधडे



मा.शेखर जोशी

## प्रसिद्धी माध्यमांतील प्रतिबिंब

सकाळ

### कदम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

भाषेच्या भूत, वर्तमान आणि भविष्याचे मंथन



हॅलो प्रभात

सांगली

### सांगलीत 'अभिजात भाषा आणि साहित्य' विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात परिषदेचे आयोजन



तरुण भारत संवाद

### अभिजात भाषा साहित्यावर १३ रोजी कदम महाविद्यालयात परिषद

पुण्य नगरी

### अभिजात भाषा, साहित्यावर सांगलीत आंतरराष्ट्रीय परिषद

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे आयोजन : ११ देशातील प्राध्यापकांचा सहभाग : सात अभिजात भाषांवर चर्चा

पुढारी

### सांगलीत अभिजात भाषा आणि साहित्यावर आंतरराष्ट्रीय परिषद

डॉ. कदम महाविद्यालयातर्फे १३ रोजी संयोजन

सकाळ

### 'एआय'च्या आहारी गेल्यास भाषेला धोका

डॉ. सदानंद मोरे : पतंगराव कदम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय भाषा परिषद उत्साहात

लोकमत

### पतंगराव कदम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'अभिजात भाषा आणि साहित्य: भूत, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन शुक्रवार, दि. १३ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेत मराठीसह अन्य सात अभिजात भाषांमधून शोधनिबंध सादर होतील. देशातील विविध राज्यांसह विदेशातून ९० हून अधिक प्राध्यापक सहभाग घेणार आहेत, अशी माहिती, प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. ए. रणखांबे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्राचार्य रणखांबे म्हणाले, परिषदेचे उद्घाटन डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते होणार आहे. बीजभाषण डॉ. सदानंद मोरे हे करणार असून, परिषदेच्या अध्यक्षस्थानी राज्यांच्या मराठी भाषा विभागाचे माजी मंत्री व भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजित कदम असणार आहेत.

# अग्रणी महाविद्यालयांतर्गत कार्यशाळा : ०८-१२-२०२५






कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. उषा बंदे व इतर मान्यवर



प्रमुख मार्गदर्शक डॉ. उषा बंदे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे



सूत्रसंचालन करताना प्रा. भारती भाविकट्टी



प्रास्ताविक करताना डॉ. अमित सुपले



प्रमुख अतिथी प्राचार्या डॉ. स्नेहा कटके यांचा सत्कार करताना



कार्यशाळेचे महत्त्व सांगताना प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे

## अग्रणी महाविद्यालयांतर्गत कार्यशाळा : ०८-१२-२०२५




इंग्रजी विभागामार्फत LSRW Activity चे उद्घाटन करताना डॉ. उषा बंदे




उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. उषा बंदे



उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. स्नेहा कटके



विविध प्रात्यक्षिकांमार्फत मार्गदर्शन करताना डॉ. उषा बंदे



प्राचार्यांचे अनमोल मार्गदर्शन



कार्यशाळेला १५० विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



सहभागी विद्यार्थ्यांच्या समवेत प्रमुख अतिथी



तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांसमवेत डॉ. उषा बंदे व प्राचार्य

## अग्रणी महाविद्यालयांतर्गत कार्यशाळा : ०५-०३-२०२६






रोपट्याला जलार्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करताना माणसोपचार तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर हळीगळे व कु.अंजुम शेख



प्रमाणपत्र स्विकारताना विद्यार्थी



प्रमाणपत्र स्विकारताना विद्यार्थी

## ग्रंथालय विभाग - ग्रंथ प्रदर्शन



आंतरराष्ट्रीय परिषदप्रसंगी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना डॉ. तारा भवाळकर व इतर मान्यवर



ग्रंथ हाताळताना उपस्थित मान्यवर



प्रदर्शनात मग्न झालेले महाविद्यालयातील प्राध्यापक



बेस्ट बुक सप्लायरचे प्रमुख तानाजी माने यांचा सत्कार करताना उपप्राचार्य श्री. डॉ. अमित सुपले

# मराठी विभाग (कनिष्ठ)

## साजिरी मराठी

**जैसी हरळा माझी रत्नकिळा।**
**की रत्नामाजी हिरा निळा**
**तैसी भाषा माजी चोखळा। भाषा मराठी**

**जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी**
**की परिमळामाजी कस्तुरी**
**तैसी भाषांमाजी साजिरी। मराठिया**

**पखियांमधे मयोरू।**
**रुखियामधे कल्पतरू।**
**भाषांमधे मान थोरू। मराठिया**

**तारामधे बारा राशी।**
**सप्तवारामाजी रवि-शशी।**
**या दीपिचेया भाषांमधे तैसी।**
**बोली मराठिया**

– फादर स्टिफन्स

विभाग संपादक
**प्रा. श्री. पाकले शंकरराव**
**प्रा. सुरेश माने**

## अनुक्रमणिका (गद्य विभाग)


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | मातृभाषेचे ऋण | कु. सोहा मुल्ला<br>११ वी (कला) | १३९ |
| २ | पर्यावरण संरक्षणात तरुणांचे योगदान | कु. शुभम यादव<br>११ वी. इलेक्ट्रिकल | १४१ |
| ३ | अंदमान : एक पाचूचे बेट | कु. सिद्धार्थ टेंगसे<br>११ वी. इलेक्ट्रिकल | १४३ |
| ४ | वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे... | कु. गायत्री मोहिते<br>इयत्ता ११ वी (विज्ञान) | १४५ |
| ५ | मोबाइलचे दुष्परिणाम | कु. अमृता माने<br>इयत्ता ११ वी.(विज्ञान) | १४७ |
| ६ | प्रदूषण- एक समस्या. | कु. अक्षता कोळी<br>इयत्ता १२ वी (कला) | १४९ |


## पद्य विभाग


| अ. क्र. | कवितेचे शीर्षक | कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | वेळ | कु. निखिल माळी<br>इयत्ता ११ वी (विज्ञान) | १४० |
| २ | आई | कु. अक्षता कोळी<br>इयत्ता १२ वी (कला) | १४२ |
| ३ | फूल प्राजक्ताचे | कु. गौरी सुतार<br>इयत्ता ११ वी (कला) | १४६ |
| ४ | हृदयांतर | कु. अयोध्या निळुंगडे<br>इयत्ता ११ वी (कला) | १५० |
| ५ | तहान | कु. सुनील जाधव<br>इयत्ता ११ वी (कला) | १५० |

# मातृभाषेचे ऋण

## माहितीपर लेख

– कु. सोहा मुल्ला
११ वी (कला)

माणूस जन्माला येतो तो मुळी माथ्यावर अनेकविध ऋणांचे ओझे घेऊनच! त्या अनेक ऋण पैकी एक न फेडता येणारे ऋण म्हणजे मातृभाषेचे ऋण! अशी कल्पना करा की, माणसाला मातृभाषा गवसलीच नसती, तर त्याने काय केले असते? बाळाने आईजवळ आपला हट्ट कसा काय व्यक्त केला असता? आपल्या भावना, वेदना, आपल्याला हवे नको इत्यादी व्यक्त करण्यासाठी त्याने कशाचा आधार घेतला असता?

बाळाला त्याच्या आई, बाबांकडून, आजोबा, आजीकडून, मातृभाषेचा वारसा लाभतो. बाळ पाळण्यात असते, तेव्हा त्याच्या कानांवर अंगाई – गीत पडते ते त्याच्या आईच्या भाषेतूनच. तो चिऊ काऊच्या गोष्टी ऐकतो त्याही मातृभाषेतूनच. मग आपला आनंद व्यक्त करण्यासाठी आपल्या बोबड्या बोलीतून तो गाऊ लागतो, चांदोबा, चांदोबा भागलास का? अशी ही मातृभाषा आपल्या जन्मापासून सदैव आपल्या सोबत असते.

व्यक्तीच्या जीवनात मातेचे व मातृभूमीचे जेवढे महत्त्व असते तेवढेच त्याच्या मातृभाषेचे असते. कारण, मातृभाषा त्याच्यावर सुयोग्य संस्कार करत असते. या संस्कारातून त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होते, ते संपन्न होते. ज्ञानदेवांनी मातृभाषेचे हे सामर्थ्य जाणले होते. म्हणूनच त्याने जनसामान्यांसाठी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान मराठीतून सांगण्याचा संकल्प सोडला. नाथांना मातृभाषेची ही थोरवी कळली होती, म्हणून तर त्यांनी समाजाचा विरोध सहन करूनही मातृभाषेतच काव्यरचना करण्याचा आग्रह धरला. मातृभाषेतूनच आपले विचार रोखठोकपणे व विलक्षण तळमळीने व्यक्त करून तुकाराम महाराजांनी अभंगरचना केली आणि समाजप्रबोधनासाठी समर्थांना देखील मातृभाषा उपयोगी पडली.

मातृभाषेतून आपल्या विचाराचे व भावनांचे आदान – प्रदान सहजपणे करता येते, म्हणून मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे. आपण कोणत्याही विषयासंबंधी विचार करतो तोच मुळी मातृभाषेतूनच! मात्र परक्या भाषेतून शिक्षण घेताना ती भाषा अभ्यासण्यात आपली शक्ती नाहक खर्च होते. आजची प्रगत शास्त्रे व त्याची परिभाषा आपण आपल्या मातृभाषेत आणू शकणार नाही ही आपली समजूत निराधार आहे. अणुबॉम्बने उद्ध्वस्त झालेल्या जपान सारख्या राष्ट्राने देखील आपली मातृभाषेतूनच प्रगती साधली. कोणत्याही परकीय भाषेचा पांगुळगाडा त्यांनी पत्करला नाही. मुळातच असा प्रश्न निर्माण होतो की, आम्हाला मातृभाषेचा अभिमान आहे का? आपल्या देशाचा आणि आपला स्वतःचा व्यक्तिगत विकास आपणास साधायचा असेल, तर मातृभाषेचे ऋण मानले पाहिजे व मातृभाषेतील थोर ठेवा जतन केला पाहिजे.

शिक्षण म्हणजे ज्ञानप्राप्ती तेव्हाच सुलभ होईल, जेव्हा आपल्या परिचयाच्या भाषेतून ज्ञान मिळेल. शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? हा आपल्या देशात नेहमीच वादाचा प्रश्न बनतो, कारण आपल्याकडे सर्वांना आकर्षण आहे ते इंग्रजीचे त्यामुळे मुलांना शाळेत घालताना नेहमी प्रश्न उभा राहतो कोणत्या शाळेत घालायचे? इंग्रजी माध्यमाच्या की मराठी माध्यमांच्या? संपूर्ण जगाचा आपण आढावा घेतला, तर असे आढळले की, कोणत्या देशातील मुले आपापल्या मातृभाषेतून शिकत असतात. सर्व शिक्षणतज्ज्ञांनी हे मान्य केले आहे की, मुलांच्या

शिक्षणाचे माध्यम ही त्याची मातृभाषा असावी. मातृभाषा म्हणजे त्याचे आई-वडील, घरातील माणसे घरात जी भाषा बोलतात ती भाषा. कारण ती भाषा त्या बालकाच्या कानावर सतत पडत असते. कळत नकळत नवनवे शब्द तो सतत शिकत असतो. त्याच्या स्वतःबरोबरच त्याचे त्या भाषेविषयीचे ज्ञान वाढत असते. त्यासाठी त्याला वेगळा शब्दसंचय करावा लागत नाही व व्याकरणाचा वेगळा अभ्यास करावा लागत नाही. त्यामुळे कोणताही विषय आपल्या मातृभाषेतून शिकवताना त्याचे आकलन त्याला सहज होते, त्यात भाषेचा अडसर राहत नाही लेखनात त्याला अडचण येत नाही. आपल्या भाषेत, जेव्हा तो विद्यार्थी शिकतो, तेव्हा त्याला एखादी अडचण आली तर तो आपल्या शिक्षकांपुढे, मार्गदर्शकापुढे आपली अडचण सहजगत्या मांडू शकतो. पण तेच शिक्षणाचे माध्यम अन्य भाषा असेल व त्या भाषेवर प्रभुत्व नसेल, तर आपली अडचण तो विद्यार्थी मांडू शकत नाही. याउलट एखाद्या विषयातील प्रश्नाचे उत्तर त्याला येत असेल; पण माध्यम असलेली भाषा त्याला नीट येत नसेल, तर तो उत्तर देऊ शकत नाही.

मराठी मातृभाषा असलेल्या मुलांच्या शिक्षणाचे माध्यम मराठीच असायला हवे; पण आज आपल्याला काय आढळते? मराठी माध्यम असलेल्या शाळा बंद पडत आहेत. प्रत्येक पालक अगदी श्रीमंत आणि गरीब सुद्धा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याच्या प्रयत्नात असतात. त्यामुळे बहुसंख्य मुलांना प्रगती साधता येत नाही. त्यांना धड आपली मातृभाषा येत नाही व इंग्रजीवरही ते प्रभुत्व मिळवू शकत नाहीत. मग इंग्रजी माध्यमात शिकण्याचा एवढा ध्यास का? इंग्रजी ही जागतिक भाषा आहे आणि आपल्या देशातही आज स्वातंत्र्यप्राप्तीला ७८ वर्षे झाली तरी सर्व व्यवहार इंग्रजीतून चालतात त्यामुळे आपली मुले इंग्रजी माध्यमातून शिकली तर त्यांना चांगली नोकरी मिळेल, अशी पालकांना खात्री वाटते. त्यात पालकांची मोठी चूक आहे असे नाही कारण अजूनही भारतात महाविद्यालयीन शिक्षण व उच्च शिक्षण हे इंग्रजीतून चालते. मराठी माध्यमातून शालेय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना हे महाविद्यालयीन शिक्षण इंग्रजीतून घेणे अवघड जाईल, अशी सर्वांना धास्ती वाटते. यावर उत्तम मार्ग म्हणजे शालेय शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मातृभाषेतूनच घ्यावे व मातृभाषेचे ऋण व्यक्त करावे.

***

**...* वेळ *...**

कामासाठी वेळ द्या कारण ती
यशाची किंमत आहे
विचारासाठी वेळ द्या
कारण ते यशाचे उगमस्थान आहे
खेळण्यासाठी वेळ द्या
कारण ते तारुण्याचे गुपित आहे
वाचण्यासाठी वेळ द्या
कारण तो ज्ञानाचा पाया आहे
आणि स्वतःसाठी वेळ द्या
कारण आपण आहोत, तर जग आहे.
आणि अतिशय महत्त्वाचे म्हणजे
दुसऱ्यासाठी वेळ द्या
कारण ते नसतील तर आपण
असण्याला काही अर्थ नाही.

**– निखिल माळी**
११ वी (विज्ञान)

***

# पर्यावरण संरक्षणात तरुणांचे योगदान

## वैचारिक लेख

– शुभम यादव
११ वी इलेक्ट्रिकल(व्यवसाय शिक्षण विभाग)

आजच्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करणे ही अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. सतत वाढणारी लोकसंख्या आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक बदल, विकास करावा लागत आहे. यामुळे वाढते प्रदूषण, जंगलतोड, पाण्याची कमतरता आणि हवामानातील बदल यामुळे पृथ्वीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, कारण आजचा तरुणच उद्याचा जबाबदार नागरिक असतो.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती, जी मानवी जीवन आणि सृष्टीच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. शुद्ध हवा, पाणी, अन्न आणि निवारा या मूलभूत गरजा पर्यावरण पुरवते. हवामान संतुलन, आरोग्यदायी जीवन आणि शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे, कारण संतुलित परिसंस्थेशिवाय सजीवसृष्टी टिकू शकत नाही. सर्वप्रथम तरुणांनी पर्यावरणाचे महत्त्व समजून घेणे आणि इतरांनाही त्याबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजात पर्यावरणाबद्दल जनजागृती केल्यास लोकांमध्ये जागरूकता वाढू शकते. सोशल मीडियाच्या आधारे, राष्ट्रीय सेवा योजना, विविध पर्यावरण दिन साजरे करून, पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करता येऊ शकते. सायकल फेरी, स्वच्छता अभियानात सहभागी होणे, सण – उत्सव साजरे करताना पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही. ही खबरदारी घ्यावी. ग्लोबल वॉर्मिंग, वितळणाऱ्या हिमनद्या आणि अनियंत्रित हवामान बदल टाळण्यासाठी, तसेच सौर आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय संसाधनांचा वापर वाढवण्यासाठी जागृतीची गरज आहे. हवा, पाणी आणि मातीचे प्रदूषण थेट मानवी आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणमुक्त, निरोगी आणि स्वच्छ जगण्यासाठी लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे. कचरा कमी करणे (Reduce), पुनर्वापर (Reuse) आणि पुनर्निर्मिती (Recycle) या तत्त्वांचा वापर करण्यासाठी लोकांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे.

हवा, पाणी आणि मातीचे प्रदूषण थेट मानवी आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणमुक्त, निरोगी आणि स्वच्छ जगण्यासाठी लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे, तरुणांनी वृक्षारोपण करून झाडांचे संगोपन करणेही गरजेचे आहे. 'एक तरुण – एक झाड' अशी संकल्पना राबवली, तर पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात संरक्षण होऊ शकते. गड – किल्ल्यांवर देखील वृक्षारोपण रिकाम्या जागेमध्ये, शाळा – महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून त्याची देखभाल करणं हे महत्वाचं आहे. वृक्षारोपण करण्यासाठी झाडांची निवड ही जंगली देशी वाणाची असावीत. यामुळे पक्ष्यांना निवारा होईल. झाडे कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि सल्फर डायऑक्साइड सारखे वायु प्रदूषक काढून टाकण्यासाठी फिल्टर म्हणून काम करतात आणि ऑक्सिजन सोडतात. अनेक ठिकाणी देवराई आहेत. या देवराई सुरक्षित ठेवणं गरजेचं आहे. औषधी वनस्पतीची लागवड देखील करता येते.

अलीकडे ऐरणीवर असणारा प्लास्टिकचा वापर. प्लास्टिकचा वापर कमी करणे, कापडी पिशव्या वापरणे. जिथे जिथे पर्यटन स्थळ आहेत, तेथील परिसर स्वच्छ ठेवणे ही देखील तरुणांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आजकाल सर्व समुद्र किनारे, गड – किल्ल्यांवर, धार्मिक क्षेत्रात अतोनात प्लास्टिक

कचऱ्याचा ढीग पडलेला आढळतो. प्लास्टिक बाटल्यांचा वापर कमी करणे. ज्या ज्या गोष्टी करता येतात त्या करणं आवश्यक आहे. पाणी आणि वीज यांची बचत करणे, सायकल किंवा सार्वजनिक वाहतूक वापरणे यामुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होते. सर्व भारतीय लोक उत्सव प्रेमी आहेत. तरुणांनी पर्यावरणपूरक सण साजरे करून समाजाला योग्य दिशा दाखवू शकतात. प्रत्येक गावात तरुण मंडळे आहेत. या मंडळांनी ही कृती हाती घेतली, तर त्याचा प्रचार व प्रसार प्रभावी होईल.

शहरांमध्ये आता कचऱ्याची समस्या भेडसावत आहे. दररोजचा कचरा, आठवडा बाजार झाला की, तिथे पडणारा कचरा, एखादा सण झाला की पडणाऱ्या कचऱ्याचा ढीग, या कचऱ्याची विल्हेवाट लावणं हा गंभीर प्रश्न आहे. आपण निर्माण करत असलेल्या कचऱ्याचे प्रमाण कमी केले पाहिजे, ओला कचरा वेगळा करून त्यापसून इंधन किंवा खते बनवली पहिजे. असे प्रोजेक्ट राबवणं ही काळाची गरज आहे. कृत्रिम गोष्टींचा वापर कमी करूनही प्रदूषण कमी होईल. एखादी वस्तू बदलण्यापूर्वी तिचा वापर शक्य तितका केला पाहिजे. प्लॅस्टिकचा वापर पुर्णपणे बंद केला पाहिजे.

पर्यावरणपूरक, शाश्वत जीवनशैलीचा अवलंब केला पाहिजे. जसे कापडी पिशव्या वापरणे, अधिकाधिक नैसर्गिक घटकांचा वापर, इंधन बचत, ही काळाची गरज आहे. मनुष्य जात ही पर्यावरणाचा एक छोटासा घटक आहे. तेव्हा पर्यावरणाचा नाश म्हणजेच माणसाची हानी. पर्यावरणाचे संवर्धन यातच माणसाची उन्नती आहे.

थोडक्यात, पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे; परंतु तरुणांनी पुढाकार घेतला तर पर्यावरण संरक्षणाची चळवळ अधिक प्रभावी होऊ शकते. त्यामुळे स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्यासाठी तरुणांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

***

**...* आई *...**

'आ' म्हणजे आत्मा
'ई' म्हणजे ईश्वर
आई हा शब्द मंगल आहे,
आई ही ममता आहे
आई हे दैवत आहे,
आई हा शब्द त्रिलोकात महान आहे
खरा स्वर्ग आईच्या सहवासात आहे.
आई या पूज्य दोन अक्षरात
नाही मिळणार जगातल्या बाजारात
आई हे माय आहे, ती दुधाची साय आहे
तिच्यात फुलाची कोमलता आहे.
गंगेची पवित्रता आहे.
आई दयेचा सागर आहे.
मायेचा पदर आहे.
आई म्हणजेच भारत माता आहे.
आई म्हणजेच मातृभूमी

**– अक्षता कोळी**
१२ वी (कला)

***

# अंदमान : एक पाचूचे बेट

## प्रवासवर्णन

**– सिद्धार्थ टेंगसे**
११ वी इलेक्ट्रिकल (व्यवसाय शिक्षण विभाग)

महाविद्यालयामध्ये ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषद, सांगली विश्व योग दर्शन सांगली आणि चितळे डेअरी भिलवडी यांच्या समवेत भक्ति योग हा कार्यक्रम आभासी पद्धतीने आयोजित करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आली. त्यामध्ये सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**२) शाहू महाराज जयंती :– दि. २६/०६/२०२५**

महाविद्यालयामध्ये शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**३) रक्षाबंधन राखी निर्मिती:– दि. ८/८/२०२५**

महाविद्यालयामध्ये राख्यांची निर्मिती करून राखी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनामध्ये १५० ते १६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पर्यावरणपूरक वैज्ञानिक दृष्टिकोन पानाफुलापासून राखीनिर्मिती इत्यादी विषयांवर आधारित प्रदर्शन भरवण्यात आले. तसेच रक्षाबंधनाचे औचित्य साधून सावली बेघर निवारा केंद्र सांगली, येथे बेघर निराधार लोकांच्यासाठी रक्षाबंधनाच्या निमित्ताने सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी राखी बांधून त्यांचे औक्षण केले आणि त्यांना पेढ्याचे वाटप करण्यात आले.

**४) नव मतदार जनजागृती अभियान:– दि. ३/८/२०२५**

महाविद्यालयांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या व १८ वर्षे खालील वयाच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदार नाव नोंदणीविषयी जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी कार्यक्रमाधिकारी म्हणून सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिकेचे मा. सतीश कांबळे उपस्थित होते. त्यांनी आपले हक्क आणि कर्तव्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**५) शिक्षक–पालक–विद्यार्थी सहविचार सभा:– दि. १८/०९/२०२५**

महाविद्यालयात कला, विज्ञान व व्यवसाय शिक्षण विभागातर्फे शिक्षक पालक विद्यार्थी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ तसेच पालक म्हणून आपली भूमिका काय असावी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षक–पालक विद्यार्थी सहविचार सभेच्या प्रमुख पाहुण्या सौ. दिपाली गाढवे व अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पोरे उपस्थित होते.

**६) जिल्हास्तरीय जलतरण व कुस्ती स्पर्धा:– दि. २५/०८/२०२५**

महाविद्यालयातील इ. ११ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी पार्थ कोळी याने २०० व ४०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तर आदित्य पवार याने १०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण तसेच १०० व २०० मीटर बेस्ट स्ट्रोक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. पारस मडके याने १०० मीटर बटरफ्लाय जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच आदित्य सायमोते याने जिल्हास्तरीय ८५ किलो वजन गट फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.

**७) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम स्मृती दिन व हिंदी दिन साजरा:– दि. १४/०९/२०२५**

महाविद्यालयात मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी हिंदी दिनाचे औचित्य साधून भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

**८) वृक्षारोपण:– दि. २४/०९/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमित्ताने

महाविद्यालयामध्ये प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही. पोरे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाचा समारंभ संपन्न झाला. याचदिवशी सांगली हेड पोस्ट ऑफिस मधील अधिकारी मा. एम. डी. पाटील यांनी पोस्टाच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देऊन मार्गदर्शन केले.

**९) गुरुपौर्णिमा/व्यासपौर्णिमा: दि. १५/०७/२०२५**

ज्यांनी महाभारत लिहिले अशा व्यासमुनींना भारतीय संस्कृतीचे शिल्पकार मानले जाते. त्याच व्यासमुनींना वंदन करण्याचा हा दिवस. गुरू-शिष्य परंपरा जपली जावी या हेतूने महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन शिक्षकांच्या बद्दल आदर व्यक्त केला.

**१०) नवनिर्वाचित मा. प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे यांचा स्वागत समारंभ: दि. ०१/१०/२०२५**

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे यांचे स्वागत प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**११) बीजारोपण कार्यक्रम : दि.-०७/१०/२०२५**

भारती विद्यापीठ पुणे व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बीज संमेलन, पुणे येथून प्राप्त झालेल्या 'बिजक' या वनस्पतीच्या बियांचे रोपण मंगळवार दि. ७/१०/२०२५ रोजी महाविद्यालयात नवनिर्वाचीत प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे यांचे शुभहस्ते व माजी प्र. प्राचार्य. डॉ. एस. व्ही. पोरे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. ए. एल. जाधव, प्रा. आर. एस. काटकर, व प्रा. एस. डी. पाकले उपस्थित होते.

***

## प्रसिद्धि विभाग

महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा उपक्रमांची माहिती समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे तसेच महाविद्यालयाच्या कार्याची योग्य प्रसिद्धी करणे हा प्रसिद्धी विभागाचा प्रमुख उद्देश आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ दरम्यान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती वृत्तपत्रे व सामाजिक माध्यमांद्वारे प्रसारित करण्यात आली. तसेच कार्यक्रमांचे छायाचित्रण, वृत्त संकलन व त्यांचे योग्य दस्तऐवजीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात मिळविलेल्या यशाचीही प्रभावी प्रसिद्धी करण्यात आली.

या सर्व उपक्रमांमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती व्यापक स्तरावर समाजापर्यंत पोहोचण्यास मदत झाली. परिणामी संस्थेची सकारात्मक प्रतिमा अधिक दृढ झाली आहे.

**प्रा. एस. ए. कांबळे**

**समन्वयक**

# सांस्कृतिक विभाग

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथील सांस्कृतिक विभागाने २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्ये, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक वारसा यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महान नेते, समाजसुधारक आणि राष्ट्रीय आदर्श यांच्या कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांना प्रेरित करणे तसेच त्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढविणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश होता.

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत संपूर्ण वर्षासाठी वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले व तयार केलेल्या आराखड्यानुसार विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

२६ जून २०२५ रोजी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. प्राध्यापकांनी सामाजिक न्याय व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. १ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती आदरपूर्वक साजरी करण्यात आली. त्यांच्या साहित्यिक कार्याचा व समाजातील उपेक्षित घटकांच्या प्रतिनिधित्वातील योगदानाचा आढावा घेण्यात आला.

१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीपर नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करून राष्ट्रप्रेम व्यक्त केले. ४ सप्टेंबर २०२५ रोजी गौरीची गाणी आणि खेळ या पारंपरिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना पारंपरिक संस्कृतीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. १४ सप्टेंबर २०२५ रोजी आदरणीय मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. २ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा व राष्ट्रनिष्ठा यांविषयी मार्गदर्शन केले. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. भारताच्या एकीकरणातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती 'बालदिन' म्हणून साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सव २०२५ मध्ये सहभाग घेतला. या महोत्सवात कु. उत्कर्षा शहाजी कापसे हिने मेहंदी स्पर्धेत उज्ज्वल यश मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. महिला शिक्षणातील त्यांच्या योगदानाचा आढावा घेण्यात आला.

८ जानेवारी २०२६ रोजी मा. डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त व मा. डॉ. विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त समाजप्रबोधन सप्ताहांतर्गत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात दोन दिवसीय कीर्तन महोत्सव उत्साहात पार पडला. उद्घाटन मा. विजयमाला कदम यांच्या हस्ते झाले. पहिल्या दिवशी ह.भ.प. श्रीगुरू कृष्णा महाराज चवरे, तर

दुसऱ्या दिवशी श्रीगुरू योगीराज महाराज गोसावी यांनी कीर्तनातून भक्ती, संस्कार व मानवतेचा संदेश दिला. यावेळी प.पू. गुरुनाथ महाराज कोटणीस यांचा सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांनी कीर्तन हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. कार्यक्रमास मान्यवर, वारकरी, विद्यार्थी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण महोत्सव भक्तीमय वातावरणात पार पडला.

१२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना नेतृत्व व राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा देण्यात आली. २३ जानेवारी २०२६ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी 'पारंपरिक वेशभूषा दिन आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषांद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री. अभिजीत दादा कदम यांची जयंती साजरी करण्यात आली. १२ मार्च २०२६ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ बुधवार, दि. १८ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नृत्य, संगीत व इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. यावेळी फिशपाँडचे वाचन करून उपस्थितांना आनंदाची मेजवानी देण्यात आली.

वरील सर्व आयोजित कार्यक्रमांची सविस्तर माहिती वेळोवेळी दैनिक सकाळ, लोकमत, लोकसत्ता, तरुण भारत, हॅलो प्रभात व केसरी या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली.

**डॉ. वर्षा कुंभार**

**समन्वयक**

## जिमखाना विभाग

- महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेऊन स्पर्धेचे सर्वसामान्य विजेतेपदाचे तृतीय क्रमांकाचे मानकरी झाले.
- महाविद्यालयाचा खेळाडू अखिलकुमार खोत याने सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये २०० मीटर व ४०० मीटर अडथळा क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकविला.
- तसेच अखिलकुमार खोत याला सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू हा किताबदेखील मिळाला.
- महाविद्यालयाचा खेळाडू शुभम यादव याने सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये १०० मीटर व २०० मीटर क्रीडा प्रकारात अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकविला.
- तसेच शुभम यादव याला सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेचा सर्वांत वेगवान धावपटू हा मानाचा किताबदेखील मिळाला.
- महाविद्यालयाची खेळाडू निकिता पवार हिने ४०० मीटर व ८०० मीटर क्रीडा प्रकारात अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकविला.

- महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने मैदानी 4 x 400 मीटर रिले स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू केदार मगदुम याने सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये ७९ किलो वजन गटामध्ये तृतीय क्रमांक पटकविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू केदार बाळासो मगदुम याने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू तन्मय माळी याने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये ५६ किलो वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक पटकविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू उमर मुजावर याने बॉक्सिंग खेळामध्ये ४९ किलो वजन गटामध्ये सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाची खेळाडू भाग्यश्री बेळगावे हिने बुद्धिबळ खेळामध्ये सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू आयरप्पा ब्याडगी याने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकविला.
- महाविद्यालयाच्या ०४ खेळाडूंनी कयाकिंग क्रीडा प्रकारात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाच्या १० खेळाडूंनी रोईंग क्रीडा प्रकारात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाच्या ०४ खेळाडूंनी जलतरण क्रीडा प्रकारात सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाच्या १२ खेळाडूंनी व्हॉलीबॉल क्रीडा प्रकारात सांगली विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- महाविद्यालयाचा खेळाडू आयरप्पा ब्याडगी याने महर्षी दयानंद युनिव्हर्सिटी, रोहतक येथे झालेल्या आंतर विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग घेऊन ५ वा क्रमांक पटकविला व शिवाजी विद्यापीठाला सर्वसामान्य विजेतेपदाचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून दिले.
- वार्षिक क्रीडा स्पर्धेचे नियोजन २४ व २५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या मैदानावरती करण्यात आले.
- वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन दिनांक १८ मार्च २०२६ रोजी करण्यात आले.
- महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अमर तुपे यांची शिवाजी विद्यापीठ बेसबॉल संघाच्या निवड समिती सदस्यपदी निवड झाली.
- तसेच शिवाजी विद्यापीठ आयोजित कनोइंग व कयाकिंग ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी पुरुष व महिला क्रीडा स्पर्धेच्या वाहतूक समिती सदस्य म्हणून निवड झाली.

**डॉ. अमर तुपे**
**विभागप्रमुख**

# अग्रणी महाविद्यालय अंतर्गत उपक्रम

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालयांतर्गत 'क्लस्टर महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी एनईपी-२०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत' या विषयावर दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्दिष्ट राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक जाणीव निर्माण करणे हे होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख प्रवक्त्या डॉ. उषा बंदे (फेलो, आय. आय. ए. एस., सिमला) यांनी संवाद कौशल्याचे महत्त्व स्पष्ट करत प्रभावी संवाद, कायिक भाषा आणि व्यक्तिमत्त्व विकास याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी प्रभावी संवादासाठी आत्मविश्वास, योग्य शब्दप्रयोग आणि शारीरिक हावभाव यांचे महत्त्व सांगितले. दुसऱ्या सत्रात त्यांनी कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक विषमता या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधत सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विवेकानंद रणखांबे, कॉलेज ऑफ फिजियोथेरपी सांगली येथील प्राचार्या डॉ. स्नेहा कटके, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. आर. सुपले, समन्वयक डॉ. डी. पी. नाडे, प्रमुख अग्रणी महाविद्यालय समन्वयक प्रा. सतीश कांबळे, तसेच कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. अरुण जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. अमित सुपले यांनी केले. कार्यशाळा उत्साहात व यशस्वीपणे पार पडली.

तसेच अग्रणी महाविद्यालय अंतर्गत प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने दि. ५ मार्च २०२६ रोजी 'निरामय जीवनासाठी मन आणि आहार' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्य व संतुलित आहाराबाबत जागरूकता निर्माण करणे, हा होता.

या कार्यशाळेत डॉ. चंद्रशेखर हळिंगळे यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करत ताणतणावमुक्त जीवनासाठी सकारात्मक विचार, संतुलित जीवनशैली व नियमित व्यायाम आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच कु. अंजुम शेख यांनी संतुलित आहाराचे महत्त्व स्पष्ट करून निरोगी जीवनासाठी योग्य आहारपद्धती व पौष्टिक आहाराबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. भारती भाविकट्टी यांनी केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. ए. आर. सुपले यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन्ही कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाल्या.

**(प्रा. एस. ए. कांबळे)**

**प्रमुख, अग्रणी महाविद्यालय**

## कीर्तन महोत्सव अहवाल

डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त व भारती विद्यापीठाचे कार्यवाह व माजी राज्यमंत्री आमदार डॉ. विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त समाज प्रबोधन सप्ताहांतर्गत महाविद्यालयात दि. ०८ व ०९ जानेवारी २०२६ रोजी दोन दिवस कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन भारती विद्यापीठ शालेय विकास समितीच्या अध्यक्षा मा. विजयमाला पतंगराव कदम तथा वहिनीसाहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या वेळी प. पू. श्री. गुरुनाथ महाराज सांगली चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष मा. श्री. मनोहर सारडा (काकाजी), रामनिकेतनचे मा. श्री. दीपक (नाना) केळकर, महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य आणि भारती विद्यापीठाचे सहकार्यवाह डॉ. एम. एस. सगरे, भारती सहकारी बँक पुणेचे संचालक मा. डॉ. जितेश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

या कीर्तन महोत्सवात पहिल्या दिवशी महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. श्रीगुरू कृष्णा महाराज चवरे यांनी उपस्थित श्रोत्यांना भक्तिरसाची अनुभूती दिली, तर दुसऱ्या दिवशी संत एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज श्रीगुरू योगीराज महाराज गोसावी यांनी आपल्या कीर्तन सेवेतून उपस्थित श्रोत्यांना भक्तीचे महत्त्व सांगितले. दोन दिवस सुरू असलेल्या या महोत्सवात कैवल्यधाम या प्रदीर्घ कीर्तन परंपरेचा विशेष सन्मान म्हणून प.पू. श्री. गुरुनाथ महाराज कोटणीस यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांनी केले. हा महोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी ह.भ.प. श्री. विश्वास गवळी, मृदंगाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर आंबी, ह.भ.प. श्री. सर्वेश पाटील तसेच मा. श्री. विजय म्हैसकर, मा. श्री. महादेव विसापुरे, अभंग गायन मा. श्री. शरद गुरव आणि त्यांचे साथीदार यांचे विशेष सहकार्य लाभले. या प्रसंगी महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक, विद्यार्थी, सांगली व सांगलीवाडी पंचक्रोशीतील भाविक, वारकरी, संत सेवा वारकरी मंडळ, महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाजप्रबोधन सप्ताहाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांनी सांगलीवाडी परिसरात घरोघरी रांगोळ्या काढून नागरिकांना आमंत्रित केले. याप्रसंगी महाविद्यालयातील वर्षभरातील विविध उपक्रम आणि डॉ. पतंगराव कदम यांच्या स्मृती जागृत करणाऱ्या भित्तिपत्रिकेचे अनावरण मा. विजयमाला पतंगराव कदम आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संपन्न झाले.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली

**दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी**

कसबे डिग्रज ता. मिरज जि.सांगली येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन मा. राजेंद्र जोशी संस्थापक, निसर्ग संवाद संस्था मिरज यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आले. तसेच प्रा. शिकंदर जमादार, माजी चेअरमन, जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सांगली यांनी मी एनएसएसमधून कसा घडलो, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विवेक रणखांबे

यांनी श्रमाचा संस्कार आयुष्यात किती महत्वाचा आहे हे समजावून सांगितले. एन एस एस गीत गायले व ते विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेतले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली कांबळे यांनी या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. आभार प्रा. शंकर पाकले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहिणी वाघमारे यांनी केले. यावेळी सरपंच श्री रियाज तांबोळी, उपसरपंच श्री. विनोद जगदाळे ग्रामपंचायत माजी सदस्या भोरे, स्वयंसेवक, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, प्रा. ए.एल.जाधव, कार्यक्रम अधिकारी प्रा. मंगेश गावित, सदस्य प्रा. जयश्री हाटकर, डॉ वंदना सातपुते, डॉ. विश्वंभर शिंदे, प्रा. हर्षल वांगीकर, प्रा. नलेश बहीरम, प्रा. के. के. चौगुले व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिनांक १८ जानेवारी २०२६**

दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी ६ वाजता प्रार्थना आणि NSS गीताने झाली व योगा, सूर्यनमस्कार करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. कसबे डिग्रज गावातील पाण्याच्या टाकीकडील भाग, चिल्ड्रन पार्कमध्ये स्वच्छता करण्यात आली. १२.३० वाजे पर्यंत श्रमदान करण्यात आले. जेवण करून दुपारी थोडा वेळ विश्रांती घेतली. दुपारी ग्रुप नंबर १ जिजाऊ यांनी, संपूर्ण दिवसाचे भोजन व कामाचे नियोजन पाहिले. दुपारी ४ वाजता प्रा. विश्वास गुरव यांचे जीवन जगण्यासाठी या विषयावर व्याख्यान झाले. जीवन सुंदर बनवण्यासाठी संघर्ष किती महत्त्वाचा आहे हे डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या माध्यमातून सांगण्यात आले. वेगवेगळ्या महापुरुषांच्या उदाहरणांतून सांगण्यात आले. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली कांबळे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

**दिनांक १९ जानेवारी २०२६**

राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराची सुरुवात प्रार्थना व योगाने झाली. त्यानंतर श्रमदान करण्यात आले. स्मशानभूमीकडील भाग स्वच्छ करण्यात आला. सायंकाळी चार वाजता युवराज मगदूम यांचे 'सामाजिक सेवा व देशभक्तीपर गीते' या विषयावर सुंदर असे व्याख्यान झाले. सायंकाळी ८ वाजता भोजना नंतर मनोरंजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते.

**दिनांक २० जानेवारी २०२६**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या चौथ्या दिवसाची सुरुवात योगा व प्रार्थना यांनी झाली. त्यानंतर सर्वजण श्रमदान करण्यासाठी स्मशान-भूमीकडील भाग स्वच्छ करण्यात आला, त्याची माती काढून बाजूला फेकण्यात आली. स्मशानभूमी स्वच्छ करण्यात आली. सकाळी ८.३० वाजता हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी मुलींनी सर्वांच्या घरी जाऊन महिलांना आमंत्रण दिले. त्यानंतर दुपारचे भोजन झाले व दुपारी चार वाजता महिला जनजागृती अभियान अंतर्गत माधवी मस्कर, भाग्यश्री कोळी मनीषा खोत, योगिता लाड, पायल जाधव यांनी आमच्या महाविद्यालयाच्या मुलींना व महिलांना मासिक पाळी संदर्भात माहिती देऊन सॅनिटरी पॅड्स्चा उपयोग कसा करायचा व कशासाठी करायचा आणि आरोग्यासाठी कोणत्या गोष्टी चांगल्या आहेत याची माहिती देण्यात आली. त्यानंतर आमच्या महाविद्यालयाच्या सूक्ष्म जीवशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. भारती भाविकट्टी यांनी महिलांचे आरोग्य या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर महिलांचे विविध खेळ घेण्यात आले. महिलांची उखाण्याची स्पर्धा घेण्यात आली त्यातून तीन क्रमांक काढण्यात आले व तीन क्रमांकांना विविध बक्षीसे देण्यात आली. त्याचबरोबर संगीत खुर्ची ही स्पर्धा महिलांसाठी घेण्यात आली. त्यामध्येही तीन क्रमांक काढून बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉक्टर वंदना सातपुते व प्राध्यापिका भारती भाविकट्टी मॅडम यांनी काम पाहिले. या हळदी

कुंकवासाठी प्राध्यापिका लता माने व प्राध्यापिका अश्विनी पाटील या उपस्थित होत्या. त्याचबरोबर सर्व महिलांना भेट वस्तू आणि संक्रातीचे वाण व हळदीकुंकू देण्यात आले. यासाठी गावातील महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सायंकाळी आठ वाजता भोजनानंतर मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

**दिनांक २१ जानेवारी २०२६**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराची सुरुवात प्रार्थना व योगाने झाली. नाष्टा करून नंतर परत स्मशानभूमीकडील काही राहिलेला भाग स्वच्छ करण्यात आला. २१ तारखेला सकाळी ११ वाजता वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अमित सुपले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सायंकाळी ४.०० वाजता शिवाजी विद्यापीठाचे माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय ठिगळे यांचे 'चला अर्थसाक्षर होऊ या' या विषयावर अतिशय सुंदर व्याख्यान झाले.

**दिनांक २२ जानेवारी २०२६**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या सहाव्या दिवसाची सुरुवात सकाळी ६ वाजता प्रार्थना व योगाने करण्यात आली. नाष्टा करून श्रमदान करण्यात आले. ग्रामपंचायत समोरील रस्ता पूर्ण स्वच्छ करण्यात आला. तसेच आजूबाजूचा परिसरातील कचरा काढून पेटविण्यात आला व काही ग्रामपंचायतीच्या ट्रॉलीमध्ये टाकण्यात आला. भोजन करून दुपारी ४ वाजता ब्रह्माकुमारी स्वाती दीदी, सांगली यांनी 'युवा शक्ती व अध्यात्म' या विषयावर अतिशय सुंदर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे सर रात्री मुलांच्या सोबत सहभोजनासाठी उपस्थित होते. सरांनी मुलांना वेगवेगळ्या गीतांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व संस्कार सांगितले.

सायंकाळी सात ते नऊ सांस्कृतिक कार्यक्रम घेतला त्याचबरोबर सायंकाळी भोजनानंतर दहा वाजता शिवप्रताप दिनाचे महत्त्व व 'अफजलखान वध' पीपीटीच्या माध्यमातून द्वारे प्रक्षेपित करून मुलांना दाखवण्यात आले.

**दिनांक २३ जानेवारी २०२६**

राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचा समारोप सकाळी ठीक ११.३० वाजता संपन्न झाला. या समारोपाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. नंदा पाटील उपस्थित होत्या. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. त्याच बरोबर महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे, उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, ज्युनिअर विभाग प्रमुख ए.एल.जाधव व सर्व प्राध्यापक सर्व स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

**Career Counselling and Placement Cell**

The Career Counselling and Placement Cell have remained dedicated to bridging the gap between academic learning and professional excellence throughout the (2025-26) academic year. Our initiatives this year focused on three core pillars: skill enhancement, industry awareness, and direct campus placement.

**Activities conducted in the academic year (2025-26)**

- Industry-Academic Integration: On 8th October 2025, Dr. A. S. Sartape gave a talk to students about how the pharmaceutical and chemical industries work.
- Exploring Public Sector: On 8th December 2025, the Cell organized a session by Dr. A. S. Mote entitled “Government Job Opportunities for Chemistry Graduates." This lecture mapped out various competitive pathways for science students in the public domain.
- Skill Development: A Three-Day Workshop on Employability Skills was conducted on 16th February 2026. This program was organized to polish students' "soft skills," including resume building, interview etiquette, and professional communication, ensuring they are "industry-ready" upon graduation.
- Campus Recruitment Drives: A significant Career Drive was held on 18th June 2025, in association with Kamdhenu Agrowet, Kasabe Digraj, allowing students to interface directly with recruiters and secure placements in the agricultural and chemical sectors.

**Dr. T. R. Lohar**

**(Convener)**

# शिष्यवृत्ती विभाग

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे जिल्हा बार्टी, आदिवासी विभाग (T. R. T. I.), सारथी, महाज्योती व अमृत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी साहाय्य जनजागृती अभियान तसेच 'अमली पदार्थ प्रतिबंध अभियान' या विषयांवर महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागाच्या वतीने एक विशेष व्याख्यान दि. १४.०७.२०२५ रोजी आयोजित करण्यात आले.

**डॉ. नरेश पवार**

**(समन्वयक)**

| Academic Year : 2025-2026 | | | | |
|---|---|---|---|---|
| **Standard Name -Stream Name** | | **Female** | **Male** | **Total** |
| F.Y. | B.A. | 37 | 107 | 144 |
| | B.Com. | 22 | 26 | 48 |
| | B.Sc. | 61 | 82 | 143 |
| | **Total** | **120** | **215** | **335** |
| M.Com.I Advanced Accountancy | M.Com. | 7 | 12 | 19 |
| | **Total** | **7** | **12** | **19** |
| M.Com.II Advanced Accountancy | M.Com. | 8 | 15 | 23 |
| | **Total** | **8** | **15** | **23** |
| M.Sc.I Analytical Chemistry | M.Sc. | 9 | 7 | 16 |
| | **Total** | **9** | **7** | **16** |
| M.Sc.I Microbiology | M.Sc. | 9 | 3 | 12 |
| | **Total** | **9** | **3** | **12** |
| M.Sc.II Analytical Chemistry | M.Sc. | 5 | 10 | 15 |
| | **Total** | **5** | **10** | **15** |
| M.Sc.II Microbiology | M.Sc. | 6 | 12 | 18 |
| | **Total** | **6** | **12** | **18** |
| S.Y | B.A. | 13 | 43 | 56 |
| | B.Com. | 5 | 32 | 37 |
| | B.Sc. | 29 | 63 | 92 |
| | **Total** | **47** | **138** | **185** |
| T.Y. | B.A. | 24 | 52 | 76 |
| | B.Com. | 21 | 21 | 42 |
| | B.Sc. | 53 | 52 | 105 |
| | **Total** | **98** | **125** | **223** |
| XI | Arts | 13 | 54 | 67 |
| | M.C.V.C.Banking | 3 | 17 | 20 |
| | M.C.V.C.Electrical Technology | | 28 | 28 |
| | M.C.V.C.Electronics Technology | | 13 | 13 |
| | M.C.V.C.MLT | 11 | 8 | 19 |
| | Sci. | 26 | 87 | 113 |
| | **Total** | **53** | **207** | **260** |
| XII | Arts | 2 | 70 | 72 |
| | M.C.V.C.Banking | 6 | 10 | 16 |
| | M.C.V.C.Electrical Technology | | 22 | 22 |
| | M.C.V.C.Electronics Technology | | 10 | 10 |
| | M.C.V.C.MLT | 8 | 8 | 16 |
| | Sci. | 33 | 107 | 140 |
| | **Total** | **49** | **227** | **276** |
| | **Grand Total** | **411** | **971** | **1382** |

## स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रॅम

भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात दि. ११ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये 'स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रॅम' संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. व्ही. पोरे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम साहेब यांचे प्रेरणादायी चरित्र विद्यार्थ्यांसमोर मांडले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्रगतीची, ग्रंथालय, प्रयोगशाळा, एनएसएस, एनसीसी इत्यादी सुविधांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विभागांचा, खेळाच्या मैदानाचा जास्तीत जास्त वापर करावा तसेच नम्र आणि जबाबदार राहावे, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समिती, रॅगिंग विरोधी समिती, विद्यार्थी तक्रार निवारण समिती अशा विविध समित्यांच्या कामकाजाबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अमित सुपले यांनी मनोगत व्यक्त केले.

**प्रा. अमोल कुंभार**
**(समन्वयक)**

## औद्योगिक शैक्षणिक भेट

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथील रसायनशास्त्र विभागातर्फे बी.एस्सी. व एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०२६ रोजी Excel Industries, रोहा (रायगड) येथे औद्योगिक शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्पादन विभाग (Production Department), गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा (Quality Control Lab) तसेच संशोधन व विकास (RD) विभागाला भेट दिली. उद्योगातील तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावरील उत्पादन प्रक्रिया, कच्च्या मालाची हाताळणी, अभिक्रिया नियंत्रण (Reaction Control), तसेच औद्योगिक सुरक्षा नियमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून औद्योगिक कार्यसंस्कृतीची ओळख करून घेतली.

या औद्योगिक भेटीत विद्यार्थी व प्राध्यापक डॉ. विश्वंभर शिंदे, डॉ. अजित देशमुख, प्रा. संध्याराणी वडगांवे, सौ. स्नेहल पाटील व श्री. पवन पवार उपस्थित होते. या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) व्ही. ए. रणखांबे यांचे मार्गदर्शन लाभले, तर विभागप्रमुख प्रा. (डॉ.) एस. व्ही. पोरे व उपप्राचार्य डॉ. अमित सुपले यांचे सहकार्य लाभले.

# Department of Chemistry

**1) Research & Faculty Achievements**

- Ph. D. degree awarded:

❏ Mr. Mahesh Burud: Awarded Ph.D. from Shivaji University under the guidance of Dr. A. R. Supale (4th October 2025).

❏ Ms. Mehjabin Mujawar: Awarded Ph. D. from Shivaji University under the co-guidance of Dr. A. M. Sargar (31st December 2025).

- Research Publications: The faculties of Department published 17 research papers in reputed journals.
- Books Published: Faculty members contributed to academic literature with the publication of 06 books.
- Dr. T. R. Lohar completed Refresher Course in Chemistry (Residential) between 10th March 2026 to 25th March 2026 organized by UGC-MMTTC Goa University, Goa
- Dr. V. P. Shinde graduated Indian patent on 'Ergonomic Benchtop chemical reactor with digital interface'
- Progression to higher education: One PG student successfully secured admission to the Ph.D. Course at Shivaji University, Kolhapur.

**2) Student Development & Engagement**

- Induction Program: Organized a formal Welcome Function for First-Year PG students to facilitate their transition into advanced chemistry studies.
- Guest Lectures: Hosted specialized guest lectures throughout the year to expose PG students to contemporary chemical research and industry trends.
- Conference Presentations: PG students actively represented the department by presenting their research work at various National and International conferences.

**3) Industrial & Experiential Learning**

- Industrial Visit: Organized a two-day educational tour (23rd- 24th February 2026) for B. Sc. III and M.Sc. II students to Excel Industries, Roha, providing first-hand exposure to industrial chemical processes.

**4) Science Promotion & Celebrations**

- National Science Day (28th February 2026): To commemorate the discovery of the Raman Effect, the department organized poster presentation competition and scientific Rangoli competition.

# Department of Microbiology

**1. Department of Microbiology and RRC Seminar: Thursday, 13th August, 2026,**

The Microbiology Department and the Red Ribbon Club jointly organized a seminar on "Understanding AIDS" on the occasion of World Youth Day. The chairman of the seminar was the Vice Principal Prof. Dr. S. V. Pore. Miss. B. K. Bhavikatti and Dr. G. V. Mali were the resource persons.

**2. Teachers Day :Saturday 6th September, 2025**

B. Sc. III Microbiology Students organized teachers day celebration and expressed their feelings about teachers.

**3. Alumini Interaction : Saturday 6th September, 2025**

The session focused heavily on career readiness and professional growth. Our alumni Mr. Rushikesh Bobade, Prathmesh Hazare, Mr.Gourav Maske,Mr.Shubham Salunkhe and Mr. Eyannam Kiran who are working in different fields spearheaded the discussion on career guidance and placements.

**4. Welcome to M.Sc. I: Monday, 15th September, 2025**

A Welcome function for the M.Sc. I Microbiology was held on Monday, 15th September 2025 at 10.00 am in Auditorium. Ms. Tanuja Varpe was selected as Miss Fresher and Mr. Prajawal Kamble was selected as Mr. Fresher.

**5. Guest Lecture: Wednesday, 19th November, 2025**

A guest lecture was organized by Department of Microbiology for M. Sc & B. Sc students on Wednesday, 19th November, 2025 at 2 pm, in the lecture hall. The session was started with felicitation of Mr. K. B. Satpute General Manager, Serum Institute, Pune at the hands of Principal, Prof. Dr. Vivekanand Rankhambe. Foreword and introduction of guest was done by Miss. B.K.Bhavikatti. Mr. Satpute guided the students on skills required to work as a microbiologist in Pharmaceutical industries.

**6. Fermented Food Fest: Saturday, 27th December, 2025**

On the occasion of Louis Pasteur birth anniversary, Department of Microbiology organized Fermented Food Fest. In this fermented food fest, all Microbiology students from B. Sc l to M. Sc. ll microbiology students participated. The food exhibited included Millet Kheer, Uttappa, Dosa, Idli, Tofu, Buttermilk etc.

**7. Social Awareness Programme: Friday, 2nd January, 2026**

As part of Social Enlightenment Week, the program was organized at Shri Dattatray Hari Chavan Vidyalaya, Sangliwadi. All secondary section students, boys and girls, from the school were present for this program. Principal Dr. Vivekanand Rankhambe was felicitated with a rose by Headmistress Mrs. Swapnagandha Chopade. In line with the NEP curriculum system for B.Sc. Part II, a community development program was also implemented alongside this event. Various activities were organized under this program. An information pamphlet with the message "Drink Buttermilk and Stay Healthy" was unveiled by the chief guests, and the importance of buttermilk was explained to the students. Additionally, the scientific method of handwashing was demonstrated to the students with a practical session by Mr. Arif Mulani. In the next session Miss. B. K. Bhavikatti explained 'Menstrual Hygiene and its importance for overall health.' After this, while giving information about blood groups, Miss. Vaishnavi Patil explained the importance of blood groups and their discovery to the students.

**8. Guest Lecture:Tuesday, 13th January, 2026**

A guest lecture on "Importance of Research in Basic Sciences" was organized on 13th January 2025. The lecture was delivered by Prof. Mohan Madwanna , who emphasized the need for students to actively engage in research in basic sciences. He explained how scientific research plays a crucial role in national development and innovation.

**9. SET Examination Guidance Lecture: Wednesday, 4th February, 2026**

Department of Microbiology organized a guest lecture on SET examination guidance for PG students. Miss. Samruddhi Patil and Miss. Sapana Velhal from Microbiology department delivered the sessions as resource persons.

**10. The Study Tours:**

The Study tour of B. Sc.-III and M. Sc Microbiology students was organized on 22nd - 23rd December, 2025 and successfully completed. The study tour was attended by 16 students and 3 faculty members Viz Dr. G. V. Mali, Ms. S. V. Velhal and Miss. P. S. Pawar. During the study tour students and teachers visited Interactive Research School for Health Affairs (IRSHA), Rajiv Gandhi Institute of Information Technology and Biotechnology, and Golden Jubilee Museum, Pune.

On the second day of visit, on 23rd December, 2025 students visited Rajiv Gandhi Institute of I. T. and Biotechnology, where plant tissue culture and animal tissue culture departments were seen. The instrumentation and research work were explained to the students by experts.

**Visit to Bharati Vidyapeeth's Medical College, Sangli**

A study tour of B.Sc.-II Microbiology students of was organized on Tuesday, 23rd December, 2025 and successfully completed. The study visit was attended by B.Sc II students and faculty members viz. Miss. Bharati Bhavikatti Mr. Arif A. Mulani, Ms. Vaishnavi Patil. During study visit students visited to the Blood bank, Sewage treatment plant, Forensic science department and Incinerator facility.

On Wednesday, 25th February, 2026, the M.Sc.Microbiology students Seema Biotech at Talsande. The study tour was organized under the supervision of faculty members Dr. G. V. Mali, Mr. A. A. Mulani, Miss. S. S. Patil, and Miss. V. S. Patil. Upon arrival, the group was hosted by Mr. Sushant Patil, who provided a comprehensive overview of the company's operations. there after the students visited Shri. Warana Sahakari Dudh Utpadak Prakriya Sangh Limited, Tatyasaheb Korenagar.

**11. Poster presentation prize in International Conference: Friday & Saturday 13th -14th March , 2026**

SGM,College Karad organised an International Conference Lifecon in India II(2026). Mr. Shreyas Shete and Miss.Amruta Jadhav presented their research posters in this conference and were awarded with the first prize.

**12. Special Achievements-**

1. Dr. B. B. Ballal was selected as a Principal at Mahila Mahavidyalaya,Karad
2. Dr. G.V. Mali was promoted as a Professor in Microbiology under the Career Advancement Scheme on 29th November, 2025.
3. Mr. Arif Mulani received best paper presentation award (first) at International Conference -Lifecon 2026, organized by SGM college Karad on 13th and 14th March, 2026.
4. Miss. B. K. Bhavikatti was selected as a Chairman at Chandrashekhar Magdum Salary Earners Cooperative Society, Sangli 26 March, 2026.
5. Five students achieved a position in the merit list of Shivaji University, Kolhapur for M. Sc. in General Microbiology. 17th December, 2026

**Merit holders at M.Sc.General Microbiology (2024-25), Shivaji University, Kolhapur**

| Sr. No. | Name of the Students | Class | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Kevat Ragini Ramkishan | M. Sc. II | 3rd |
| 2 | Mr. Jadhav Sourabh Kakasaheb | M. Sc. II | 4th |
| 3 | Miss. Gharge Smita Sunil | M. Sc. II | 4th |
| 4 | Miss. Mujawar Alisha Mubarak | M. Sc. II | 7th |
| 5 | Miss. Hingane Simran Shashikant | M. Sc. II | 9th |

# Department of Zoology

- The department 'celebrated' Nature Conservation Day' on 28th July 2025 by organizing a lecture highlighting the importance of conserving natural resources and biodiversity. The programme emphasized the role of students and young scientists in protecting ecosystems and promoting sustainable environmental practices.
- To mark 'World Wildlife Week', the department organized Rangoli Competition on 3rd November 2025 at the college level. Students participated enthusiastically and expressed their ideas about wildlife conservation through creative artwork.
- Another Poster Competition was conducted on 18th November 2025, further encouraging students to communicate scientific messages about the protection of wildlife and natural habitats.
- The department celebrated 'National Bird Day' on 5th January 2026, focusing on bird diversity and the ecological importance of birds in maintaining environmental balance. Students were encouraged to observe and appreciate local bird species and understand the need for their conservation.
- On 2nd February 2025, 'World Wetland Day' was Celebrated to spread awareness about the ecological and environmental importance of wetlands. The programme highlighted the role of wetlands in supporting biodiversity, regulating water cycles, and maintaining ecological balance.
- A One Day Snake Awareness Programme was conducted on 25th February 2026 at the college level on the theme; 'Snake Species Identification.'

- To guide students regarding higher education and career opportunities, the department organized a Guest Lecture by an Alumnus on 2nd March 2026 on the topic "PG Entrance Preparation and Career Opportunities in B.Sc. Zoology." The lecture provided valuable information on postgraduate entrance examinations, career paths in zoology, research opportunities, and competitive examinations.
- Awareness." The programme aimed to remove misconceptions and fear about snakes by providing scientific knowledge about different snake species, their ecological significance, and safe practices during snake encounters.

## Department of English

The department English conducted following activities during the academic year 2025-26

1. Inauguration of LSRW activities and opening of YouTube channel were done with the auspicious hands of Dr. Usha Bande, Fellow, Indian Institute of Advanced Study (IIAS), Shimla at the lead college workshop on 08-12-2025
2. "Film Screening and Literary Appreciation Activity" was conducted on 12-12-2025.
3. "An Extension Activity: Essay Competition on Social Themes" was conducted on 22-01-2026.
4. International Conference on "Classical Languages and Literatures: Past, Present and Future" was conducted on 13-02-2026.
5. Prof. V. B. Paraddi Award was given to Ms. Prajakta Nivas Sutar for her outstanding performance in the English subject B.A. III
6. Mr. Rohan Disale secured second place in 'Poetry Writing' in Inter-Collegiate Magazine Competition held at Shivaji University, Kolhapur.
7. B. A. and B.Sc. Part III (students') seminars were conducted.

## Department of Commerce

The following programs and activities were organized by the department for the academic year 2025-2026 through Commerce Association. • A Guest Lecture was organized on "Basics of Financial Literacy with Reference to Share Market" on 29th January 2026 in the college.

As the chief guest for this program was Mr. Ramesh Jadhav (BSE Deputy Vice President) and Mr. Ajit Patil (SEBI Smart Trainer). The Vice-Principal of the College, Dr. A. R. Supale was the chairman of the program. The total 49 students of the commerce department were participated in this program.

- An industrial visit was organized for the Commerce students on 21st January 2026 at Shri Ganesh Paper Cup manufacturing unit Sangli which was engaged in the manufacturing of paper cups. The purpose of this visit was to provide practical exposure to students and help them understand the real working environment of a manufacturing unit.
- As a part of syllabus, Department of Commerce has organized Industrial tour of B. Com. and M. Com. Students on 23rd January 2026, at Krishnaraj Cashews Processing Industry, Mirjole Ratnagiri to study the Production and Marketing Process of Cashews Processing Industry, also visit near places Kasheli, Ganeshgule, Bhatye, Ratnadurg fort and Thiba Palace. A total of 33 students from B.Com. and M. Com. along with 3 faculty members participated in the Industrial tour.

# Internal Quality Assurance Cell

**The IQAC conducted/observed various activities during the academic year:**

| | |
|---|---|
| 1 | Student Induction Program |
| 2 | SUK-sponsored Changed syllabus workshops- B. A. II- Geography and Physical Education |
| 3 | International Conference on 'Classical Languages & Literatures: Past, Present & Future'- 13 Feb. 2026 |
| 4 | Skill Development Workshop for Girl Students- 16 to 18 Feb. 2026 |
| 5 | Participation in NIRF-2026 |

**Dr. A. R. Supale**
**Coordinator, IQAC and NAAC**

# Staff Academy
# One-Day Workshop on
# "Health Wave: Mind and Food"

A one-day workshop on "Health Wave: Mind and Food" was organized at Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli,under lead college scheme with the objective of creating awareness among students about the importance of mental health and proper nutrition for leading a healthy lifestyle.

The program began with a warm welcome by Miss.. Bharati Bhavikatti, who also presented the introductory remarks. She explained the purpose of organizing the workshop and emphasized the need to maintain both mental and physical well-being in today's fast-paced and stressful life.

During the workshop, Dr. Chandrashekhar Halingale delivered an informative session on "Mental Health for a Healthy Life." He highlighted the importance of maintaining a healthy mind and explained that mental well-being plays a key role in achieving overall health. He also discussed various ways to manage and reduce stress, such as practicing positive thinking, maintaining a balanced daily routine, engaging in regular physical exercise, meditation and yoga, spending time with family and friends, and pursuing hobbies or creative activities. He emphasized that proper sleep, time management, and limiting excessive use of digital devices can also help in reducing stress and improving mental stability. He also explained 'Expectations' as the cause of anxiety as expectations from self, those from the others and from the universe. He very beautifully explained the ways to tackle with the stress.

The second session was conducted by Ms. Anjum Shaikh, who spoke on "Diet for a Healthy Life." She explained the importance of a balanced diet and its role in maintaining overall health. She also highlighted the concept of nutrition for brain health, stating that certain foods help improve memory, concentration, and mental performance. She advised students to include foods rich in Omega-3 fatty acids, proteins, vitamins, and antioxidants, such as nuts, seeds, fruits, green leafy vegetables, whole grains, milk products, and fish. She also stressed the importance of drinking adequate water, avoiding excessive junk food, and maintaining regular eating habits for better physical and mental health.

The workshop proved to be highly informative and beneficial for the students. The participants actively engaged in the sessions and gained valuable knowledge about managing stress, maintaining mental well-being,

and adopting a balanced diet for a healthy and productive life.

**Miss. Bharati K. Bhavikatti**
**Convener**

In the first session, Prof. Mrs. Bharati Bhavikatti explained the purpose of RRC. She also differentiated HIV and AIDS. She informed about Facts and myths about AIDS.

The second session was conducted by Dr. G. V. Mali. He explained history of HIV, Retroviruses and how they spread. He also shared his experience with HIV positive patients. Finally question answer session was conducted. The doubts were resolved by resource persons. Vote of thanks was given by Mr. A. A. Mulani. The function concluded at 4 pm.

Poster and model competitions were organized on the topic 'Understanding AIDS' on this day. UG and PG students actively participated in this activity.

## RRC Organized Model Competition (PG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Jamdar Sakshi Ramesh | M. Sc. II | 3rd |
| 2 | Miss. Patil Nikita Vijaykumar | M. Sc. II | 2nd |
| 3 | Miss. Mali Kiran Pravin | M. Sc. II | 1st |

## RRC Organized Poster Competition (PG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Mr. Mharugude Rohit Kondiba | B. Sc. III | 3rd |
| 2 | Miss. Yadav Ujwala Satish | B. Sc. III | 2nd |
| 3 | Miss. Lagivale Mahek Rafik | B. Sc. III | 1st |

## RRC Organized Model Competition (UG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Sargar Madhura Shankar | B. Sc. III | 3rd |
| 2 | Miss. Patil Simran Abaso | B. Sc. I | 2nd |
| 3 | Miss. Goud Gurleenkaur Gurvendarsingh | B. Sc. II | 1st |

## RRC Organized Poster Competition (PG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Mulani Afreen Feroz | M. Sc. II | I$^{st}$ |
| 2 | Mr. Shete Shreyansh Ravindra | M. Sc. II | 2$^{nd}$ |
| 3 | Miss. Yadav Trupti Vijay | M. Sc. II | 3$^{rd}$ |

## RRC Organized Model Competition (PG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Mali Kiran Pravin | M. Sc. II | I$^{st}$ |
| 2 | Miss. Patil Nikita Vijaykumar | M. Sc. II | 2$^{nd}$ |
| 3 | Miss. Mali Kiran Pravin | M. Sc. II | 3$^{rd}$ |

## RRC Organized Poster Competition (UG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Lagivale Mahek Rafik | B. Sc. III | I$^{st}$ |
| 2 | Miss. Yadav Ujwala Satish | B. Sc. III | 2$^{nd}$ |
| 3 | Mr. Mharugude Rohit Kondiba | B. Sc. III | 3$^{rd}$ |

## RRC Organized Model Competition (UG)

| Sr. No. | Name of the Students | Class | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Miss. Sargar Madhura Shankar | B. Sc. III | I$^{st}$ |
| 2 | Miss. Patil Simran Abaso | B. Sc. III | 2$^{nd}$ |
| 3 | Miss. Goud Gurleenkaur Gurvendarsingh | B. Sc. III | 3$^{rd}$ |

# Red Ribbon Club
# Seminar on Understanding AIDS

**Thursday, 13th August, 2025**

Organized by: Department of Microbiology & RRC

Organizing chairman: Prof. Dr. S. V. Pore.

Speakers: - Ms. B. K. Bhavikatti, Dr. G. V. Mali

Convener: Ms. B. K. Bhavikatti.

The Microbiology Department and the Red Ribbon Club jointly organized a seminar on 'Understanding AIDS' on the occasion of 'World Youth Day.' The chairman of the seminar was the college's I/C Principal Dr. S.V. Pore.

# Internal Complaints Committee (ICC) Cell and Equal Opportunities Cell

The Internal Complaints Committee (ICC) of Bharati Vidyapeeth's Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli is constituted in accordance with the guidelines of the Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013. The committee is dedicated to ensuring a safe, secure, and inclusive environment for all students and staff members.

**Meetings Conducted**

During the academic year, the ICC conducted the following meetings:

13th August 2025, January 2026 and March 2026.

These meetings focused on planning activities, reviewing policies, and strengthening awareness initiatives.

**Activities Conducted**

The ICC actively organized and participated in various awareness and sensitization programs:

**1. Lecture on 'Gender Equity'**

